रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९| अंक १८२ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## महाराष्ट्र गारठणार

**मुंबई :** उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहणाऱ्या शीत लहरींमुळे सोमवारपासूनच मुंबईसह राज्यभरात थंडीचा कडाका वाढणार आहे. मुंबईचे किमान तापमान १३ अंश सेल्सिअस तर राज्यभरातील बहुतांशी शहरांचे किमान तापमान ६ अंश सेल्सिअस नोंदविण्यात येईल, अशी शक्यता हवामान अभ्यासकांनी वर्तविली आहे. त्यामुळे मधल्या काळात गायब झालेली थंडी पुन्हा पडणार असून, हा आठवडा कडाक्याच्या थंडीचा असणार आहे.याबाबत हवामान अभ्यासक अथ्रेय शेटटी यांनी सांगितले, उत्तर भारतात पुन्हा कडाक्याची थंडी पडणार आहे.


# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. ८ डिसेंबर २०२५

किंमत ४ ₹


## भिंत कोसळून मजुराचा मृत्यू

**पिंपरी :** कंपनीतील बांधकामाच्या ठिकाणी ब्रेकर मशीनच्या सहाय्याने समानतेचे काम सुरू असताना हादऱ्याने शेजारील कंपनीची भिंत अंगावर कोसळून मजुराचा मृत्यू झाला. मारुती भालेराव असे मजुराचे नाव आहे. भोसरी एमआयडीसीतील जे ब्लॉकमध्ये एक कंपनी आहे. काम सुरू असताना हादऱ्यामुळे अचानक शेजारी असणाऱ्या एका कंपनीची उंच सीमा भिंत आणि शेड मजूर भालेराव यांच्या अंगावर कोसळले. यात भिंतीच्या राडारोड्याखाली सापडल्याने भालेराव हे गंभीर जखमी झाले. हा प्रकार लक्षात येताच जेसीबी चालकाने आरडाओरडा केला.

### वे|ध|क

## शालार्थ घोटाळा तपासाला मुदतवाढ

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील शालार्थ प्रणालीत अपात्र शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नावे नियमबाह्यरीत्या समाविष्ट करून त्यांना वेतन अदा केल्याच्या गंभीर प्रकरणाचा तपास आणखी चार महिने सुरू राहणार आहे.या घोटाळ्याचे राज्यभर वाढत जाणारे स्वरूप, विविध जिल्ह्यांतून समोर येणाऱ्या तक्रारी आणि गैरव्यवहारांची मोठी व्याप्ती लक्षात घेता शासनाने विशेष चौकशी पथकाला चार महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. सरकारला मागील काही महिन्यांत नागपूर, नाशिक, जळगाव, बीड, लातूर, मुंबईसह इतर अनेक ठिकाणी अपात्र किंवा अस्तित्वात नसलेल्या व्यक्तींना शालार्थ प्रणालीतून वेतन मिळत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

## 'सर्वोच्च न्यायालय सामान्यांसाठी!'

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालय हे सामान्यांसाठी आहे, असा मजबूत संदेश देत एकीकृत राष्ट्रीय धोरणावर आधारित निर्णय घेणे आणि प्रलंबित खटल्यांवर लवकर निर्णय घेण्यास प्राधान्य असेल, असे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी आज स्पष्ट केले. एका माध्यमसमूहाच्या कार्यक्रमात बोलताना न्याय सर्वांना उपलब्ध व्हायला हवा, खटल्यांचा खर्च कसा कमी करायचा आणि प्रकरणांसाठी योग्य वेळ कसा ठरवायचा, याला प्राथमिकता असेल, असेही सांगितले. सरन्यायाधीश म्हणाले, की न्यायपालिका, विधिमंडळ आणि कार्यपालिका यांच्या स्वतंत्र भूमिकेची स्पष्ट व्याख्या राज्यघटनेने उत्तम पद्धतीने केलेली आहे, ज्यामुळे एकमेकांच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप होत नाही.

## विधानभवनावर धडकणार ३३ मोर्चे

**नागपूर :** सोमवारपासून सुरू होणाऱ्या अधिवेशनादरम्यान नागपूर शहरात आंदोलकांची गर्दी होणार आहे. यंदा विधानभवनावर ३३ मोर्चे धडकणार आहेत..२२ संघटनांनी धरणे आंदोलनाची आणि १७ संघटनांनी साखळी उपोषणाची परवानगी मागितली आहे. अधिवेशनाच्या एक दिवस आधी रविवारी (ता.७) दिंडोरा बॅरेज प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती, चंद्रपूर, यवतमाळ आणि वर्धा जिल्ह्यातील विविध संघर्ष समि त्यांनी मोर्चाची अनुमती मागितली आहे.यापैकी एका व्यक्तीने आत्मदहनासाठीही परवानगी मागितल्याची माहिती समोर आली आहे. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी तब्बल ५ मोठे मोर्चे विधानभवनाकडे कूच करणार आहेत.

# 256 कोटींचे करंजा बंदर गाळात

## नियोजनशून्य कामाच्या चौकशीची मागणी

**| उरण | वार्ताहर |**

**२५६ कोटी रुपयांचा निधी खर्च करुन केंद्र व राज्य सरकार उरण तालुक्यात करंजा बंदराची उभारणी १५ वर्षांपासून करत आहे. या बंदरात एक हजार मच्छीमार बोटी लॅण्ड होण्याची क्षमता आहे. मात्र बंदर विभागाच्या भ्रष्ट कारभारामुळे हे बंदर आजही गाळात रुतले असून सदर बंदरातील गाळ काढण्यासाठी सुमारे १८३ कोटी खर्चाचा प्रस्ताव सरकारकडे सादर करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.त्यामुळे बंदराच्या नियोजनशून्य आणि भ्रष्ट कामाची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी कोळी बांधवांकडून करण्यात येत आहे.**

मुंबईत ससून डॉक आणि भाऊचा धक्का जवळील कसारा बंदर अशी दोन बंदरे आहेत. कसारा बंदर गुजराती मच्छिमारांसाठी

### बंदर होणार खुले

सागरमाला योजनेतून ७५ कोटी, तसेच माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ७५ कोटी रुपये, असा एकूण १५० कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणा केली होती. केंद्र, राज्य सरकारने समसमान निधी देण्याच्या मंजुरीनंतर २०१८ मध्ये पुन्हा एकदा रखडलेल्या बंदराच्या कामाला सुरुवात झाली.इंग्रजी ई आकारापैकी सी पर्यंतचे काम पूर्ण झाले आहे. उरलेली कामेही सहा महिन्यांत पूर्णत्वास जाणार असून बंदर मच्छिमारांसाठी खुले करणार आहेत.

### सोईसुविधा उपलब्ध

निधी उपलब्ध असतानाही करंजा बंदरात अनेक वर्षांपासून रखडलेले ६०० मीटर लांबीचे इंग्रजी ई आकाराचे बंदर आधुनिक फिश लॅडिंग जेट्टी, वेस्टवॉटर ट्रिटमेंट प्लाण्ट, रेडिओ अँड कम्युनिकेशन सेंटर, फिश प्रोसेसर, शीतगृह, मासळी लिलाव आणि विक्री केंद्र, डिझेल पंप इत्यादी अत्याधुनिक सोईसुविधा मुंबई, रायगड, पालघर, ठाणे या जिल्ह्यांतील मच्छिमारांसाठी उपलब्ध होणार असल्याचे तत्कालीन कार्यकारी अभियंता सुधीर देवरे यांनी नमूद केले होते.

### गाळासाठी प्रस्ताव सादर

एकंदरीत २०१२ सुरु झालेल्या करंजा बंदराच्या उभारणीसाठी २५६ कोटींचा निधी सरकार खर्च करीत असेल आणि पुन्हा सदर बंदरातील गाळ काढण्यासाठी १८३ कोटींचा प्रस्ताव सरकारकडे सादर करत असतील, तर अशा नियोजनशून्य कामाची सखोल चौकशी करून भ्रष्ट अधिकाऱ्यांची व या भ्रष्टाचाराची पाठराखण करणाऱ्या मच्छिमार सहकारी सोसायट्यांची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी कोळी बांधवांकडून करण्यात येत आहे.





सरकारने दिले आहे. त्यामुळे मुंबई, रायगड, पालघर, ठाणे या तीन जिल्ह्यांतील मच्छिमारांसाठी ससून डॉक हेच एकमेव बंदर उरले आहे. जिल्ह्यांतील हजारो मच्छिमारांच्या बोटी ससून डॉक बंदराच्या आश्रयाला येतात. खोल समुद्रात मासेमारीसाठी जाण्यापूर्वी बंदरातच डिझेल, बर्फ आणि इतर आवश्यक साधनसामुग्री बोटीत भरण्यात येते. याच बंदरात मासळी उतरवतात व लिलाव करून विक्री करतात. ससून डॉक बंदरात ७०० मासेमारी बोटी लागण्याची क्षमता आहे. मात्र, अन्य पर्याय उपलब्ध नसल्याने वर्षोनुवर्षे हजारो मच्छिमार बोटी लागण्याची क्षमता आहे. यामुळे बंदरावर मोठा ताण पडतो. हा ताण दूर करण्यासाठी रायगड जिल्ह्यातील करंजा बंदरात अद्ययावत, सर्व सोयींनीयुक्त आधुनिक बंदर उभारण्यातच यावे, अशी मागणी सातत्याने मच्छिमारांकडून केली जात होती.

त्यामुळे शासनाने मागणीची दखल घेऊन, करंजा खाडीकिनारी एक हजार मच्छिमार बोटी लागण्याच्या क्षमतेचे अत्याधुनिक बंदर उभारण्याचा प्रस्ताव तयार केला होता.तत्कालीन केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या कारकिर्दीत ६४ कोटी खर्चाच्या कामाला २०१२ सालात निधी मंजूर होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली होती. बंदराचे पहिल्या टप्प्यातील २५० मीटर लांबीचे काम सुरू करण्यात आले होते.


मात्र, समुद्राच्या तळाशी अवघड खडक लागल्याने वाढत्या खर्चामुळे काम रखडले होते. खडक फोडून बंदर उभारणीसाठीचे काम १४९.८० कोटींपर्यंत पोहोचले. अतिरिक्त निधी शासनाकडून उपलब्ध होऊ शकला नाही. त्यामुळे आठ वर्षांपासून रखडले होते.

# सरकारच्या चहापानावर बहिष्कार

## हिवाळी अधिवेशनापूर्वी विरोधकांचा सरकारवर घणाघाती आरोप

**| नागपूर | वृत्तसंस्था |**

१९८० मध्ये भाजपाचे १४ आमदार होते, १९७५ मध्ये १६ आमदार होते तेव्हाही विरोधी पक्षनेते देण्यात आले होते. परंतु आताच्या सरकारला विरोधकांची भीती वाटते का? विरोधी पक्षनेतेपद रिक्त ठेऊन चहापानाला बोलावत असतील तर त्यावर विरोधकांनी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे अशी माहिती काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी दिली. नागपूर हिवाळी अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात होत आहे. त्याआधी सरकारकडून विरोधकांना चहापानाचं आमंत्रण देण्यात आले. त्यावर विरोधकांनी बहिष्कार टाकला आहे.



नागपूरात विरोधकांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत महायुती सरकारवर निशाणा साधला. विजय वडेट्टीवार , भास्कर जाधव यांनी ही पत्रकार परिषद घेतली. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, राज्यात शेतकऱ्यांची कर्जमाफी करू असं आश्वासन महायुतीने दिले होते. मात्र वारंवार सरकारकडून तारीख पे तारीख देण्याचं काम करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जात आहे. केंद्राकडे अतिवृष्टीसाठी प्रस्ताव पाठवला नाही असं पुढे आले. राज्याला केंद्राकडून अद्याप कुठलीही मदत मिळाली नाही. राज्यात शेतकऱ्यांचा अवमान करण्यासाठी महायुती नेत्यांची चढाओढ सुरू आहे. अजित पवार असतील राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेतकऱ्यांविरोधी विधाने केली. राज्यातील तिजोरी खाली झाली आहे. ९ लाखाहून अधिक कर्ज राज्यावर आहे. उत्पन्नाचा मोठा वाटा कर्ज परतफेडीवर जात आहे. महसूल तूट वाढली आहे. निधी वाटपात मोठ्या प्रमाणात असमानता होत आहे असा आरोप त्यांनी केला.तसेच राज्य दिवाळखोरीला निघाले आहे. मोठ्या शहरात निधी वळवला जातो. छोट्या शहरांना विकासापासून वंचित ठेवले जाते. विदर्भाकडेही दुर्लक्ष केले •> पान २ वर


# गोव्यात नाईट क्लबमध्ये अग्नितांडव

## २३ जणांचा होरपळून मृत्यू; राष्ट्रपती अन् पंतप्रधानांकडून शोक व्यक्त

**| पणजी | प्रतिनिधी |**

गोव्यात एक भीषण दुर्घटना समोर आली आहे. उत्तर गोव्यातील अर्पोरा येथील बर्च बाय रोमियो लेन क्लबमध्ये काल रात्री उशिरा लागलेल्या भीषण आगीत किमान २३ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये तीन महिला आणि २० पुरुषांचा समावेश आहे, त्यापैकी बहुतेक क्लब कर्मचारी असल्याचे असल्याचे सांगितले जात आहे. शनिवारी मध्यरात्री १२:०४ च्या सुमारास ही दुर्घटना घडली. सिलिंडरच्या स्फोटामुळे ही आग लागल्याचे सांगितले जात आहे.

भाजप आमदार मायकल लोबो यांनी सांगितले की, बहुतेक लोकांचा मृत्यू गुदमरून झाला कारण ते घाबरून तळघरात पळून गेले. लोबो यांनी पुष्टी केली की मृतांमध्ये काही पर्यटक होते, तर बहुतेक स्थानिक लोक रेस्टॉरंटच्या तळघरात काम करत होते.




गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी घटनास्थळी भेट दिली आणि क्लबने अग्निसुरक्षा नियमांचे पालन केले नसल्याचे उघड केले. या घटनेला अत्यंत त्रासदायक म्हणत मुख्यमंत्री सावंत यांनी सविस्तर चौकशीचे आदेश दिले आहेत आणि क्लब व्यवस्थापन आणि सुरक्षेतील त्रुटी असूनही क्लबला काम करण्यास परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर •> पान २ वर

# एक कोटी १० लाखांचा चरस मुंब्र्यात जप्त

## जम्मू-काश्मीरमधून विक्रीसाठी आणला

**| ठाणे | वृत्तसंस्था |**

अमली पदार्थ विरोधी मोहीम तीव्र करणाऱ्या मुंब्रा पोलिसांनी एका ४२ वर्षीय व्यक्तीकडून तब्बल एक कोटी १० लाख २५ हजार रुपये किमतीचा चरस जप्त केला आहे. संशयित आरोपीला अटक करण्यात आली असून, त्याने हा चरस जम्मू-काश्मीरमधून विक्रीसाठी आणल्याचे तपासात उघड झाले आहे.

मुंब्रा पोलीस ठाण्याच्या एनडीपीएस पथकातील अधिकारी आणि अंमलदार काळसेकर परिसरातील ऐरोली-मुंब्रा ब्रिज बोगद्याजवळील निर्जन ठिकाणी गस्त घालत असताना ही कारवाई झाली. मोहम्मद हारून हसरत अली सिद्धीकी (वय ४२) हा व्यक्ती संशयितरीत्या उभा असताना पोलिसांना पाहून पळून जाऊ लागला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यातील पिशवीत दोन किलो २०५ ग्रॅम वजनाचा चरस अमली पदार्थ मिळून आला. सिद्धीकीविरोधात मुंब्रा पोलीस ठाण्यात एनडीपीएस ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल केला असून, त्याला ८ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक केलेल्या •> पान २ वर

# ९६,८०० शिक्षकांचे वेतन कापणार

**| मुंबई | प्रतिनिधी |**





राज्यातील अनुदानित शाळांतील शिक्षकांनी ५ डिसेंबरला राज्यव्यापी पुकारलेल्या शाळा बंद आंदोलनात सहभागी झालेल्या प्राथमिकच्या २१ हजार ४७७ आणि माध्यमिक शाळेतील दोन हजार ५३९ शाळांतील एकूण ९६ हजार ८०० शिक्षकांवर एक दिवसाचे वेतन कापण्याची कारवाई केली जाणार आहे.

ही कारवाई शालेय शिक्षण विभागाच्या शिक्षण निरीक्षक आणि शिक्षणाधिकारी कार्यालय स्तरावरून केली जाणार आहे. प्राथमिक शिक्षकांत सर्वाधिक दोन हजार ९२५ शिक्षक नाशिक जिल्ह्यात, तर त्याखालोखाल पुणे जिल्ह्यात दोन हजार ३४८ गैरहजर होते, असे अहवालात म्हटले आहे.

शालेय शिक्षण विभागाने काढलेला शासन निर्णय रद्द करावा आणि शिक्षकांसाठी टीईटी अनिवार्य केली जाऊ नये, या प्रमुख मागण्यांसाठी राज्यातील विविध शिक्षक, मुख्याध्यापक संघटनांकडून ५ डिसेंबरला राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात किती शिक्षक सहभागी झाले आणि किती शाळा बंद ठेवण्यात आल्या होत्या, यासंदर्भातील अहवाल तयार केला आहे.

यात माध्यमिकच्या २६ हजार ४९० शाळांपैकी केवळ दोन हजार ५३९ शाळा बंद राहिल्या, तर या शाळांतील दोन लाख २४ हजार ३६६ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांपैकी केवळ १३ हजार २१६ शिक्षकांनी शाळा बंदमध्ये सहभाग घेतला होता. बृहन्मुंबई पश्चिम, ठाणे, पालघर, नंदुरबार, जळगाव, अहिल्यानगर, रत्नागिरी, धाराशिव, अकोला, नागपूर, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांत माध्यमिक शाळा सुरू होत्या. या जिल्ह्यांत शाळा बंदचा कोणताही प्रभाव दिसला नाही.

# कार दरीत कोसळली; ५ जण दगावल्याची भीती



**| नाशिक | वृत्तसंस्था |**

नाशिक जिल्ह्यातील सप्तशृंगी देवीच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांवर दुर्दैवाने काळाने घाला घातला. सप्तशृंगी गडावरून परतत असताना, गणपती पॉइंटजवळ एक इनोव्हा कार (एमएच १५ बीएन ०५५५) सुमारे १००० ते १२०० फूट खोल दरीत कोसळून भीषण अपघात झाला.

या अपघातात कारमधील पाच जणांना आपला जीव गमवावा लागल्याची माहिती समोर आली आहे.या दुर्घटनेत दोन महिला आणि तीन पुरुषांचा समावेश असून, कारमध्ये एकूण सात प्रवासी होते. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन पथकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले आहे. मात्र, दरीची प्रचंड खोली आणि दुर्गम भाग यामुळे मदतकार्यात मोठ्या अडचणी येत आहेत.

भाविक देवीचे दर्शन घेऊन परतीच्या मार्गावर होते. दुपारी गणपती पॉइंटजवळ असताना, चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे कारने संरक्षक कठडा •> पान २ वर

### हजारो किलोमीटरचा प्रवास करून पक्षी दाखल | पर्यटकांना पर्वणी

# रायगडमध्ये स्थलांतरित पाहुण्यांचे आगमन

**| पाली | वार्ताहर |**

जिल्ह्यात लांबलेला पाऊस व प्रतिकूल हवामान याचा पक्ष्यांच्या स्थलांतरावर परिणाम झाला होता, मात्र आता वातावरणात अनुकूल बदल झाले आहेत. थंडीच्या हंगामात हजारो किलोमीटरचा प्रवास करून विविध देशी व विदेशी स्थलांतरित पक्षी रायगड जिल्ह्यात दाखल होत आहेत. या पक्ष्यांसाठी वातावरण अनुकूल झाले आहे.

थंडीही चांगली पडू लागली असल्याने हे स्थलांतरित व स्थानिक पक्षी स्थिरावले आहेत. त्यामुळे पक्षी अभ्यासक, निरीक्षक व पर्यटक सुखावले आहेत.स्थलांतरित पक्ष्यांसाठी पोषक परिस्थिती निर्माण झाली असल्याने त्यांनी जिल्ह्यात हजेरी लावण्यास सुरुवात केली आहे. गुलाबी थंडीची चाहूल लागल्याने निसर्गरम्य रायगड जिल्ह्यात परदेशी स्थलांतरित पक्षी आणि काही स्थानिक स्थलांतरित पक्ष्यांची रेलचेल पाहायला मिळत आहे.

गवतामधील कीटक व अळ्या तसेच साठलेल्या जलाशयामधील कीटक, कृमी, मृदुकाय जीव-जंतू खाण्यासाठी पक्षी साधारणत: नोव्हेंबर-डिसेंबरच्या दरम्यान येत असतात. विशेष म्हणजे समुद्रकिनारे, दलदलीच्या भागातील छोटे खेकडे, मृदुकाय •> पान २ वर

- परदेशी स्थलांतरित पक्ष्यांचा बोलबालाब्ल्यू थ्रोट (शंकर), युरोपियन रोलर (तास पक्षी), युरेशियन रायनेक (मानमोडी), सायबेरियन स्टोनचाट (गप्पीदास पक्षी), बंटिंग्स (भारीट पक्षी), पॅलिड हॅरिअर (पांढुरका भोवत्या) या परदेशी स्थलांतरित पक्ष्यांचा बोलबाला येथे पाहायला मिळतो.

- स्थानिक पक्ष्यांचे आगम नपॅराडाइज फ्लाय कॅचेर (स्वर्गीय नर्तक), इंडियन रोलर (भारतीय तास पक्षी), श्राईक (खाटीक), युरेशियन हुपू (हुदहुद), क्रेस्टेड बंटिंग (युवराज) या स्थानिक पक्ष्यांचे आगमन सुरू झाले आहे.

### समुद्रकिनारे गजबजले

पक्षी अभ्यासक शंतनू कुवेसकर यांनी सांगितले, की रायगड जिल्ह्यात ४०० हून अधिक पक्षी प्रजातींची नोंद आहे. हजारो किनारी पक्षी महाराष्ट्राच्या किनारपट्टीच्या पाणथळ प्रदेशात आणि वालुकामय किनाऱ्यांवर येतात. हे स्थलांतर हा एक उल्लेखनीय प्रवास आहे, ज्यामध्ये पक्षी त्यांच्या प्रजननाच्या ठिकाणापासून हजारो किलोमीटर प्रवास करून सायबेरिया आणि उत्तर युरोपसारख्या ठिकाणी कडाक्याच्या थंडीपासून वाचण्यासाठी किंवा चीनमधूनही उष्ण हवामानात मुबलक अन्न स्रोत शोधण्यासाठी भारतात येतात. भारतातील हिवाळी पक्षी मध्य आशियाई फ्लायवे वापरतात. येथील समुद्रकिनारी प्रामुख्याने तुतवार, चिखल्या, कुरव, व्हिमब्रेल्स, लहान कोरल, युरेशिअन कोरल, सामान्य टीलवा, हिरवा तुतवार, पाणलावे, सुरय, समुद्री काळे बगळे आणि कालवफोडे आणि चिंबोरी खाऊ, रंगीत भाट तितर हे असामान्य पक्षी आहेत. पक्षी छायाचित्रकार या पक्षी हालचालींच्या कृती छायाचित्रबद्ध करण्याच्या संधीचा आनंद घेतात.



### हवाईत जगातील सर्वात घातक ज्वालामुखीचा उद्रेक

# ४०० मीटर उंच लावा उसळला

**| हवाई | वृत्तसंस्था |**

जगातील सर्वात सक्रिय ज्वालामुख्यांपैकी एक मानला जाणारा हवाईमधील कीलाउआ पुन्हा एकदा भडकला आहे. ज्वालामुखीतून तब्बल ४०० मीटर (१३०० फूट) उंच लाव्हा आणि धुराचे फवारे उसळताना दिसले. या भीषण दृश्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून, वैज्ञानिकांनी याला अलिकडच्या दशकातील सर्वात तीव्र ज्वालामुखी उद्रेकांपैकी एक म्हटले आहे.



अमेरिकन भूवैज्ञानिक सर्वेक्षणने रविवारी पहाटे जाहीर केले की, कीलाउआच्या हलंमाउमाउ क्रेटरमध्ये प्रचंड उद्रेक सुरू झाला आहे. या वेळी क्रेटरच्या आत तिन्ही दिशांनी समान उंचीपर्यंत तीन लाव्हा फव्वारे उडताना दिसत आहेत. हा कीलाउआच्या इतिहासातदेखील फार दुर्मिळ क्षण आहे.

स्थानिक वेळेनुसार शनिवारी रात्री ११:४५ च्या सुमारास उद्रेक सुरू झाला. काही मिनिटांतच आकाश लाव्हारसामुळे पूर्णपणे लाल झाले. सध्या लावा क्रेटरच्या आतच मर्यादित असून हवाई व्होल्केनोज नॅशनल पार्कच्या •> पान २ वर

# बोर्लीपंचतन शहरावर पाणी संकट

- पाच दशक उलटून कोट्यवधींच्या विविध योजना पाण्यात
- आठवडाभर शहरात पाणी कपात



**। दिघी । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन हे अनेक शहरांच्या तुलनेत मोठी लोकवस्ती तसेच प्रसिद्ध बाजारपेठ म्हणून स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण करत आहे. यासाठी कोट्यवधींच्या विविध योजना येथे राबविण्यात आल्या. मात्र, पाच दशक उलटून येथील पाणी प्रश्न सुटला नाही. प्रत्येक योजनेतील निकृष्ट कामामुळे पाण्याची समस्या कायम आहे. त्यामुळे आता शहरावर मोठे पाणी संकट उभे ठाकले आहे.

बोर्लीपंचतन येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी सुरुवातीला कोंढेपंचतन येथे धरण बांधण्यात आले. मात्र, या धरणातील पाणी पुरवठा पावसाळी होत असून, नागरिकांना पाण्याची आवश्यकता असताना या धरणात पाणीच नसते. त्यामुळे धरण उशाला अन कोरड घशाला ही परिस्थिती बोर्लीकरांवर आली. दुसऱ्या योजनेत कार्ले येथील धरणातील पाण्यासाठी विहीर व पाईपलाईन जोडण्यात आली आणि बोर्लीपंचतन शहरासाठी पाणीपुरवठा करण्यात आला. मात्र, वाढत्या लोकसंख्येने शहराची तहान वाढू लागली. यासाठी पुढे आणखी एक पाणी योजना राबविण्यात आली. सध्या शहराला याच दोन योजनेतून पाणीपुरवठा होत आहे. मात्र, एवढया योजना मार्गी लागल्या तरी दिवसांआड आणि एकदीड तास होणारा पाणीपुरवठा कितपत शहराची तहान भागवणार याबद्दलही शंका व्यक्त होत आहे.

दिवेआगर पर्यटन स्थळ तसेच तुरंबाडी व दिघी पोर्टसारख्या औद्योगिक क्षेत्रामुळे ग्रामीण भागातून शहरीभागाकडे येणाऱ्यांचे प्रमाणही वाढते आहे. एकूणच शहराचे राहणीमान उंचावले असून वस्तीही वाढत आहे. साहजिकच पाण्याची गरज वाढून त्याचा तुटवडा सध्या भासत आहे. बोर्लीकरांच्या स्वतःच्या मालकीचे तीन योजना असूनही शहरावर टंचाईचे सावट असते. सत्ताधारी येतात आणि सत्ता भोगून जातात. मात्र, मुबलक पाण्याची समस्या सोडवण्यात पाच दशक उलटून ही कोणालाच यश आले नाही.

### तीन योजनेत कोट्यवधींचा चुराडा


- सुरुवातीला सण १९९६ साली महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या योजने अंतर्गत कोंढेपंचतन येथे धरणासाठी रक्कम १ कोटी ५४ लक्ष ४९००० हजार रु. वापरण्यात आली.
- २००३ साली जिल्हा परिषद अंतर्गत नव्याने कार्ले येथील धरणातील पाण्यासाठी पाणी टाकी बांधण्यात आली व पाईपलाईन जोडून पाणीपुरवठा करण्यात आला.
- तर २०१३ साली राष्ट्रीय ग्रामीण पेयजल अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजना यासाठी तब्बल २ कोटी २४ लक्ष ३५ हजार २६७ रु. इतका निधी वापरण्यात आला. मात्र, तीनही योजनेत कोट्यवधी खर्च करून सुद्धा बोर्लीपंचतन शहराला मुबलक पाण्याची उपेक्षाच राहिली.

### जनतेमध्ये नाराजीचा सूर

गेली पाच वर्षे जनता मुबलक आणि स्वच्छ पाणी पुरवठा होण्याच्या प्रतीक्षेत आहे. कोट्यवधी रुपयांचा निधी पाण्यस्तही खर्च करून देखील जनतेला मुबलक पाणी मिळत नसल्याने जनतेमध्ये नाराजी आहे. मुबलक पाणीपुरवठा करण्याची मागणी होत आहे.

## प्रेरणा कदम हिची एअर होस्टेस म्हणून नियुक्ती

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**



रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील कोर्लई येथील सलून व्यावसायिक निवास कदम व निलिमा कदम यांची सुकन्या प्रेरणा कदम या नाभिक समाजाच्या गुणवंत सुकन्येची प्रतिष्ठित एअर इंडिया एअर लाईनमध्ये मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर एअर होस्टेस म्हणून नियुक्ती झाली आहे. ही नियुक्ती झाल्यामुळे प्रेरणा कदम हिच्यावर सर्व थरातून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत असून ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबातील प्रेरणा हिची एअर होस्टेस म्हणून निवड झाल्यामुळे प्रेरणा हिचे नागोठणे येथील नातेवाईक व नागोठण्यातील नाभिक समाज बांधवांनी आनंद व्यक्त केला आहे. प्रेरणाला एअर होस्टेस होण्यासाठी मिळणारी प्रेरणा तिच्या आईवडील आणि शिक्षकांकडून मिळाली. तिने तिच्या ध्येयवेड्या चिकाटीने पाहिलेले स्वप्न पूर्ण केले.

## कर्जतमध्ये महायुती विरुद्ध परिवर्तन आघाडी सामना

### जि.प. ला ठाकरेंच्या सेनेची आघाडी कायम

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नगरपरिषद निवडणुकांचा धुरळा मतदानानंतर काही प्रमाणात थांबला आहे. पण मतमोजणी अडकल्याने राजकीय पक्ष सावध पावले उचलत असून आगामी काळात होणार असलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी राजकीय आखाडे बांधण्यास सुरुवात झाली आहे. कर्जत तालुक्यात होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत शिवसेना भाजप आरपीआय यांचे महायुती विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे तसेच महाविकास आघाडी अशी लढत होण्याचे नक्की झाले आहे.

कर्जतविधानसभामतदारसंघात महायुतीमधील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विळ्या भोपळ्याचे वैर आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसने महायुतीतून बाहेर पडत शिवसेना ठाकरे पक्षासोबत सोयरिक जमविली आहे. त्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विद्यमान जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे यांनी २०२४ मध्ये विधानसभा निवडणूक लढविताना कर्जत परिवर्तन आघाडी स्थापन केली होती.त्याच नावाने नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत निवडणुकीला ही आघाडी महाविकासआघाडीलासोबतघेऊन निवडणुकीला सामोरे गेली होती.२ डिसेंबर रोजी या मतदारसंघातील कर्जत,खोपोली आणि माथेरान या तीन नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या आहेत.या सर्व निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी होत आहे,परंतु आम दार महेंद्र थोरवे यांच्या वर्चस्वास धक्का देण्याचा प्रयत्न कर्जत परिवर्तन आघाडीने केल्याचे दिसून येत आहे. निवडणुकांचे निकाल बाकी असले तरी कर्जत, खोपोली आणि माथेरान नगरपरिषदेत कर्जत परिवर्तन आघाडी काहीतरी चमत्कार करणार?असा विश्वास आघाडीला आहे.त्यामुळे त्याचा विचार बाजूला ठेवून कर्जत परिवर्तन आघाडी जिल्हा परिषदेच्या कर्जत तालुक्यातील सहा आणि कर्जत पंचायत समितीच्या १२ जागांवर तूल्यबळ उमेदवार देण्यासाठी तयारीला लागले आहेत.

सहा जिल्हा परिषद गटांमध्ये २०१७ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन, शेतकरी कामगार पक्षाचे दोन आणि शिवसेना तसेच राष्ट्रीय काँग्रेस या पक्षाचे प्रत्येकी एक सदस्य निवडून आले होते. तर कर्जत पंचायत समितीच्या १२ पैकी सात जागांवर शिवसेना पक्षाने विजय मिळविला असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस- शेतकरी कामगार पक्षाच्या युतीला सत्तेपासून लांब ठेवण्यात शिवसेना यशस्वी ठरली होती. आताच्या निवडणुकीत रायगड जिल्हा परिषद ताब्यात घेणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने टार्गेट निश्चित केले आहे.त्यामुळे कर्जत परिवर्तन आघाडीच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना तसेच महाविकास आघाडी मधील शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रीय काँग्रेस तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांची कर्जत परिवर्तन आघाडी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी कामाला लागली असल्याचे दिसून येत आहे. कर्जत परिवर्तन आघाडी मधील घटक पक्ष यांची संख्या आणि कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्य यांची संख्या यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे आणि शिवसेना ठाकरे पक्षाच्या स्थानिक नेत्यांना सर्व पक्षांना सामावून घेण्याची कसरत करावी लागणार आहे.मागील निवडणुकीत शिवसेना आणि राष्ट्रीय काँग्रेस यांची युती होती तर राष्ट्रवादी काँग्रेस आणि शेकाप एकत्र होते तर भारतीय जनता पक्षाने स्वबळावर निवडणूक लढवली होती.यावेळी भाजप शिवसेना यांची युती होणार हे नक्की आहे.

कर्जत परिवर्तन आघाडी मधील राष्ट्रवादी काँग्रेस आणि शेतकरी कामगार पक्षाने मागील निवडणुकीत प्रत्येकी दोन जागा जिंकल्या होत्या. शिवसेना राष्ट्रीय काँग्रेस यांनी मिळून दोन जागा जिंकल्या होत्या. त्यामुळे सहा जागा यांचे वाटप करताना कसरत करावी लागेल हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला माहिती आहे.मात्र शिवसेना ठाकरे पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे मोठे भाऊ म्हणून तीन तीन जागा लढवण्याची शक्यता आहे.

## बोर्लीपंचतन येथील रेशन दुकानात अन्नसुरक्षा अन्नदिन साजरा



**। बोर्लीपंचतन । प्रतीनिधी ।**

शासनाच्या आदेशा नुसार प्रत्येक महिन्याच्या सात तारखेला अन्न सुरक्षा दिन साजरा केला जातो

श्रीवर्धन तालुक्यात तहसीलदार म हेंद्र वाकलेकर यांच्या मार्गदर्शनाखाली बागमांडला, हरिहरेश्वर, कोलमांडला, सायगाव, श्रीवर्धन वालवटी, दिघी, कुडगाव बोर्लीपंचतन, कापोली आणि तालुक्यातील सर्वच धान्य दुकानांतून अन्न सुरक्षा दिन श्रीवर्धन तालुक्यातील पुरवठा निरीक्षण अधिकारी रुपाली सुने यांच्या सूचनेनुसार साजरा करण्यात आला.

बोर्लीपंचतन येथील श्री निवास गाणेकर, अभय मयेकर आणि कापोली येथील उज्वला सायगावकर यांच्या धान्य दुकानांतुन अन्नसुरक्षा दिनास प्रत्यक्ष पुरवठा निरीक्षण अधिकारी रुपाली सुने यांच्या उपस्थितीत धान्य लाभार्थ्यांना धान्याचे वाटप करण्यात आले. लाभार्थांना विनंती करण्यात आली की दर महिन्यात ७ तारखेला धान्याची उचल करावी.

## मुरुड तालुक्यात महामानवास अभिवादन

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

भारतीय घटनेचे शिल्पकार बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या. महापरिनिर्वाण दिनी मुरुड तालुका बौद्ध समाज सेवा संघ तालुक्यातील २२ गावांमध्ये सर्व गावातील बुद्ध विहारात व डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक अलकापुरी मुरुड येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.



बौद्ध समाज सेवा संघ केंद्रीय समितीचे विद्यमान अध्यक्ष किशोर शिंदे यांनी स्वतः राजगृहाला भेट देऊन दादर चैत्यभूमी येथे जाऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. तालुक्यातील आंबोली गावातील समता सैनिक दलातील महेश हाटे, वैभव मोरे वैगरे भीम सैनिकांनी आपले कर्तव्य बजावत चैत्यभूमी ठिकाणी हजेरी लावली. विभागीय शाखा क्र.१चे विद्यमान अध्यक्ष नितीन गायकवाड, सचिव गौत्तम मोरे शाखा क्र.२ चे विद्यमान अध्यक्ष नरेंद्र जाधव, सचिव मोनिश तांबे तसेच शाखा क्र.३ चे विद्यमान अध्यक्ष जनार्दन शिंदे व सचिव प्रकाश जाधव यांनी देखील त्याच्या गावातील बुद्ध विहारामध्ये जाऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. मुरुड तालुका डॉ.आंबेडकर स्मारक समितीचे विद्यमान अध्यक्ष मनोहर तांबे सचिव मंगेश येलवे हे देखील मुंबईवरून डॉ.आंबेडकर स्मारक मुरुड येथे येऊन बाबासाहेब आंबेडकर यांना नतमस्तक झाले तर धम्म संस्कार समितीचे अध्यक्ष सुभाष मोरे व सचिव प्रकाश सोरे यांनीदेखील चैत्यभूमी दादर येथे अभिवादन केले. मुरुड तालुका बौद्ध समाज सेवा संघ यांच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विधी घेऊन जिविन मोरे, जनार्दन हाटे यांनी मानवंदना दिली त्याचप्रमाणे तालुक्यातील बौद्ध बंधू व भगिनी यांनी आपल्या आपल्या परीने दादर चैत्यभूमी येथे जाऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले असल्याची माहिती स्थानिक तालुका समितीचे विद्यमान अध्यक्ष सुरेश मोरे व सचिव धर्मेश मोरे यांनी दिली. तमाम आंबेडकरी जेष्ठ कार्यकारिणी व पक्ष तालुका अध्यक्ष ॲड बबन शिंदे, उपाध्यक्ष विजय मोरे, वसंत मोरे व विद्यमान उपाध्यक्ष सुधाकर कांबळे, काशिनाथ कांबळे, रवींद्र गायकवाड, योगेश मोरे, महादेव मोरे, दिपक मोरे, कल्पेश कांबळे, दिपक शिंदे, हरिदास मोरे, हारिदास शिंदे, वनिता मोरे, नमिता कांबळे यांच्या सह अनेक बंधु भगिनी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सांगता करते वेळेस केंद्रिय समितीचे युवा कार्यकर्ते जगदीश सर्वेकर व ज्येष्ठ कार्यकर्ते घनशाम मोरे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

## 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान'अंतर्गत तपासणी



**। कणघर । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत कणघर ग्रामपंचायतीने राबविलेल्या विविध विकासकामांची जिल्हा परिषद रायगड व ग्रामविकास मंत्रालयाच्या पथकाकडून सविस्तर तपासणी करण्यात आली.

या तपासणीदरम्यान ग्राम पंचायतीने अंमलात आणलेल्या कार्यक्रमांचा आढावा घेऊन चालू असलेल्या कामांची कामगिरी, पारदर्शकता तसेच निधीच्या योग्य वापराबाबत पथकाने माहिती संकलित केली. ग्रामपंचायत प्रशासनाने आवश्यक कागदपत्रे, नोंदी आणि प्रत्यक्ष स्थळ पाहणी यासाठी सक्रिय सहकार्य केले. अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या ग्रामविकास उपक्रमांचे प्राथमिक अहवाल समाधानकारक असल्याचे पथकाच्या अधिकाऱ्यांनी नमूद केले असून पुढील कामांना गती देण्याचा सल्लाही देण्यात आला.तपासणीदरम्यान ग्रामपंचायत प्रशासनाने सादर केलेल्या नोंदी, कागदपत्रे, प्रत्यक्ष स्थळ पाहणी आणि झालेल्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. यावेळी गटविकास अधिकारी माधव जाधव उपस्थित राहून त्यांनी ग्रामपंचायतीने सातत्याने केलेल्या कार्यपद्धतीची, पारदर्शकतेची आणि विकासकामांतील प्रामाणिकतेची विशेष प्रशंसा केली. माधव जाधव यांनी विशेषतः गावातील जलव्यवस्था, स्वच्छता उपक्रम, मार्गदर्शक तत्त्वांनुसार राबविलेल्या उपक्रमांचे योग्य नियोजन, तसेच ग्रामपंचायतीने लोकसहभागातून साध्य केलेल्या प्रगतीचे कौतुक केले. त्यांनी असेही नमूद केले की कणघर ग्रामपंचायत ही विकासाला प्राधान्य देणारी आणि योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत आदर्श ठरणारी पंचायत आहे.

अभियानातील विविध उपक्रम ांचाप्राथमिकअहवालसमाधानकारक असल्याचे पथकाने सांगितले असून पुढील कामांना अधिक गती देण्याचे आवाहन करण्यात आले. याप्रसंगी सरपंच रश्मी सावंत, उपसरपंच धनंजय सावंत, संतोष सावंत, उल्हास सावंत, सुभाष चव्हाण, प्रगती धोकटे, मनस्वी इंदुलकर, अंजना भुवड, प्रकाश धाडवे, यशवंत सुर्वे, ग्रामसेवक शिंदे, ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच आदी उपस्थित होते.

## नेरळ रक्तदान शिबिराला रक्तदात्यांचा प्रतिसाद

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, दुर्गा वाहिनी आणि नेरळ येथील समर्थ सेवा मंडळ यांच्या माध्यमातून शौर्य दिन आणि श्रीमद्भागवत गीता जयंती पावन निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या रक्तदान शिबिराला कर्जत तालुक्यातून ९० रक्तदात्यांनी उपस्थिती लावून उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.



शौर्य दिन आणि श्रीमद्भागवत गीता जयंती पावन निमित्त नेरळ येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, दुर्गा वाहिनी आणि नेरळ येथील समर्थ सेवा मंडळ यांच्या पुढाकाराने आणि सार्वजनिक रक्तदाते राजेश कोठारी यांच्या माध्यमातून आयोजित रक्तदान शिबिराला मोठी गर्दी झाली होती.नेरळ गावातील बापुराव धारप सभागृहात आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन रायगड हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुशाग्र पटेल आणि बजरंग दलाचे प्रदेश पदाधिकारी ॲड. दीपक गायकवाड यांचे हस्ते झाले. त्यावेळी विश्व हिंदू परिषद कुलाबा जिल्हा सह मंत्री संग्राम आलदर, विकास सह मंत्री प्रसन्न खेडकर, मातृशक्ती संयोजक मीनाक्षी अग्रवाल यांच्यासह प्रमुख संयोजक ॲड अमोल सूर्यवंशी, साईनाथ श्रीखंडे हे उपस्थित होते. बदलापूर येथील छाया ब्लड बँकेकडून रक्त संक्रमण करण्यात आले. या ब्लड बँकेचे बिपीन पालकर तसेच आकांक्षा गोळे, प्रज्ञा काशिद, आयान शेख, सानिया शेख,गौरव साळुंखे आदींनी रक्त संक्रमण करण्याचे कार्य केले.

या शिबिरात ९० रक्तदात्यांनी रक्त करून पवित्र कार्य केले. शिबिराला नरेश मसणे, किरण ठाकरे, मंगेश म्हसकर, ॲड.प्रसन्न खेडकर, तसेच दिलीप कवाडकर यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

शिबीर यशस्वी करण्यासाठी विश्व हिंदू परिषद विचार विकास आयाम कोकण प्रदेश सदस्य ॲड. सूर्यवंशी यांना मनिष भगत, गणपत कालेकर, भावेश भगत, सुशांत म्हसे, सुशांत भगत, संकेत कराळे, अक्षय महाले, प्रज्वल सूर्यवंशी, अन्वय मांडके यांचे सहकार्य लाभले.

## 'पैंजण' काव्यसंग्रहाचे प्रकाशन!

**। हमरापूर । प्रतिनिधी ।**

हमरापुर भागातील तांबडशेत येथील कवी व लेखक रमेश नारायण पाटील लिखित पैंजण या तिसऱ्या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा साई मंदिर तलाव कवी कट्टा, पेण येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी निवृत्त शिक्षक एस.एस.पाटील सर तर प्रमुख पाहुणे म्हणून दादर गावचे सुपुत्र प्रदीप पाटील हे होते.कवी राम नाथ पाटील यांच्या श्री गणेशाच्या प्रार्थनेने पुस्तक प्रकाश सोहळ्याला प्रारंभ झाला. कार्यक्रमाला उपस्थित असणारे मान्यवर प्रदीप पाटील, एस.एस.पाटील, म.वा.म्हात्रे, कवी दिनानाथ पाटील व के.पी. पाटील यांच्या शुभहस्ते पैंजण या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. लेखक रमेश पाटील यांनी काव्यसंग्रहाविषयी आपले मनोगत हितगुज प्रेक्षकांसमोर समोर सादर केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रकाश ठाकूर यांनी केले.

पान १ वरून

### महामानवाला अभिवादन सरकारच्या चहापानावर बहिष्कार

जात आहे. सरकार पुरवणी मागण्यात मोठ्या रक्कमा सांगत आहेत. लाडकी बहीण म्हणून पाठ थोपवणाऱ्या बहिणींच्या सुरक्षेकडे सरकारचे लक्ष नाही. महिलांवरील अत्याचार वाढले आहे. दररोज २४ मुलींवर अत्याचार, छळाचे गुन्हे नोंदवले आहे. लहान मुलींवरील अत्याचारात महाराष्ट्र नंबर एकवर आहे. २०२१ मध्ये १०४२८ गुन्हे नोंदवले गेले. २०२२ मध्ये ८३५५, २०२३ मध्ये ९५७० आणि २०२५ मध्ये आतापर्यंत २ हजाराहून अधिक गुन्हे नोंदवले गेलेत. महिला सुरक्षेत सरकार अपयशी ठरले आहे. संतोष देशमुख, सोमनाथ सूर्यवंशी अशा हत्या झाल्या आहेत. देशमुख प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे अजूनही बेपत्ता आहे असा आरोप विरोधकांनी केला. दरम्यान, मागच्या अधिवेशनापासून आतापर्यंत विदर्भात ७५ लोकांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. २०२० ते २०२४ या कालावधीत २१८ मृत्यूची नोंद आहे. २०२५ मध्ये नाशिक, पुणे येथे बिबट्यांच्या हल्ल्यात हजारो नागरीक जखमी झाले. सरकारकडून कुठल्याही उपाययोजना केल्या जात नाही. राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कंत्राटदारांच्या आत्महत्या, बेरोजगार युवक आत्महत्या करतायेत. ११ वर्षाच्या भाजपा कालावधीत विदर्भात रोजगारासाठी युवकांना का भटकावे लागते याचे उत्तर सरकारकडे नाही. सत्तेचा उपयोग कुणासाठी आहे हा प्रश्न जनतेला पडला आहे. राज्यात ७ लाख कोटींच्या जमिनी अदानींच्या घशात घातल्या आहेत. कवडीमोल भावात या जमिनी दिल्या गेल्या. पुण्यातही सरकारी जमीन हडपण्याचा प्रयत्न केला अशा विविध आरोपांनी विरोधकांनी सरकारला घेरले आहे.

### एक कोटी १० लाखांचा चरस मुंब्र्यात जप्त

मोहम्मद हारून सिद्धीकी याने जप्त केलेला चरस मोठ्या प्रमाणात जम्मू-काश्मीर राज्यातून ठाणे परिसरात विक्रीसाठी आणल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याच्यावर यापूर्वी राजस्थानमधील अजमेर येथेही गुन्हा दाखल आहे. पोलीस त्याचे जम्मू-काश्मीरमधील संपर्क आणि अन्य गुन्हेगारी नोंदी तपासत आहेत. कारवाईचा धडाका मुंब्रा पोलीस ठाण्याच्या एनडीपीएस पथकाने अमली पदार्थांची विक्री व सेवन करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा धडाका कायम ठेवला आहे. आतापर्यंत ३२४ सेवन करणाऱ्यांवर आणि २७ ताबा (विक्री) कारवाई करण्यात आली आहे. ताबा कारवाईत एकूण तीन कोटी ४१ लाख ०५ हजार रुपयांचा अमली पदार्थ जप्त करण्यात यश आले आहे. विक्री व सेवन करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई सुरू राहील, असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिंदे यांनी स्पष्ट केले.

### रायगडमध्ये स्थलांतरित पाहुण्यांचे आगमन

प्राणी, मासे, जलकीटक खाऊन पर्यावरणाचे संरक्षण व जैवविविधता समृद्ध करण्यासाठी हे स्थलांतरित पक्षी महत्त्वाची भूमिका बजावत असतात. या पक्ष्यांचे दर्शन जिल्ह्यातील समुद्रकिनारे, दलदलीच्या जागा, जंगले, भातशेते, खाड्या तसेच गवताळ प्रदेशात सध्या होत आहे. परिणामी पक्षी अभ्यासक व निरीक्षकांना तसेच पर्यटकांना ही मोठी पर्वणीच आहे.

**जगण्यासाठी प्रवास**

उत्तर गोलार्धातील युरोप, रशिया आणि उत्तर अमेरिका यासारख्या देशांत थंडीच्या दिवसांत पडणाऱ्या बर्फामुळे जमिनीवरील भूभाग हा बर्फाने आच्छादलेला असतो. त्यामुळे पक्ष्यांना खाद्य मिळणे कठीण होऊन जाते म्हणून हे पक्षी विविध देशात स्थलांतर करून आपली उपजीविका भागवतात. तसेच आपल्याकडे पडणारी थंडी आणि पुरेशा प्रमाणात मिळणारे खाद्य तसेच योग्य अधिवास या सर्व कारणांमुळे या पक्ष्यांना आपली घरटी बांधून पिल्लांचे संगोपन करणे सोपे जाते. म्हणून बऱ्याच स्थलांतरित पक्ष्यांचा विणीचा काळ सुद्धा हाच असतो.

### गोव्यात नाईट क्लबमध्ये अग्नितांडव

कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

भाजप आमदार मायकल लोबो यांनी या दुःखद घटनेनंतर सुरक्षा ऑडिटची तातडीने गरज असल्याचे प्रतिपादन केले. आपल्याला गोव्यातील इतर सर्व क्लबचे सुरक्षा ऑडिट करावे लागेल, जे खूप महत्वाचे आहे, असे ते म्हणाले. पर्यटकांनी नेहमीच गोव्याला एक अतिशय सुरक्षित ठिकाण मानले आहे, परंतु ही घटना खूपच अस्वस्थ करणारी आहे आणि भविष्यात अशा घटना घडू नयेत, असे ते म्हणाले.

**पंतप्रधान मोदींनी व्यक्त केला शोक**

गोव्यातील अर्पोरा येथील आगीची दुर्घटना अत्यंत दुःखद आहे. ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले आहे त्यांच्याबद्दल माझ्या संवेदना आहेत. जखमी लवकरात लवकर बरे व्हावेत अशी प्रार्थना करतो. गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत जी यांच्याशी परिस्थितीबद्दल बोललो. राज्य सरकार बाधितांना सर्वतोपरी मदत करत आहे.

### कार दरीत कोसळली; ५ जण दगावल्याची भीती

तोडला आणि थेट खोल दरीत कोसळली. अपघातानंतर तातडीने बचावकार्य सुरू करण्यात आले असून, मृतदेह दरीतून बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. अद्याप मृतांची ओळख पटलेली नाही. या अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

घाटाच्या काही भागातील संरक्षक भिंतींचे काम अपूर्ण असल्यामुळे हा अपघात घडल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. संरक्षणाची पुरेशी व्यवस्था नसताना या रस्त्यावरून वाहतूक सुरू असल्याने अशा दुर्घटना घडत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या भीषण अपघातामुळे सप्तशृंगीगड परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### ४०० मीटर उंच लावा उसळला

बाहेरील परिसराला तत्काळ कोणताही धोका नाही. उद्रेकाचा भाग असलेला पार्क परिसर आधीच बंद करण्यात आला आहे. हवाई वोल्केनो ऑब्झर्वेटरीचे प्रमुख वैज्ञानिक केन होन म्हणाले, हा अत्यंत दुर्मिळ आणि असामान्य उद्रेक आहे. तीनही फव्वारे एकाच उंचीवर उसळताना पाहणे म्हणजे निसर्गाची प्रचंड शक्ती अनुभवण्यासारखे आहे. सध्या कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान नोंदले गेलेले नाही. आसपासच्या भागात हलकी राख पडण्याचा अंदाज असल्याने नागरिकांना मास्क वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# ‘दिबा पायी दिंडी’चा मार्ग ठरला

## २२ डिसेंबर रोजी भिवंडीतून निघणार

■ रायगडसह चार जिल्ह्यातील भूमीपुत्र एकवटले

■ बाळ्यामामांच्या नेतृत्वाखाली आयोजन

### चार दिवसांत नवी मुंबई विमानतळ गाठणार



| कर्जत | प्रतिनिधी |

लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई विमानतळाला दिले जात नाही. त्यामुळे चार जिल्ह्यातील भूमिपुत्र एकवटले असून २२ डिसेंबर पासून ‘दिबा’ पायी दिंडी भिवंडी येथून निघून नवी मुंबई विमानतळ येथे धडक देणार आहे. आक्रोश दिंडीचे समन्वयक निलेश पाटील यांनी डोंबिवली येथील सभेत या पायी दिंडीचा मार्ग जाहीर केला आहे.

शेतकऱ्यांसाठी जमिनीच्या बदल्यात जमीन देण्याचा ऐतिहासिक निर्णय माजी खासदार व राज्य विधान परिषदेचे माजी विरोध पक्षनेते दि.बा. पाटील यांच्या माध्यमातून राज्यसरकारने घेतला होता. तर, राज्यात स्त्री भ्रूण हत्या आणि कुळ कायदा बनविण्यात महत्वाची भूमिका बजावणारे त्यांचे योगदान नवीन मुंबई शहराच्या उभारणीत आहे. त्यामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिबांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी गेली दहा वर्षे केली जात आहे. या मागणीच्या निमित्ताने राज्य सरकारने आपला ठराव केंद्र सरकारला दिला आहे. तसेच, त्यासाठी अनेक आंदोलने उभी राहिली आहेत. परंतु, केंद्र सरकारकडून कोणताही निर्णय घेतला जात नाही. त्यातच या विमानतळावरून चालू महिन्यात उड्डाण सुरू होणार असल्याने भूमिपुत्र अधिक आक्रमक झाला आहे. या भूमिपुत्रांकडून वेळोवेळी आंदोलने करण्यात आली असून आता हे आंदोलन खासदार सुरेश म्हात्रे तथा बाळ्यामामा यांनी हातात घेतले आहे. त्यानुसार कार रॅलीनंतर आता आरपारची लढाई लढली जात असून खासदार सुरेश म्हात्रे यांच्या नेतृत्त्वाखाली ‘दिबा पायी दिंडी’चे आयोजन करण्यात आले आहे. ही दिंडी भिवंडी येथील मानकोली नाक्यापासुन ठाणे त्यानंतर ऐरोलीवरून ठाणे-पनवेल राष्ट्रीय महामार्गाने नवी मुंबई विमानतळ येथे धडक देणार आहे.

या रॅलीचे मार्गाबाबत आक्रोश रॅलीचे समन्वयक आणि नवी मुंबई आगरी कोळी युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष निलेश पाटील यांनी डोंबिवली येथील सभेत याबाबत माहिती दिली. भिवंडीचे मानकोली नाका येथून सोमवारी (दि.२२) सकाळी पायी दिंडी मार्गस्थ होणार आहे. त्यात सुरुवातीला किमान २५ हजार भूमिपुत्र सहभागी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. ही दिंडी दुपारच्या वेळेस खारेगाव-ठाणे येथे विसावा घेईल. त्यानंतर ही पायी दिंडी ठाणे शहरातून सायंकाळी १५ किलोमीटर अंतर पार करून ऐरोली येथे मुक्कामासाठी थांबणार आहे. दिंडीत चालणाऱ्या महिलांना सायंकाळी आपल्या घरी पोहचता यावे यासाठी बसेसची व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यानंतर ही पायी दिंडी मंगळवारी (दि.२३) सकाळी ऐरोली येथून सुरू होईल आणि पुढे दुपारी १५ किलोमीटर अंतर पार करून सीबीडी येथे मुक्काम करेल. तर, अंतिम पडाव पार करण्यासाठी बुधवारी (दि.२४) रायगड, ठाणे, पालघर व मुंबई जिल्ह्यातील भूमिपुत्र हे हजारांचे संख्येने या दिंडी सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. त्याचबरोबर नवी मुंबईमधील दोन दिवसांच्या मुक्कामाची सर्व व्यवस्था नवी मुंबई भूमिपुत्र यांनी घेतली आहे. विशेष म्हणजे खासदार सुरेश म्हात्रे आणि समाजातील आजी-माजी पदाधिकारी हे देखील या पायी दिंडीत चालणार आहेत.

### सरकारकडून निर्णयाची अपेक्षा

राज्य सरकारने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याचा ठराव घेतला आहे. मात्र, केंद्र सरकारकडून मागील दोन वर्षांपासून कोणत्याही हालचाली होत नाहीत. त्यामुळे भूमिपुत्र लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नावासाठी आक्रमक झाला आहे. आगामी काळात महापालिका आणि जिल्हा परिषद पंचायत समित्या यांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. ही परिस्थिती लक्षात घेऊन त्या निवडणुकीच्या मतांवर परिणाम होऊ नये यासाठी केंद्र सरकारकडून निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## कार्यकर्त्यांची आकडेमोड सुरू

| पेण | प्रतिनिधी |

जिल्ह्यातील नगरपालिका निवडणूकीची प्रक्रिया २ डिसेंबर रोजी पार पडली. मतदान प्रक्रिया सुरू असतानाच राज्यातील थांबलेल्या इतर नगरपालिकेंच्या निवडणूकांमुळे ३ डिसेंबरचा निकाल २१ डिसेंबरपर्यंत लांबणिवर गेला. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. निकाल दुसऱ्या दिवशी मिळेल या खात्रीने उमेदवारांनी तयारीही केली होती. परंतु, आता निकालासाठी अजून काही दिवसांची प्रतिक्षा करावी लागणार असल्याने सर्वच पातळीवर आकडेवारीचे गणित सूरू झाले आहे. कोणत्या भागत किती मते मिळू शकतील, कुणी साथ दिली, कुठे दगाफटका झाला. कोणता प्रभाग मजबूत किंवा कमजोर? याचा तपशीलवार अभ्यास, उमेदवार व कार्यकर्त्यांकडून सुरू आहे.

## आंबेवाडीत ‘तिरडी यात्रा’ आंदोलन



| कोलाड | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा महामार्गाचे काम गेल्या १७ वर्षांपासून रखडले असुन लोकनेत्यांकडून दरवर्षी नवीन डेडलाईन देण्यात येते. परंतु, महामार्गाचे काम काही पूर्ण होत नाही. या अपूर्ण कामामुळे असंख्य अपघात, मृत्यु व ढिलाई याची अखंड मालिका सुरु आहे. यामुळे आजवर साडेचार हजारहुन अधिक जणांना जिव गमवाया लागला आहे. तरीही जबाबदारांवर कारवाई झालेली नाही. त्यासाठी कोकणकरांनी ‘तिरडी यात्रा’ आंदोलन सुरु केले आहे. दरम्यान, आंबेवाडी नाक्यावर रविवारी (दि.७) सकाळी या ‘तिरडी यात्रा’ आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते.

विविध मागण्यांच्या पुर्ततेसाठी या ‘तिरडी यात्रा’ आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. रविवारी लोणेरे ते कोलेटीपर्यंत तिरडी यात्रेच्या आंदोलनाचे आयोजन करण्यात आले असुन हे आंदोलन कोलेटी ते संगमेश्वरपर्यंत ११ जानेवारीपर्यंत सुरु राहणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. त्यात मुंबई-गोवा महामार्गाचे तटस्थ, पारदर्श, प्रभावी परीक्षण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करावी. तसेच, या समितीमध्ये जनआक्रोश समितीचे ४ सदस्य समाविष्ट करावे. मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाला विलंब आणि निष्काळजीपणासाठी जबाबदार अधिकारी व ठेकेदारांवर कायदेशीर कारवाई करावी. महामार्गाच्या कामासाठी स्पष्ट व अंतिम मुद्दत जाहीर करून तिचे काटेकोर पालन करावे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीने उपाययोजना करावी. त्याचबरोबर अपघातग्रस्तांना आर्थिक मदत द्यावी. महामार्गावर सुसज्ज ट्रामा केअर सेंटर उभारावे. नष्ट झालेल्या झाडांची भरपाई म्हणून वृक्षरोपण करावे, त्याचे जतन व पोषण सरकारकडे द्यावे, अशा मागण्या या आंदोलनात करण्यात आल्या आहेत.

## महागणपतीच्या दर्शनासाठी भक्तांचा उच्चांक



| चिरनेर | प्रतिनिधी |

संकष्टी चतुर्थी निमित्ताने उरणमधील चिरनेर महागणपतीच्या दर्शनासाठी रविवारी (दि.७) कडाक्याच्या थंडीत पहाटेपासूनच भाविकांनी रांगा लावल्या होत्या. पहाटे चार वाजल्यापासून गणेश भक्तांच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले होते. प्रथमता: श्री महागणपतीची महापूजा करण्यात आली. त्यानंतर गणेश भक्तांनी श्रींच्या दर्शनाला सुरुवात केली. काही भाविकांनी पायी वारी करीत गणेश मंदिर गाठून श्रींचे दर्शन घेतले. तसेच, दिवसभर श्री महागणपतीच्या मंदिरात भजनांचा सूर ऐकायला मिळाला. यावेळी संकष्टीला रविवारचा सुट्टीचा दिवस असल्यामुळे भाविकांच्या गर्दीचा उच्चांक पाहायला मिळाला. तसेच, संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने हार, गावठी भाज्या, वाल व चवळीच्या शेंगा, रानटी कंदमुळे, स्थानिक कुंभारानी बनविलेली मातीची भांडी त्याचबरोबर अन्य पदार्थांच्या विक्रीला ग्राहकांनी पसंती दर्शविल्याचे निदर्शनास आले. चिरनेर परिसरातील अनेक रहिवाशांना दर महिन्याच्या संकष्टी चतुर्थी निमित्ताने रोजगार मिळत आहे.

## माथेरानमधील चामड्याच्या वस्तू दिल्लीत

■ चर्मवस्तूंच्या कारागिराचे कौतूक



| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी बनवलेल्या चामड्याच्या वस्तू नवी दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात मांडण्यात आल्या आहेत. या वस्तूंना आंतराराष्ट्रीय प्रदर्शनात मोठी मागणी असल्याचे दिसून येत असून राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी माथेरानमधील चामड्याच्या वस्तूंचे कौतुक केले.

माथेरानमधील ओम लेदर आर्टमध्ये बनविण्यात आलेली चर्म उत्पादने नवी दिल्ली आंतरराष्ट्रीय प्रदर्शनामध्ये मांडण्यात आली आहेत. या वस्तू खरेदीसाठी ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी माथेरानचे चर्मउद्योजक चंद्रकांत काळे आणि हर्षदा काळे यांनी आपल्या चप्पल, बुट व सँडल अशा चर्म वस्तूंचे स्टॉल आंतरराष्ट्रीय व्यापार मेला प्रदर्शनामध्ये मांडले होते. माथेरानच्या कोल्हापुरी आणि फॅन्सी चपलांना देखील दिल्लीच्या ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. यादरम्यान, महाराष्ट्राचे उद्योग मंत्री उदय सावंत यांनी स्वतः माथेरानच्या चर्मोद्योग ओम लेदर आर्ट स्टॉलला भेट देऊन चर्म उत्पादनाची पाहणी केली. त्यावेळी चंद्रकांत काळे यांच्या चर्मवस्तूंच्या कारागिरीची स्तुती केली आहे. भारतभर व प्रदेशात आपला चर्मोद्योग पोहोचवणारे चंद्रकांत काळे आणि हर्षदा काळे यांनी आपल्या चर्मोद्योग व्यवसायाच्या माध्यमातून पर्यटक स्थळ माथेरानचे नाव दर्जे दार उत्पादनाच्या माध्यमातून अव्वल स्थानी पोहोचवले आहे. आपल्या या व्यवसायाच्या सफलतेमुळे स्वतः चंद्रकांत काळे व हर्षदा काळे यांनी समाधान व्यक्त केले आहे.

## चारचाकी गाडीला अचानक आग

| महाड | प्रतिनिधी |

महाड तालुक्यातील डॉ. कोल्हे दवाखान्यासमोर हेरंब बिल्डिंगखाली पार्क केलेल्या चारचाकी वाहनाला अचानक आग लागली. आग लागल्याची माहिती मिळताच महाड नगरपरिषद अग्निशमन दल तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाने तत्परतेने पाणी मारून आगीवर काही वेळातच नियंत्रण मिळवत आग विझवण्यात यश आले. हे वाहन महेश इब्राहिम पुरकर यांचे असल्याचे समजते. घटनास्थळी अग्निशमन विभागातील कर्मचारी गोविंद साळुंखे, शेखर भोसले, संकेत खोपकर, प्रतीक शितोळे, केदार देसाई, आदित्य खोत तसेच अग्निशमन विभागाचे ठेकेदार शशिकांत कदम आणि सेवा निवृत्त अधिकारीगणेश पाटील उपस्थित होते.

## पालीत भक्तीमय उत्साह



| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीत रविवारी (दि.७) भक्तीमय वातावरण फुलले होते. वर्षातील शेवटची संकष्टी असल्याने बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. यावेळी मंदिर परिसर यात्रेच्या स्वरूपात गजबजून गेला होता. मंदिर व गाभाऱ्यात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. बल्लाळेश्वराला पारंपरिक आभूषण व वस्त्र परिधान करण्यात आले होते. मंदिराच्या प्रांगणात रंगीबेरंगी रांगोळ्यांनी वातावरण अधिकच मंगलमय केले होते. दर्शनासाठी रायगड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्र आणि देशभरातून भाविक पालीत दाखल झाले होते. काही भाविकांनी पायी प्रवास करत, तर काहींनी दिंडीच्या माध्यमातून मंदिरात हजेरी लावली होती.

अॅड. गौतम पाटील यांचा अभिष्टचिंतन सोहळा | रक्तदान शिबीर, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## जेएसएम कॉलेजात विविध कार्यक्रमांचे आयोजन



| अलिबाग | प्रतिनिधी |

जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अॅड. गौतम पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जेएसएम महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महपरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम, रक्तदान शिबीर, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी जेएसएमच्या उपाध्यक्षा डॉ. साक्षी पाटील, सचिव गौरव पाटील, संचालिका शारदा धुळप, कायदेशीर सल्लागार अॅड. सचिन जोशी यांच्यासह अॅड. महेश पटेल, आर्य पाटील, डॉ. सोनाली पाटील, डॉ. नीलम हजारे, डॉ. सिमंतिनी ठाकूर, डॉ. प्रविण गायकवाड, अजय सावंत, भारती पाटील, संतोष मढवी तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. सर्वप्रथम रामशेठ ठाकूर ग्रंथालयात महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मुख्य रंगमंचावर रक्तदान शिबिराचे उद्घाटन जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अॅड. गौतम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन रक्तदान केले. रक्तदान शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना, एच.डी.एफ.सी बँक अलिबाग आणि सिव्हिल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. त्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र क्रिकेट नेट्स व पॅविलियन याचे उद्घाटन देखील अॅड. गौतम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमादरम्यान, कै. जयवंत केळुसकर सभागृहात जेएसएम महाविद्यालयातील विविध ज्ञानशाखांमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण होऊन पदवी संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा अॅड. गौतम पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र, रोख बक्षीस आणि पदक देऊन सत्कार करण्यात आला. आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना अॅड. गौतमभाई पाटील यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण असणारा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा कै. जयवंत केळूसकर सभागृहात पार पडला. यावेळी अॅड. गौतम पाटील यांच्या कुटुंबीयांसह माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, माजी नगरसेवक अॅड. मानसी म्हात्रे, प्रदिप नाईक, अनिल चोपडा, संजना किर, शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस सुरेश घरत आदि मान्यवरांसह मित्र परिवार, कला, क्रीडा, सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, जनता शिक्षण मंडळाचे सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत शैक्षणिक कार्यातील त्यांचे योगदान अधोरेखित केले.

## निवडक



### जनसंपर्क कार्यालयाचे लोकार्पण

**तळा :** शहरात शिवसेना (उद्धव ठाकरे) जनसंपर्क कार्यालयाचा लोकार्पण सोहळा दक्षिण रायगड जिल्हा प्रमुख नंदू शिर्के यांच्या हस्ते पार पडला. या कार्यालयामुळे तळा तालुक्यात ठाकरे गट वाढण्यासाठी मदत होणार आहे. शिवसेना शिंदेगट, भाजप व राष्ट्रवादी अजित पवार गट हे तिन्ही पक्ष महायुतीत एकत्र असून तालुक्यातील विविध मूलभूत समस्या, नागरिकांच्या अडचणी याकडे लक्ष द्यायला तयार नाहीत. त्यामुळे तालुक्यातील विविध समस्यांबाबत आवाज उठवण्याचे काम शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्ष नेहमीच करणार असून तालुक्यातील सर्वसामान्य जनतेला आपले प्रश्न मांडण्यासाठी हक्काची जागा म्हणून हा जनसंपर्क कार्यालय कायम कार्यरत राहणार आहे. तसेच, जनसामान्यांचे प्रश्न या कार्यालयाच्या माध्यमातून सोडवण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे प्रतिपादन शिवसेना (उद्धव ठाकरे) तालुका प्रमुख विलास ठसाळ यांनी केले. यावेळी जिल्हा प्रमुख नंदू शिर्के, चेतन पोटफोडे, अरीफ मनेर, भगवान शिंदे, नजीर पठाण, हरिश्चंद्र म्हातले, गणेश निवाते, सुनिल जाईलकर यांसह शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### चांद्रयान-३ ठरले विशेष आकर्षण

**पोलादपूर :** तालुका विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन नरवीर तानाजी विद्यालय देवळे येथे करण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनात तालुक्यातील सर्व शाळेतून सुमारे ४० प्रतिकृती प्रदर्शनात मांडण्यात आल्या होत्या. यावेळी देवळे विद्यालयाचे विज्ञान शिक्षक सुखलाल बागुल यांनी तयार केलेली ‘चांद्रयान-३’ ही प्रतिकृती विशेष आकर्षण ठरली. यावेळी व्यासपीठावर चंद्रकांत कळंबे, शैलेश सलागरे, ज्ञानदेव केसरकर, तुकाराम केसरकर, सुभाष साळुंखे, सुरेश साबळे, मारुती कळंबे, विजय पवार, ज्ञानोबा रेणोसे, विक्रम केसरकर, शिवाजी केसरकर, आनंद केसरकर, विनायक केसरकर, धर्मेंद्र रिंगे, राकेश पिंगळा, किसन सुरवसे, नवाज तांबोळी, टी.डी. जाधव, सुनील शिंदे, विद्याधर कोळसकर आदि मान्यवरांसह बहुसंख्येने शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व बाल वैज्ञानिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन दाखल

**पेण :** गुन्हे अन्वेषणाची गती वाढवण्यासाठी आणि गुन्ह्याच्या ठिकाणीच तात्काळ वैज्ञानिक पुरावे गोळा करून त्यांचे विश्लेषण करण्याच्या उद्देशाने पेण उपविभागीय पोलीस कार्यालयात अत्याधुनिक मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन दाखल झाली आहे. पेणसह खालापूर आणि कर्जत परिसरात या व्हॅनद्वारे विशेष तपास पथकाची नेमणूक करण्यात आली असून गुन्हे शोधात मोठी मदत होणार आहे. रायगड जिल्ह्यातील प्रत्येक उपविभागीय पोलीस कार्यालयाला एक मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन देण्याचा उपक्रम राबविला जात आहे. ७ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक शिक्षेच्या गुन्ह्यांमध्ये फॉरेन्सिक पुरावे अति महत्वाची भूमिका बजावतात. यामुळे अशा गंभीर गुन्ह्यांचा तपास जलद गतीने आणि वैज्ञानिक पद्धतीने पूर्ण करण्यासाठी या व्हॅनचा उपयोग होणार आहे. या मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनमध्ये अत्याधुनिक यंत्रसामग्री, डिजिटल फॉरेन्सिक किट, पुरावे जतन व विश्लेषणासाठी विशेष साधने तसेच प्रशिक्षित पथकाची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे गुन्ह्याच्या ठिकाणीच वैज्ञानिक तपासणी त्वरित सुरू करता येऊन पुरावे सुरक्षित ठेवणे आणि प्राथमिक निष्कर्ष मिळवता येणार आहेत. त्यामुळे तपास प्रक्रियेला मोठी गती मिळणार आहे.



### तालुकास्तरिय विज्ञान प्रदर्शन

**म्हसळा :** देशातील विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहे. तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बालवैज्ञानिकांना आपल्यातील सुप्त गुण सादर करण्यासाठी एक चांगली संधी उपलब्ध होते. अश्या प्रकारे मिळणाऱ्या संधीचा योग्य तो फायदा उठविल्यास विज्ञानाच्या दृष्टीकोनातून देशाची झपाट्याने प्रगती होण्यास वेळ लागणार नाही, असे प्रतिपादन मंत्री आदिती तटकरे यांनी केले. पंचायत समिती शिक्षण विभाग व आयडियल इंग्लिश स्कूल आणि जुनिअर कॉलेज म्हसळा यांच्या विद्यमाने तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शन उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी गटविकास अधिकारी माधव जाधव, निवासी नायब तहसीलदार डॉ. मृणाली शिरसाट, गटशिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे, उपनगराध्यक्ष अनिकेत पानसरे, अनिल बसवत, बारी, नितीन पाटील, सलीम शहा, अ. रहमान घराडे, गणित विज्ञान मंडळ अध्यक्ष, सर्व केंद्र प्रमूख, विस्तार अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इंडिगोपुढे लाचारी का?

नरेंद्र मोदी सरकार मनात आणले तर कोणाच्याही घरावर बुलडोझर चालवू शकते, इडीच्या धाडी टाकू शकते, लाखो भक्तांमार्फत ट्रोल करू शकते. पण इंडिगो नावाच्या विमान कंपनीला ते हातही लावू शकत नाही. इंडिगोने गेले आठ दिवस लाखो प्रवाशांचा छळ चालवला आहे. त्यातले बहुसंख्य लोक हे भाजपचे भक्त आणि हिंदू आहेत. पण या छळापासून मोदीदेखील त्यांना वाचवू शकत नाहीत. उलट मोदी सरकार इंडिगोपुढे लाचार झाले आहे. त्याला विनवण्या करते आहे. त्याच्या अटीशर्ती मान्य करते आहे. अदानीविरुध्द अमेरिकी कंपनीने काही आरोप केले तर हे सरकार गप्प राहते.एका डॉलरला ९० रुपये अशी किंमत झाली तरी हे सरकार गप्प राहते. आणि आता, इंडिगोसारख्या छोट्या कंपनीने सगळ्यांना वेठीला धरले तरी ते गप्प राहते. हेच सरकार आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर टर्रेबाजी करते. काही करून ते दिल्लीला पोचणार नाहीत याची काळजी घेते. पण इंडिगो प्रकरणात त्याची बोलती बंद होते. या सरकारचे चारित्र्य किती किडलेले आहे याचे दर्शन अशा प्रसंगांमधून होते. विमान प्रवासासंदर्भातले सुरक्षेचे नियम सरकारशी संबंधित यंत्रणाच तयार करते. जगभरात असे आढळले आहे की, विमान अपघातातील दर पाचापैकी एक अपघात वैमानिकांना पुरेशी विश्रांती न मिळाल्याने होतो. हे लक्षात घेऊन विश्रांतीबाबतचे नियम अधिक कडक करण्यात आले व गेल्या वर्षी म्हणजे २०२४ मध्ये त्यांची घोषणा करण्यात आली. एका आठवड्याच्या कामानंतर पायलटना ३६ तास नव्हे तर पूर्ण ४८ तासांची विश्रांती मिळायला हवी असे ठरवण्यात आले. विमान उड्डाणापेक्षाही ते सुरक्षितपणे खाली आणणे व उतरवणे म्हणजेच लँडिंग हा अत्यंत कौशल्याचा भाग असतो. ते फार वेगाने वा अतिशय हळूपणे आणता येत नाही. शिवाय हवेतून जमिनीवर उतरताना फार जोराने आदळणार नाही याची काळजी घ्यावी लागते. अनेक ठिकाणी धावपट्ट्या अवघड जागी असतात. धुके वा पावसामुळे त्या नीट दिसत नाहीत. साहजिकच पायलटच्या मनावर सर्वाधिक ताण त्यावेळीच असतो.

## भाजपला मिळालेल्या देणग्या

त्यातही रात्री बारा ते सकाळी सहा ही इतर कोणाही माणसाप्रमाणे पायलटच्या शरीराचीही झोपेची वेळ असते. त्यावेळी असे काम करणे अधिक जोखमीचे ठरते. हे ध्यानात घेऊन आठवड्यातून केवळ सहाऐवजी दोनच वेळा असे विमान उतरवण्याचे काम करता येईल असे नवे बंधन या नियमांमध्ये घालण्यात आले. अधिकची विश्रांती व विमाने उतरवण्याच्या कामावर बंधने घालण्यात आल्याने पायलटच्या कामाचे वेळापत्रक गडबडणार हे स्पष्ट होते. विमान कंपन्यांना अधिक पायलट तसेच इतरही कर्मचारी घेणे अनिवार्य ठरणार होते. त्यामुळे गेल्या वर्षी या कंपन्यांनी सरकारकडे मुदत मागितली. त्यानुसार हे नियम एका वर्षाने म्हणजे यंदा जूनपासून लागू करण्याचे ठरले. म्हणजे पायलट व इतर कर्मचाऱ्यांची संख्या तसेच विमाने यांची सांगड घालणे व नवीन वेळापत्रक ठरवणे यासाठी सर्व कंपन्यांना जवळपास अठरा महिने वेळ होता. पण इंडिगोने यात लबाडपणा केला. त्याने आहेत तितकेच पायलट कायम ठेवले. होता होईल तो तसेच काम दडपून नेऊ असे त्याचे धोरण होते. त्याहूनही कहर म्हणजे नाताळ व वर्षाअखेरीसाठी या कंपनीने आणखी नवी सेवा वाढवल्या. सरकारचे सर्वात कडक नियम नोव्हेंबर अखेरीला लागू झाले. तरीही इंडिगोचे जुने वागणे चालू होते. याचा व्हायचा तोच परिणाम झाला. नवीन नियमांनुसार विश्रांती न मिळालेल्या वैमानिकांना कामावर येऊ देण्यास सरकारने मनाई केली. इंडिगोच्या सेवेचे वेळापत्रक बोंबलले. या देशात एअर इंडिया व इतरही काही छोट्या विमान कंपन्या आहेत. पण त्यांच्या सेवेवर याचा परिणाम झाला नाही. कारण, त्यांनी या नियमांचे पालन केले. इंडिगो मात्र मग्रुरी करीत राहिली. इंडिगोच्या मालकांचे मोदी सरकारशी जवळचे संबंध आहेत. आता बेकायदा व भ्रष्ट ठरलेल्या मोदींच्या निवडणूक रोख्यांमधून इंडिगो कंपनीने ३६ कोटी व तिचे म ालक राहुल भाटिया यांनी २० कोटी रुपये भाजपला दिले होते. या देणगीपायीच मोदी सरकार इंडिगोपुढे लाचार व दीनवाणे झालेले दिसते.

## प्रवाशांच्या जिवाशी खेळ

चारच दिवसांपूर्वी या सरकारने कामगारांसाठीचे नवे कायदे आणले. आपण कुरियरने वस्तू पोचवणाऱ्या व हमालकाम करणाऱ्या कामगारांसाठी म्हणजेच गिग वर्कर्ससाठी कसे नवे नियम करीत आहोत हे सरकारने ओरडून सांगितले. पण आता तेच सरकार वैमानिक तसेच हवाई सुंदरी व इतर कर्मचाऱ्यांबाबत आपणच केलेले नवीन कडक नियम अमलात आणू शकलेले नाही. इंडिगोच्या माजामुळे गेल्या चार दिवसात सुमार दोन ते तीन हजार विमानसेवा रद्द झाल्या आहेत. शेकडो विमाने उशिरा धावत आहेत. प्रवासी बारा, चोवीस, छत्तीस तास विमानतळांवर अडकून पडत आहेत. प्रवाशांचे सामान बेवारस टाकले जात आहे. त्यांना अन्नपाणी मिळत नाही. पर्यायी तिकिटे भयंकर महाग. मुंबई ते पुणे विमान प्रवासाचे तिकिट एक लाख रुपयांवर गेले होते. चार दिवस हे सगळे चालू असताना सरकारी यंत्रणा मात्र हातावर हात ठेवून पाहत होत्या. मग खूपच ओरडा झाला तेव्हा नवीन नियमांकडे बोट दाखवले गेले व त्यांनाच खलनायक ठरवले गेले. अशा वेळी वास्तविक सरकारने इंडिगोवर कडक फौजदारी कारवाई करायला हवी होती. तिला दंडही करायला हवा होता. प्रत्यक्षात विमान प्रवाशांचे हाल होत आहेत असे कारण देऊन हे नियम फेब्रुवारी महिन्यापर्यंत स्थगित ठेवण्याचे सरकारने मान्य केले. इंडिगोला नेमके हेच हवे होते. किंबहुना, प्रवाशांचे हाल झाले की सरकार झक मारत आपली मागणी मान्य करेल असा हेतू ठेवून हा सगळा तमाशा इंडिगोने जाणूनबुजूनच केला की काय असा संशय घ्यायला भरपूर जागा आहे. आपल्या नियोजनात गडबड झाली अशी कबुली आता इंडिगोने दिली आहे. पण ही निव्वळ लबाडी आहे. नव्या नियम ानुसार आपल्याला किती वैमानिक व इतर कर्मचारी लागतील इत्यादी गोष्टी इंटरनेट व एआयच्या मदतीने काही तासांमध्ये करता येऊ शकतात. त्या जर करता येत नसतील तर इंडिगोच्या मालकाला विमान कंपनीही चालवू देता कामा नये. एक बेजबाबदार कंपनी प्रवाशांच्या जिवाशी खेळत असून मोदींचे सरकार काहीही करू शकत नाही हे लाजिरवाणे आहे. सरकारने मारल्यासारखे करायचे आणि इंडिगोने रडल्यासारखे दाखवायचे असे हे सगळे नाटक चालू आहे. अदानी, इंडिगोचा मालक इत्यादी भांडवलदारांपुढे मोदी सरकार लोटांगणे घालते हेच यावरून दिसून येते. मोदींच्या मूर्ख भक्तांना इंडिगो प्रकरणानंतर तरी थोडी अक्कल येईल अशी आशा आहे.

विचार

# भाजपचे लक्ष पश्चिम बंगालकडे

***बिहार निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर भाजपाचा जल्लोष सुरु असतानाच वेळी पक्षाच्या बिहार हँडलवर 'अब पश्चिम बंगाल की बारी है' असा संदेश झळकला. जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असल्याचा दावा करणाऱ्या भाजपाचा अजेंडा काय आहे, याचा शोध घेतल्यास देशातील सर्व राज्यांमधील सत्ता काबीज करणे, हेच उत्तर मिळेल. त्यामुळे आता पश्चिम बंगालमधील निवडणुकीसाठी पक्ष सज्ज होत आहे, असे म्हणता येते.***



**महेश जोशी**

बिहार निवडणुकीनंतर देशातील राजकारण थोडा निवांतपणा अनुभवेल आणि पुढील काही काळ निवडणुकांची चर्चा होणार नाही, अशी अपेक्षा होती. मात्र बहुदा तसे घडणार नाही. एक निवडणूक जिंकल्यावर भारतीय जनता पक्ष पुढच्या निवडणुकीच्या तयारीला सुरूवात करतो. निवडणूक लढवण्यासाठी पक्षाची यंत्रणा आणि त्या त्या क्षेत्रातील कार्यकर्त्यांचे जाळे सतत कार्यरत राहील याची काळजी घेत असतो. प्रत्येक निवडणूक जिद्दीने लढवायची आणि जिंकण्यासाठीच लढायची हा मोदी-शहा याचा मंत्र आहे. पुढील निवडणुकीचा बिगूल निवडणूक आयोगाच्या अगोदर भाजपामध्ये फुंकला जातो. बिहार निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर पाटणा आणि दिल्लीमध्ये भाजपाचा जल्लोष चालू होता, मुंबई-महाराष्ट्रासह देशातील प्रत्येक लहान मोठ्या शहरात भाजपाच्या कार्यालयांसमोर गुलाल उधळला गेला आणि मिठाई वाटली गेली, पण त्याच वेळी पक्षाच्या बिहार हँडलवर 'अब पश्चिम बंगाल की बारी है' हा संदेश झळकला. जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असल्याचा दावा करणाऱ्या भाजपाचा अजेंडा काय आहे, याचा शोध घेतला तर देशातील सर्व राज्यात सत्ता काबीज करणे, हेच उत्तर मिळेल. एका राज्यात सरकार स्थापन केल्यानंतर दुसऱ्या राज्यात सत्ता कशी स्थापन करता येईल, याकडे भाजपाची सर्व यंत्रणा जुंपली जाते. एके ठिकाणी यश मिळाले म्हणून या पक्षात कोणी समाधानी नसते. 'शत-प्रतिशत भाजप' हेच पक्षाचे ध्येय आहे मोदी-शहा-नड्डांनी अनेकदा याचा पुनरूच्चार केला आहे. एका राज्यात सरकार स्थापन केल्यावर पक्षाची यंत्रणा निवांत बसत नाही, हीच या पक्षाची मोठी ताकद आहे.

बिहार निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर दिल्लीतील भाजपाच्या मुख्यालयात पक्ष कार्यकर्त्यांचा विजयी मेळावा झाला. आपल्या गळ्यातील गमचा बाहेर काढून हाताने उंच फडकवत मोदी पक्षाच्या मुख्यालयात आले. देशाचा पंतप्रधान पक्षाच्या मेळाव्यात भाजपाचा एक कार्यकर्ता म्हणून विजयोत्सव कसा साजरा करतो, हे तेव्हा अवघ्या देशाने बघितले. या मेळाव्यात बोलताना मोदी म्हणाले, गंगाजी (नदी) यहां बिहार से बहते हुए बंगाल तक पहुँचती है. बिहार ने बंगाल मे बीजेपी की विजय का रास्ता भी बना दिया है. मैं बंगाल के भाई और बहनोंको आश्वस्त करना चाहता हूँ कि अब बीजेपी आप के साथ मिलकर, पश्चिम बंगाल से भी जंगलराज को उखाड फेकेंगी. भाजप आघाडीला निवडून न दिल्यास बिहारमध्ये पुन्हा जंगलराज येईल, अशी भीती मोदी-शहांनी आपल्या प्रत्येक सभेत मतदारांना घातली होती. आता याच मुद्द्यावरून भाजपा पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणूक लढवणार आहे. बिहारमध्ये जंगलराज निर्माण करणारे लालूप्रसाद यादव होते, लालू-राबडीदेवींच्या काळात बिहार जंगलराज बनले होते, सूर्यास्तानंतर कोणत्याही शहरात-गावात सामान्य माणसाला घराबाहेर पडणे मुष्किल होते, आया बहिणींना कुठेही सुरक्षा नव्हती. लुटमार, हत्या, खंडण्यांनी बिहार ग्रासले होते. कायदा सुव्यस्था ढासळली होती. थोडीशी चूक केलीत तर बिहारमध्ये पुन्हा जंगलराज येईल अशी भीती मोदी-शहांनी बिहारच्या मतदारांना निवडणूक प्रचारात घातली होती. बिहारमध्ये लालूप्रसाद यादव आणि त्यांचा पुत्र तेजस्वी यादव तसेच त्यांचा पक्ष राजद यांना भाजपाने खलनायक ठरवले होते.

आता पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि त्यांचा पक्ष तृणमूल काँग्रेसला भाजपाने खलनायक ठरवायला सुरूवात केली आहे. बिहारमध्ये जंगलराज विरोधात भाजपाने रान पेटवले होते. आता पश्चिम बंगालमध्ये जंगलराज म्हणून आतापासूनच रान पेटवायला सुरूवात झाली आहे. पश्चिम बंगालमध्ये पुढील वर्षी एप्रिल महिन्यात विधानसभा निवडणूक होणार आहे म्हणूनच बिहारमध्ये एनडीएचे सरकार स्थापन होताच भाजपाने बंगालच्या निवडणूक प्रचाराचे फटाके फोडायला सुरूवात केली आहे. पश्चिम बंगालमध्ये विधानसभेच्या २९४ जागा आहेत. महाराष्ट्र आणि बिहार विधानसभेपेक्षा बंगालमध्ये आम दारांची संख्या जास्त आहे. कोविडनंतर २०२१ मधे झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपाने मोठ्या जिद्दीने बंगालमध्ये निवडणूक लढवली, आपला पाया विस्तारला आणि भक्कम केला, पण ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली तृणमूल काँग्रेसचे सरकार या राज्यात सलग तिसऱ्यांदा स्थापन झाले. पाच वर्षापूर्वी झालेल्या निवडणुकीत भाजपाने तृणमूल काँग्रेससमोर मोठे आव्हान उभे केले होते. ममता बॅनर्जींनी रस्त्यावर संघर्ष करून तब्बल तीन दशकांची मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची राजवट उद्ध्वस्त केली. आपला गाशा गुंडाळण्याची पाळी डाव्या पक्षांवर आणली. आता भाजपा ममता यांचे नेतृत्व आणि त्यांचा तृणमूल काँग्रेस पक्ष यांना नेस्तनाबूत करण्याची तयारी करत आहे. गेल्या निवडणुकीत तृणमूल काँग्रेसचे २१५ आम दार निवडून आले होते. तेव्हा भाजपाचे ७७ आमदार विजयी झाले होते. ज्या राज्यात भाजपाचा नामोनिशाणा नव्हता त्या राज्यात आता हजारो कार्यकर्ते भाजपाचे झेंडे हाती घेऊन रस्त्यावर उतरताना दिसत आहेत.

गेल्या निवडणुकीमध्ये तृणमूल काँग्रेसला ४८ टक्के तर भाजपाला ३८ टक्के मते मिळाली होती. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये या दोन पक्षांमध्येच चुरशीची टक्कर होणार हे निश्चित आहे. बिहारमध्ये भाजपाने नितीशकुमार यांना बरोबर घेऊन सत्ता पुन्हा काबीज केली. पश्चिम बंगालमध्ये भाजपाला मित्रपक्ष नाही, तिथे भाजपाला स्वत:च्या बळावर निवडणूक लढवावी लागणार आहे. बिहारमध्ये नितीशकुमारसारखा प्रादेशिक नेता भाजपाबरोबर होता, पश्चिम बंगालमध्ये असा एकही तगडा प्रादेशिक नेता भाजपाबरोबर नाही. म्हणूनच भाजपाला अचूक रणनिती आखून स्वत:च्या कार्यकर्त्यांची फौज घेऊन तृणमूल काँग्रेसशी लढावे लागणार आहे. बिहारमध्ये भाजपा सत्तेत होती, पश्चिम बंगालमधे सत्ता मिळवण्यासाठी भाजपा गेली अकरा वर्षे ममता बॅनर्जींच्या विरोधात लढत आहे. पश्चिम बंगालमध्ये गुंडाराज आहे, कायदा सुव्यवस्था पार ढासळली आहे. सत्ताधारी आणि भाजपा कार्यकर्त्यांमधे सतत राडे चालू असतात. बांगलादेशम धून मोठी घुसखोरी होत असून तृणमूल काँग्रेसचे त्यांना संरक्षण आहे. बांगलादेशी आणि रोहिंग्या मुस्लिमांनी बंगाल पोखरून काढला आहे. बंगाली भाषिक नागरिकाला या राज्यात जीव मुठीत धरून जगावे लागत आहे. या मुद्द्यांभोवती भाजपाने आपला प्रचार केंद्रीत केला आहे. बिहारप्रमाणे बंगालमध्येही जंगलराज येऊ द्यायचे नसेल तर कोलकत्याच्या सिंहासनावर भाजपाची सत्ता येणे गरजेचे आहे, असे भाजपा सांगत आहे. बिहारप्रमाणे बंगालमध्येही जंगलराजचा मुद्दा आक्रमकपणे मांडण्याची भाजपाने रणनिती आखली आहे.

जंगलराजचा मुद्दा निवडणुकीत केंद्रस्थानी आणला जात असताना ममता यांना अँटी इन्कबन्सीचा मोठा तडाखा येत्या निवडणुकीत बसला तर भाजपाचा सत्ता काबीज करण्याचा मार्ग सुकर होऊ शकतो अशी समिकरणे मांडली जात आहेत. महाराष्ट्र, हरयाणा, दिल्ली , बिहारमध्ये मुसंडी मारल्यानंतर भाजपाने आपले सारे लक्ष्य आता पश्चिम बंगालवर केंद्रीत केले आहे. बिहारमध्ये नितीशकुमार यांच्यामुळे भाजपाला मुस्लिम तसेच मागास आणि अतिमागास मतदारांनी मतदान केले होते. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसला मुस्लिम मतदान एकगठ्ठा मिळते, हा आजवरचा अनुभव आहे. मुस्लिम मते भाजपाकडे वळवण्यासाठी भाजपाकडे या राज्यात एकही मित्र नाही. बिहारप्रमाणे बंगालमध्ये जातीय आणि धार्मिक समिकरण सारखे नाही. म्हणूनच भाजपाला तृणमूल काँग्रेसच्या विरोधात लढताना शिकस्त द्यावी लागणार आहे. एसआयआर (मतदार यादी सुधारणा) च्या विरोधात ममता सतत आवाज उठवत आहेत. बिहारमध्ये एसआयआरनंतर ६५ लाख मतदारांनी नावे वगळण्यात आली तसेच बंगालमधेही घडू शकते. पण तृणमूल काँग्रेसकडे मुस्लिम मतदारांची व्होट बँक व लढाऊ केडर ही दोन मजबूत साधने आहेत. बंगालचे राजकीय भविष्य हे पाटणा किंवा दिल्लीत लिहिले जात नाही. बंगालमध्ये भाजपाचे 'बटेंगे तो कटेंगे' धोरण स्वीकारले जाते का आणि बंगालच्या मतदारांचा विश्वास ममतादीदींवरच आहे का, याचा पडताळा तेथिल येत्या निवडणुकीमध्ये दिसून येईल.

# बाबासाहेबांच्या मार्गावर आपण चालतो का?

**वैष्णवी वाडकर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वांसाठी समान हक्क मिळावेत, अन्याय थांबावा आणि प्रत्येकाला शिक्षण मिळावे यासाठी आयुष्यभर लढा दिला. त्यांनी देशातील अस्पृश्यता आणि आसमानता नष्ट करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. तसेच, त्यांनी लिहिलेले संविधान आज भारत देशाला चालवत आहे. त्यांच्या विचारांची आठवण कायम राहण्यासाठी दरवर्षी ६ डिसेंबर रोजी महापरिनिर्वाण दिनानिमित्त सर्व अनुयायी त्यांच्या चरणी श्रद्धांजली अर्पण करत असतात. तसेच, हा दिवस सर्व भारतवासीयांना एकत्र राहण्याचा आणि त्यांच्या मार्गावर चालण्याचा संदेश देतो. मात्र, खरच त्यांनी लिहून दिलेल्या मार्गावर आपण चालतो का, याचे आत्मपरिक्षण करणे गरजेचे आहे.

यंदा महापरिनिर्वाण दिनानिमित्त संपूर्ण रायगड जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासूनच शहरांमध्ये आणि गावांमध्ये लोकांनी मोठ्या संख्येने एकत्र येऊन डॉ. बाबासाहेबांना अभिवादन केले. अनेक ठिकाणी पुतळ्यांवर पुष्पहार अर्पण करण्यात आले आणि 'जय भीम'च्या घोषणा देण्यात आल्या. एक वेगळीच उर्जा यावेळी अनुयायांमध्ये पाहायला मिळाली. तसेच अलिबाग, महाड, पेण, पनवेल आणि उरण भागात गावांमध्ये दिवे लावून आणि मेणबत्त्या पेटवून बाबासाहेबांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. अनेक ठिकाणी लोकांनी एकत्र येऊन समाजात एकता ठेवण्याची शपथ घेतली व बाबासाहेबांनी केलेल्या कार्याचे स्मरण केले. यात तरुण मंडळींसह विद्यार्थि, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला होता. या महापरिनिर्वाण दिनी नागरिकांना पुन्हा एकदा समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या संविधानाच्या मूल्यांची आठवण करून देण्यात आली. जिल्ह्यातील अनेक शाळा, महाविद्यालयांमध्ये देखील महापरिनिर्वाण दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनेकांनी मनोगत व्यक्त केले. तसेच, प्राचार्यांसह शिक्षकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन चारित्र्यावर भाष्य केले. शिक्षकांनी शिक्षणाचे महत्त्व, मुलींचे शिक्षण, सर्वांसाठी समान संधी आणि भेदभाव संपवण्याची गरज यावर मते व्यक्त केली. विविध वक्त्यांनी सांगितले की, आजच्या तरुणांनी बाबासाहेबांच्या विचारांवर काम करणे आणि समाजातील बदल स्वीकारणे गरजेचे आहे. तसेच, अनेक ठिकाणी कार्यक्रमादरम्यान भाषण देताना 'आज बाबासाहेबांच्या विचारांची गरज अजून जास्त आहे', असे मत व्यक्त करण्यात आले. यावरून बाबासाहेबांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत नसल्याचे बोलले जात आहे. त्यासाठी वर्षभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून बाबासाहेबांचे विचार अधिकाधिक जनतेपर्यंत कसे पोहोचविता येतील, याचा विचार करणे गरजेचे असल्याचे देखील बोलले जात आहे. जेणेकरून सध्या देशात जे फोडाफोडीचे राजकारण चालू आहे त्याला कूठेतरी लगाम लागेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण ६ डिसेंबर १९५६ साली मुंबईतील दादर चौपाटीजवळ असलेल्या चैत्यभूमीत झाले. याच ठिकाणी बाबासाहेबांचे समाधीस्थळ आहे. त्यामुळे हे आंबेडकरी विचारवंतांचे आणि बौद्ध अनुयायांचे महत्त्वाचे श्रद्धास्थान मानले जाते. दरवर्षीप्रमाणे यंदाही रायगड जिल्ह्यातून सुमारे १० हजारांहून अधिक अनुयायी चैत्यभूमीकडे रवाना झाले होते. काहीजण शनिवारीच मुंबईला पोहोचले आणि दर्शनासाठी रांगेत उभे राहिले होते. दोन दिवस आधीपासूनच दर्शनासाठी अनुयायांची उपस्थिती दिसून आली.

यादरम्यान, दादर येथील चैत्यभूमीवर शनिवारी (दि.६) सकाळपासूनच श्रद्धांजली देण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने दाखल झाल्याने येथील रस्त्यांवर वाहतूक प्रचंड प्रमाणात कोंडी निर्माण झाली होती. दादर-शिवाजी पार्क परिसरासह अलिबाग, पनवेल, पेण या मार्गांवर देखील वाहनांची लांबच लांब रांग लागली होती. या वाहतूक कोंडीमुळे एसटी वर पूर्णतः अवलंबून असणाऱ्या नागरिकांचे प्रचंड हाल झाले होते. अनेक ठिकाणी एसटी वेळेवर पोहचू न शकल्याने त्यांना खासगी वाहतूक साधनांचा वापर करावा लागला. त्यामुळे त्यांना आर्थिक फटका देखील बसला. खासगी वाहनातून जाताना देखील त्यांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. त्यामुळे आर्थिक भुर्दंडासह वेळेचाही अपव्यय झाला. यावेळी पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त ठेवून वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला; मात्र, वाढत्या गर्दीमुळे कोंडी कायम राहिली. काही ठिकाणी पोलीस आणि अनुयायांमध्ये बाचाबाची देखील झाली. त्या ठिकाणी पोलीस त्यांची जबाबदारी पार पाडत होते. त्यामुळे या मोठ्या कार्यक्रमानंतर समाजात काही मुद्द्यांवर चर्चा सुरू झाली आहे. दरवर्षी डॉ. बाबासाहेबांच्या स्मरणार्थ लाखो लोक एकत्र येत असतात. मात्र, त्याचे सुयोग्य नियोजन सरकार किंवा संबंधितांकडून केले जात नाही. जरी प्रयत्न केले गेले तरी त्याचे पालन होत नाही. त्यामुळे सर्वसामान्यांना त्याचा फटका बसतो. त्यामुळे त्यांच्या विचारांनुसार वागण्याचा प्रयत्न आपण करतो का, असा प्रश्न आपण स्वतःलाचा विचारणे गरजेचे आहे.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त बाबासाहेबांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आंबेडकरी विचारांचे लोक येत असतात. त्यामुळे बाबासाहेबांचे विचार आजही जिवंत असून अनेक जणांचा त्यांच्या मार्गदर्शनावर विश्वास असल्याचे दिसून येते. परंतु, आजही आपला देश विविध समस्यांनी ग्रासला गेला आहे. त्यामुळे खरच आपण त्यांनी दिलेल्या मार्गावर आपण चालत आहोत का, हे देखील स्वतःला विचारणे गरजेचे आहे.

लोकसंसद



## इंडिगोची मक्तेदारी, मनमानी आणि हतबल सरकार

भारतीय विमान वाहतूक क्षेत्रात सर्वाधिक ६३ टक्के वाटा (एक प्रकारे मक्तेदारी) असलेल्या इंडिगो या विमान वाहतूक कंपनीने गेल्या पाच दिवसात मोठ्या संख्येने (१००० हून अधिक) विमानांची उड्डाणे रद्द केली. यामुळे दिल्ली, मुंबई, हैदराबाद, चेन्नई, कोलकाता यांसारख्या महानगरातील विमानतळावर प्रचंड गोंधळ उडाला असून या लागोपाठच्या विमान रद्द प्रकाराने हजारो प्रवाशांचे हाल झाले. विशेषतः वृद्ध, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, महिला, विद्यार्थी आणि लहान मुलांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागले. इंडिगोच्या एककल्ली मनमानीमुळे देशातील विमान प्रवासात मोठा व्यत्यय आला असून हवाईसेवा अक्षरशः कोलमडून पडली आहे इंडिगोने उड्डाणे उशिरा किंवा रद्द करण्याची, हिवाळ्यातील वेळापत्रकातील बदल, प्रतिकूल हवामान परिस्थिती, विमान वाहतूक व्यवस्थेतील गर्दी, किरकोळ तंत्रज्ञानातील त्रुटी अशी विविध कारणे दिली असली तरी वैमानिकांच्या कर्तव्यवेळेबाबतच्या (फ्लाइट ड्यूटी टाइम लिमिटेशन) सरकारच्या नियमांची इंडिगोने अंमलबजावणीमुळे न केल्यामुळे हा अभूतपूर्व पेच प्रसंग उद्भवला आहे. इंडिगोने निर्माण केलेल्या या परिस्थितीचा गैरफायदा लागलीच विमान प्रवासाचे भाडे अव्वाच्या सव्वा वाढवून अन्य विमान कंपन्यांनी उठवला. परिस्थिती हाताबाहेर गेल्यावर सरकारने कठोर कारवाई करत विमान कंपन्यांवर तातडीची भाडे नियंत्रण मर्यादा (फेअर कॅप) लागू केली. प्रवाशांना वेठीस धरून मनमानी करणाऱ्या इंडिगोवर कठोर कारवाई करण्याची मागणी सर्व स्तरातून सरकारकडे करण्यात येत आहे ती योग्यच आहे.

**–प्रदीप अनुसया शंकर मोरे**

दिनविशेष

# 'धर्मेंद्र' चित्रपट अभिनेते यांचा जन्म

धर्मेंद्र यांचा जन्म ८ डिसेंबर १९३५ मध्ये पंजाबमधल्या कपूरथला जिल्ह्यात झाला होता. त्यांचं शिक्षण फगवाडा इथल्या आर्य हायस्कूलमध्ये झालं. धर्मेंद्रंचं शिक्षण हे मॅट्रिकपर्यंत झालं होतं. त्यानंतर ते रेल्वेमध्ये क्लर्क म्हणून नोकरीलाही लागले. पण सिनेमाची,अभिनयाची आवड असल्यानं त्यांनी ती नोकरी सोडली. त्यांनी फिल्मफेअरच्या स्पर्धेत भाग घेतला अन् त्यानंतर त्यांचं आयुष्य बदललं.

अर्जुन हिंगोरानी यांनी धर्मेंद्र यांना सिनेमासाठी पसंत केलं. हिंगोरानी यांनी मदिल भी तेरा हम भी तेरेफसाठी अवघ्या ५१ रुपयांमध्ये त्यांना साइन केले होतं. त्यानंतर मसत्यकामफ,'शोल' , 'चुपके-चुपके',बंदिनी, 'फूल और पत्थर' सूरत और सीरत असे अनेक सिनेमे त्यांचे गाजले. धर्मेंद्र यांच्या कामाबद्दल सांगायचं तर नुकतंच त्यांनी शाहिद कपूर आणि क्रिती सेननच्या मतेरी बातो में ऐसा उल्झा जियाफ मध्ये काम केलं होतं. ते आलिया भट्ट आणि रणवीर सिंग यांच्या 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' मध्येही दिसले होते. बॉलिवूडचा 'ही-मॅन' म्हणून प्रसिद्ध असलेले ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र हे कायम चर्चेत असतात. १९६० पासून आपल्या अभिनय कारकीर्दीला सुरुवात करणाऱ्या धर्मेंद्र यांनी ३०० हून अधिक चित्रपटात काम केलं आहे. पण, एक काळ असा होता जेव्हा पंजाबमधील गुरुदासपूर येथील एका शेतकऱ्याच्या घरात जन्म लेल्या धर्मेंद्र यांना एका गॅरेजमध्ये काम करावे लागले होते. धर्मेंद्र यांचा जन्म ८ डिसेंबर १९३५ रोजी लुधियानामधील एका गावात झाला होता. धर्मेंद्र यांना बालपणापासूनच चित्रपटांची खूप आवड होती. १९४९मध्ये आलेला 'दिल्लगी' हा चित्रपट त्यांनी तब्बल ४०हून अधिक वेळा पहिला होता. धर्मेंद्र हे दिलीप कुमार यांचे मोठे फॅन होते. दिलीप कुमार यांना बघूनच धर्मेंद्र यांच्यातही अभिनयाची रुची निर्माण झाली. अभिनय विश्वात करिअर करण्याच्या इच्छेने त्यांनी थेट मुंबई गाठली. चित्रपटात येण्यापूर्वी ते एका गॅरेजमध्ये काम करायचे, याचा खुलासा खुद्द धर्मेंद्र यांनी केला होता. एका मुलाखतीत धर्मेंद्र म्हणाले होते की, मचित्रपटात करिअर करण्यापूर्वी मी गॅरेजमध्ये राहायचो. माझ्याकडे मुंबईत राहण्यासाठी घर नव्हते. त्यावेळी मी एका ड्रिलिंग फर्ममध्ये काम करायचो. महिन्याकाठी पगार म्हणून फक्त २०० रुपये मिळायचे. यानंतर थोडे अधिकचे पैसे मिळवण्यासाठी ओव्हरटाईम ही करावा लागला. धर्मेंद्र हा सगळं संघर्ष करत असतानाच त्यांच्या नशिबाने त्यांना साथ दिली. दिग्दर्शक अर्जुन हिंगोरानी यांनी धर्मेंद्र यांना 'दिल भी तेरा हम भी तेरे' या चित्रपटातून ब्रेक दिला. या चित्रपटानंतर धर्मेंद्र यांना कधीच मागे वळून पाहावे लागले नाही. ५०च्या दशकांत आपलं नशीब आजमावण्यासाठी धर्मेंद्र पंजाबहून मुंबईला आले होते. एका टॅलेंट हंट स्पर्धेद्वारे त्यांची चित्रपटासाठी निवड झाली होती. मात्र, ही स्पर्धा जिकल्यांनंतर तो चित्रपट डब्यात गेला. त्यामुळे धर्मेंद्र निर्मात्यांच्या ऑफिसमध्ये सतत चकरा मारतच होते. धर्मेंद्र यांनी १९६०मध्ये ' दिल भी तेरा मैं भी तेरा' या चित्रपटातून आपल्या करिअरची सुरुवात केली. धर्मेंद्र हे हिंदी चित्रपटसृष्टीतील एक दिग्गज आणि यशस्वी अभिनेते होते, ज्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक अजरामर भूमिका साकारल्या, ते एक अभिनेते, निर्माते आणि राजकारणी म्हणूनही ओळखले जातात. त्यांचा जन्म ८ डिसेंबर १९३५ रोजी झाला आणि २४ नोव्हेंबर २०२५ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांनी हिंदीसोबतच एका मराठी चित्रपटातही काम केले होते.



अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

८ डिसेंबर

१) श्रीम.मीनाक्षी मोहन कोर्लेकर
विद्यानगर, अलिबाग
८-१२-१९५०




## महापरिनिर्वाणदिनी दादर येथे अन्नदान

। मुंबई । प्रतिनिधी ।

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुण्यतिथी महापरिनिर्वाणदिनी दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दादर मुंबई येथील चैत्यभूमीवर अभिवादन करणाऱ्या लाखो अनुयायांच्या सेवेत आमदार विक्रांतदादा प्रतिष्ठानतर्फे अन्नछत्र ठेवण्यात आले होते. यावेळी अभिवादक राहुलजी बोर्डे यांच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संपूर्ण टीमच्यावतीने विविध उपक्रम करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विधानपरिषदेचे आमदार विक्रांतदादा पाटील यांनी विविध ठिकाणी जाऊन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी विक्रांतदादा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राहुल बोर्डे यांच्यासह पत्रकार मित्र असोसिएशनचे अध्यक्ष केवल महाडिक, भागवत अहिरे, रुपेश बोर्डे, विजय पगारे, संदीप डोंगरे,साबीर शेख यांच्या सह राहुल बोर्डे मित्रपरिवारातील सदस्य अन्नसेवा करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिंधुदुर्ग जेटी बनतेय धोकादायक

**● भरावाचे दगड निखळले; प्रवासी होड्या लावणे बनले कठीण**

। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।

सिंधुदुर्ग किल्ल्याजवळील जेटीचा खालील भाग पोकळ बनत चालला असल्याने जेटी धोकादायक बनत आहे. जेटीच्या खालील भरावाचे दगड निखळून ओहोटीच्या वेळी जेटीचे धोकादायक रूप निदर्शनास येत आहे. यामुळे ओहोटीच्या वेळी जेटीकडे प्रवासी होड्या लावणे कठीण बनले आहे. तसेच किल्ला जेटी, मालवण बंदर जेटीकडे मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्याने होडी व्यावसायिकांना अनेक अडचणी येत आहेत.

सिंधुदुर्ग जिल्ह्याचा स्मृतिमय इतिहास म्हणजे हा किल्ला आहे. असंख्य मावळ्यांच्या साक्षीने आणि परिश्रमाने समुद्रात हा किल्ला उभा केला तो आजही पर्यटकांना विशेष आकर्षित करतो. या ऐतिहासिक किल्ले सिंधुदुर्गवर जाण्यासाठी मालवण बंदर जेटी ते किल्ला अशी होडी सेवा आहे. या होडी सेवेसाठी काही वर्षांपूर्वी किल्ल्याला लागून जेटी बांधण्यात आली. या जेटीमुळे पर्यटकांना होडीतून सुरक्षितरीत्या उतरविणे व पुन्हा होडीत चढविणे सुलभ झाले. मात्र गेल्या काही महिन्यांपासून या जेटीच्या बांधणीवेळी समुद्रात घातलेला दगडांचा भराव पोकळ होत चालला आहे. यातील काही दगड निसटले असून जेटीचा खालील भाग धोकादायक स्थितीत दिसत आहे.

मालवण बंदर जेटी परिसरात वाहनतळाचे काम करण्यात आल्यावर त्यातून काढलेली माती व भराव जेटी परिसरातच किनाऱ्यालगत टाकण्यात आला आहे. गेली काही वर्षे हा मातीचा ढिगारा तसाच असून पावसाळ्यात माती वाहून समुद्रात जाते. हा ढिगारा हटविण्यात यावा, अशी मागणी बंदर विभागाकडे ऑक्टोबर महिन्यात झालेल्या बैठकीत किल्ला होडी व्यावसायिकांनी केली होती. त्याबाबत लेखी निवेदनही देण्यात आले आहे.



### पर्यटकांचा हिरमोड

सिंधुदुर्ग किल्ला जेटीच्या मार्गावर तसेच मालवण बंदर येथील दोन्ही जेटीच्या मार्गावर मोठ्या प्रमाणात गाळ साचला आहे. त्यामुळे ओहोटीच्या वेळी दोन्ही जेटीकडे होडय़ा लावणे कठीण होते. काही वेळा होडी सेवा बंददेखील ठेवावी लागते. यामुळे पर्यटकांचा हिरमोड होत आहे. तसेच होडी व्यावसायिकांनाही नुकसान सहन करावे लागत आहे.



## विद्यार्थ्यांना खाऊवाटप

। गुहागर । प्रतिनिधी ।

शृंगारतळी येथील ग्राम आधार स्वंयसेवी संस्थेची जीवन ज्योती विशेष शाळेमध्ये जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त या शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष विनोद जानवळकर व झोंबडी गावचे सुपुत्र सामाजिक कार्यकर्ते परेश लांजेकर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. तसेच शाळेचे कामकाजाची माहिती घेतली. शाळेला लागणारी मदत नक्कीच आम्ही करू, असे आश्वासन विनोद जानवळकर यांनी दिले. यावेळी मुख्याध्यापिका सुषमा शिंदे यांनी संस्था तसेच शाळा विद्यार्थ्यांसाठी राबवत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

## हर्षवर्धन सपकाळ यांचे महामानवाला अभिवादन

। मुंबई । प्रतिनिधी ।

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी चैत्यभूमीला भेट देऊन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी व मुंबई युवक काँग्रेसच्या वतीने व शिवाजी पार्क येथे उभारलेल्या वैद्यकीय चिकित्सा व औषध वाटप केंद्राला भेट दिली.

यावेळी तिथे कार्यरत डॉ. मनोज रांका, डॉ. अभिजीत, डॉ. प्रदीप जावळे, डॉ. अमित दवे, डॉ. मनोज उपाध्याय यांच्याशी चर्चा केली. यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, जगभरातमध्ये गुलामगिरी व शोषण हा समाजव्यवस्थेला लागलेला एक कलंक होता. या गुलामगिरीचे बंधन तोडून ज्या महामानवांनी सामाजिक न्याय, समता व बंधुतेची हाक दिली त्यातील मोठे नाव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आहे. त्यांनी वंचित, पीडीत व शोषितांचा मोठा लढा लढला व समाजात समतेची बिजे रोवली आणि हाच भाव त्यांनी भारताच्या संविधानातून साकार केला आहे, असेही ते म्हणाले.



## इंडिगोच्या विमानसेवेचा बट्ट्याबोळ का झाला?

**● जबाबदारी निश्चित करून कारवाई करा: खा. वर्षा गायकवाड**

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबईसह देशभरातील हजारो इंडिगो प्रवाशांना मागील तीन दिवसापासून प्रचंड त्रास सहन करावा लागला आहे. आपल्याच विमानतळावर ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुले तासंतास रांगेत उभे होते, त्यांना कोणतीही माहिती नव्हती, मार्गदर्शन नव्हते आणि पिण्याचे पाणी किंवा अन्नही नव्हते. इंडिगो विमानसेवेचा झालेला बट्टाबोळ हे नागरी विमान वाहतूक मंत्रालयाचे अपयश असून या सर्व घटनेची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करा, अशी मागणी मुंबई काँग्रेस अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी केली आहे.

मुंबई विमानतळावर जाऊन खा. वर्षा गायकवाड यांनी प्रवाशांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी सरकारचा समाचार घेतला. त्या म्हणाल्या की, देशभरातील विमानसेवा विस्कळीत झाल्याने त्याचा मोठा फटका विमान प्रवाशांना झाला. विमान कंपनीकडून कोणत्याही प्रकारची सुचना वा माहिती दिली जात नव्हती. याचा फायदा उठवत काही विमान कंपन्यांनी ५ हजार रुपयांच्या तिकीटासाठी ५० ते ६० हजार रुपये दर लावून प्रवाशांना लुटले. विमानतळावर अडकलेल्या प्रवाशांना अनेक त्रासाला सामोरे जावे लागले. हा सर्व गोंधळ होत असताना सरकार म्हणून काहीही दखल घेतली गेली नाही हे अत्यंत गंभीर आहे.

ज्या प्रवाशांना असह्य त्रास झाला, त्याची भरपाई इंडिगो व भारत सरकार कशी करून देणार आहे, असा प्रश्न विचारून ही विमानसेवा पूर्णपणे कोलमडली त्याची जबाबदारी निश्चित करा, असेही त्या म्हणाल्या.

## कोळंबीची आवक घटली

**दापोली** : कोळंबीची हर्णे बंदरातील आवक पुन्हा घटली आहे. नाताळ, थर्टीफस्टपूर्वीच कोळंबीचा तुटवडा निर्माण होत असल्याने व्यावसायिकांतून चिंता व्यक्त होत आहे. हर्णै बंदरातील कोळंबीला नेहमीच मागणी असते. आवक वाढली की विक्रीला चालना मिळते आणि पर्यटकांचीही बंदरावर गर्दी वाढत असते. मात्र मागील महिन्यांपासून कोळंबीच आवक घटत असल्याने बाजारात तुटवडा निर्माण झाला असून नागरिकांसह पर्यटकांचा हिरमोड झाला आहे.

## दुबार मतदारांची झाडाझडती

। ठाणे । प्रतिनिधी ।

मीरा-भाईंदर महापालिकेच्या प्रारूप मतदार यादीत तब्बल ४० हजार दुबार मतदार आढळले आहेत. पालिका प्रशासनानेच याबाबत माहिती दिली असून आता घरोघरी जाऊन दुबार मतदारांची झाडाझडती घेण्यास सुरवात केली आहे. या सर्व मतदारांकडून हमीपत्र लिहून घेतले जाणार आहे. दरम्यान, ७४० हरकती आणि सूचनांची पडताळणी करून १० डिसेंबरला अंतिम मतदार यादी जाहीर करण्यात येणार आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेकडून अलीकडेच आरक्षण सोडत जाहीर झाल्यानंतर प्रभागनिहाय मतदार यादीही जाहीर करण्यात आली होती. या यादीवर हरकती व सूचना नोंदवण्याची प्रक्रिया ३ डिसेंबरपर्यंत पार पडली. त्यानंतरच्या सुधारणा करून अंतिम मतदार यादी १० डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्याचे काम प्रशासनाकडून केले जात आहे. दरम्यान, मतदार यादीतील दुबार नावांबाबत काँग्रेस नेते मुजफ्फर हुसैन यांच्यासह विरोधकांनी आवाज उठवत आक्षेप नोंदवले आहेत. या तक्रारींची दखल घेत महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी दुबार मतदारांची यादी तपासून ती पालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे.

## गुंगीचे औषध देऊन तरुणीवर अत्याचार

। ठाणे । प्रतिनिधी ।

ठाणे शहरात एका ३६ वर्षीय महिलेवर दोन तरुणांनी अत्याचार केल्याचा प्रकार घडला आहे. महिलेला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर आरोपी तरुणांनी अत्याचार केला. याप्रकरणी पोलिसांनी एक आरोपीला अटक केली आहे.

मुंबई कुर्ला येथे राहणाऱ्या पीडित विवाहितेचा २५ ऑगस्ट रोजी वाढदिवस होता. त्या निमित्ताने केक कापण्यासाठी कारमध्ये बसले. यावेळी आरोपी तरुणांनी केकमध्ये गुंगीचे औषध टाकून तो केक त्या महिलेला खाऊ घातला. त्यानंतर त्या महिलेला चक्कर आली आणि दोन्ही आरोपी तरुणांनी महिलेला ठाणे फॅमिली न्यायालयाच्या आवारातील कार पार्किंगमध्ये आणून तिच्या अत्याचार केला. तसेच त्यांनी त्यावेळी व्हिडिओ बनवून तिला तो व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिली. दरम्यान, याप्रकरणी पीडित महिलेने ठाणे पोलीस स्थानकात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी एका आरोपीला अटक केली आहे. हिरालाल केदार आणि रवी पवार असे दोन्ही आरोपींचे नाव असून हिरालाल केदार या आरोपीला अटक करण्यात आली आहे. तर रवी पवार हा फरार असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# शिधापत्रिकेवरील धान्याच्या प्रमाणात बदल

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ नुसार अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजना अंतर्गत लाभार्थ्यांसाठी वितरित करावयाचे अन्नधान्याच्या मासिक नियतन प्रमाणामध्ये बदल करण्यात आला आहे. अंत्योदय शिक्षापत्रिकेसाठी आणि प्राधान्य कुटुंब लाभार्थीसाठी मिळणाऱ्या एकूण धान्यात बदल न करता आहे त्या धान्यातील तांदूळ आणि गहू याच्या प्रमाणात बदल करण्यात आला आहे. हा बदल जानेवारी २०२६ पासून सर्व शिधापत्रिकांना लागू करण्यात येणार असल्याचे जिल्हा पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले. त्यानुसार जिल्ह्यातील अंत्योदय कार्डधारकांकरिता तांदूळ प्रती शिधापत्रिका २० किलो व गहू प्रती शिधापत्रिका १५ किलो वाटप करण्यात येणार आहे. याआधी याच शिधापत्रिकेसाठी २५ किलो तांदूळ आणि १० किलो गहू देण्यात येत होता. आता तांदळाचे प्रमाण कमी करून गव्हाचे प्रमाण वाढवण्यात आले आहे. मात्र या रेशन शिधापत्रिकेसाठी सरासरी ३५ किलो इतकीच धान्यमर्यादा ठेवण्यात आली आहे.

प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकेसाठी प्रती लाभार्थी ५ किलो धान्य या प्रमाणात आतापर्यंत ४ किलो तांदूळ आणि १ किलो गहू असा लाभ देण्यात येत होता. मात्र आता जानेवारी २०२६ पासून प्रती सदस्यांकरिता ३ किलो तांदूळ व २ किलो गहू असा बदल करण्यात आला आहे.



**रेल्वेकडून तपासणी मोहीम सुरू** | **आतापर्यंत नोंदवली पाच प्रकरणे**

# बनावट तिकिटांविरुद्ध होणार कारवाई

। मुंबई । प्रतिनिधी ।

उपनगरीय नेटवर्कवर बनावट आणि संपादित तिकिटांच्या वाढत्या प्रकरणांविरुद्ध मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वेने कारवाई तीव्र केली आहे. गेल्या काही महिन्यांत, अनेक प्रवासी एआय-एडिट केलेल्या, मॉर्फ केलेल्या किंवा फोटोकॉपी केलेल्या तिकिटांसह प्रवास करताना पकडले गेले आहेत. त्यानंतर रेल्वेने ही एक गंभीर फसवणूक मानून मोठ्या प्रमाणात तपासणी मोहीम सुरू केली आहे.

रेल्वेच्या मते, तिकीट बुकिंगच्या वेळी एक अद्वितीय अल्फान्यूमेरिक कोड तयार केला जातो. जो खऱ्या तिकिटांची ओळख पटवण्यासाठी एक प्रमुख साधन आहे. बनावट किंवा संपादित तिकिटांमध्ये हा कोड नसू शकतो. जो तपासणी पथकांद्वारे त्वरित शोधला जातो. स्थानके आणि गाड्यांवर विशेष एआय-फसवणूक पथके तैनात केली जात आहेत. ही टीम संशयास्पद तिकिटे ओळखेल आणि प्रवाशांचे ओळखपत्र तपासेल. जर सीझन तिकिट किंवा प्रवास तिकिटावरील तपशील ओळखपत्राशी जुळत नसेल तर कारवाई केली जाईल. सुरळीत तपासणी सुनिश्चित करण्यासाठी जीआरपीशी समन्वय वाढविण्यात आला आहे.



### दंड अन्यथा थेट तुरुंगवास


रेल्वेने इशारा दिला आहे की, बनावट तिकिटे बनवणे, खरेदी करणे किंवा वापरणे हा गुन्हा आहे. दोषी आढळल्यास दंड आणि ७ वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. आतापर्यंत पाच प्रकरणे नोंदवली गेली आहेत. एका दुकान मालकाने तिकीट खरेदी केले. त्याची फोटोकॉपी बनवली आणि कर्मचाऱ्यांना वाटली. एक महिला प्रवाशाला अल-पुदित तिकीटासह पकडण्यात आले. विद्यार्थ्यांच्या एका गटाने तिकिटे संपादित करण्यासाठी एआय टूलचा वापर केला. पश्चिम रेल्वेवर अशाच प्रकारच्या आणखी काही प्रकरणांची नोंद झाली.

### यूटीएस ॲपचा गैरवापर

मुंबई लोकल ट्रेनसाठी तिकिटे देण्यासाठी रेल्वे यूटीएस (अनारक्षित तिकिट प्रणाली) नावाच्या ॲप्लिकेशनचा वापर करते. त्याच्या मदतीने तिकिटे सहज मिळवता येतात. पण अलीकडेच, तिकीट कलेक्टर (टीसी) च्या लक्षात आले की, काही प्रवासी बनावट तिकिटे तयार करण्यासाठी एआय आणि फोटोशॉप ॲप्लिकेशनचा वापर करत आहेत.

# निवडक

## नागोठणे ते शिर्डी पदयात्रा पालखी सोहळ्याचे आयोजन



**नागोठणे** : नागोठण्यातील श्री साईबाबा भक्तांकडून सन २०१२मध्ये श्री साई सेवक मित्र मंडळ स्थापन स्थापन करण्यात आले आहे. याच मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १५ व्या नागोठणे ते शिर्डी पालखी पदयात्रा सोहळ्याला गुरुवार दि.११ डिसेंबरला सकाळी सात वाजण्याच्या सुमारास नागोठण्याची आराध्य ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता, व्याघ्रेश्वर व भैरवनाथ महाराजांचे दर्शन घेऊन श्री जोगेश्वरी माता मंदिरापासून सुरुवात होणार आहे. अशी माहिती श्री साई सेवक मित्रमंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. श्री साई सेवक मित्रमंडळाचा नागोठणे ते शिर्डी पदयात्रा सोहळ्याचे हे तेरावे वर्ष आहे. हा पदयात्रा व पालखी सोहळा शनिवार दि.२० डिसेंबरला शिर्डी येथे पोहोचणार आहे. तर सोमवार दि.२२ डिसेंबरला पदयात्रेत सहभागी झालेले साई भक्त नागोठणे येथे परतणार आहेत. त्यानंतर गुरुवार दि. २५ डिसेंबरला सायंकाळी सात वाजता ग्रामदेवता श्री जोगेश्वरी मातेच्या भव्य पटांगणात साई भंडा-याचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

## शिकारीसाठी गेलेल्या तरुणाचा गोळी लागून मृत्यू

**सिंधुदुर्ग** : शिकार करण्यासाठी मित्रांसोबत जंगलात गेलेल्या तरुणाचा गोळी लागून मृत्यू झाला आहे. सावंतवाडी तालुक्यातील ओवळीये येथे गुरुवारी (दि.४) उशिरा रात्री ही घटना घडली. याप्रकरणी गोळी झाडणाऱ्या संशयिताला सावंतवाडी पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडी येथे घडली आहे. बंदुकीतून सुटलेली गोळी शिकारीला आलेल्या सहकाऱ्यालाच लागल्याने त्याचा मृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. सचिन सुभाष मर्गज (२८) असे मृत तरुणाचे नाव आहे. सचिन मर्गज व सिप्रियान डान्टस हे ओवळीये येथे शिकारीला गेले होते. सिप्रीयन हा बंदूक घेऊन शिकारीच्या उद्देशाने उभा होता, तर सचिन हा जंगलात हाकारा देण्यासाठी गेला होता. जंगलातील झुडपामध्ये हालचाल झाल्याचे दिसून आल्याने सिप्रियान याने त्या दिशेने गोळी झाडली. यावेळी काही लांडोर पक्षी उडून बाजूला गेले व त्याचवेळी 'आई...' असा मोठा आवाज आला. त्यामुळे सिप्रियान याने त्या ठिकाणी धाव घेतली असता सचिन मर्गजच्या शरीरात गोळी घुसल्याने तो रक्तबंबाळ अवस्थेत कोसळलेला दिसून आला. त्याच्या तोंडावर तसेच छातीत छर्रे घुसले होते. यात अतिरक्तस्त्राव झाल्यामुळे त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. याबाबतची माहिती मृत सचिनचे वडील सुभाष मर्गज यांना कळल्यानंतर त्यांनी त्याबाबतची फिर्याद सावंतवाडी पोलीस ठाण्यात दिली. याबाबतची फिर्याद मृत युवकाच्या वडिलांनी सावंतवाडी पोलिसात दिल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. याप्रकरणी सिप्रीयन ॲन्थॉनी डान्टस याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून रात्री उशिरापर्यंत त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

## एसटी बसवर कोसळला विद्युत खांब



**सिंधुदुर्ग** : मालवण भरड येथील गेल्या कित्येक वर्षांपासून उभा असलेला जुनाट गंजलेला वीजेचा खांब थेट एसटी बसवरच येऊन कोसळल्याची घटना घडली. यामध्ये सुदैवाने कोणतीही दुर्घटना घडली नाही. मालवण एसटी डेपोच्या दोन गाड्या सहलीसाठी गेल्या होत्या. या दोन्ही गाड्या सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास पुन्हा बस स्थानकात जात होत्या. दरम्यान, भरड परिसरात दत्त मंदिरनजीकच्या रस्त्यावर असलेला जुनाट वीज पोल थेट एसटीवर येऊन कलंडला. यामुळे वीज तारादेखील ओढल्या गेल्या. मात्र, सुदैवाने कोणतीही दुर्घटना घडली नाही. या अपघातामुळे वीज पुरवठा खंडित झाला होता. तसेच यावेळी या मार्गावर वाहतुकीची कोंडी झाली होती. याबाबत वीज वितरण कंपनीला माहिती दिली असता वीज कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी दाखल होत कलंडलेला वीज पोल पुन्हा उभा केला. त्यानंतर वाहतूक सुरळीत झाली.

## घरात घुसून दागिने चोरणाऱ्यांना अटक



**सिंधुदुर्ग** : फोंडाघाट येथे घरात घुसून दोन महिलांच्या अंगावरील दागिने चोरण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र हा प्रयत्न फसल्यानंतर पसार झालेल्या त्या टोळीला अखेर स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पथकाने भिवंडी, ठाणे, नेरूळ आदी भागांतून अटक केली. त्यातील तीन आरोपींना शनिवारी कणकवली पोलीस ठाण्यात नेण्यात आले. जगदीश श्रीराम यादव (२५, भिवंडी), चनाप्पा साईबाणा कांबळे (५०, ठाणे), नागेश हनुमंत माने (४१, नेरूळ) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. ही घटना फोंडा गाडी येथे ३० नोव्हेंबरला सकाळी सात वाजण्याच्या सुमारास घडली होती. तृप्ती लिंग्रस व त्यांची आई या दोघी घरी होत्या, तर तृप्ती यांचे भाऊ मॉर्निंग वॉकला गेले होते. याच दरम्यान वरील तीन इसम जबरदस्तीने त्यांच्या घरात घुसले. त्यांनी तृप्ती व तिच्या आईच्या अंगावरील दागिने पळवण्याचा प्रयत्न केला. मात्र दोघींनीही आरडाओरड केल्यानंतर तिन्ही चोरटे आपल्या हातातील साहित्य तिथेच टाकून पसार झाले होते. याबाबत

## वीस वर्षीय तरुणीचा रेबीजने मृत्यू

**पालघर** : पालघर तालुक्यातील हरणवाडी येथील एका हाउसिंग सोसायटीमध्ये राहणाऱ्या २० वर्षीय तरुणीचा भटक्या कुत्र्याच्या नखाच्या जखमेमुळे झालेल्या रेबीज संसर्गाने मृत्यू झाला. या प्रकरणानंतर नागरिकांनी भटक्या, तसेच पाळीव कुत्र्यांचा चावा किंवा नखांद्वारे झालेल्या जखमेवर तत्काळ उपचार घ्यावेत, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. पालघर नगरपरिषद क्षेत्रालगतच्या हरणवाडी येथील पॅरामाऊंट सोसायटीत राहणारी पायल सोनी हेमंत ओके हिला अंदाजे दोन महिन्यांपूर्वी सोसायटीजवळील भटक्या कुत्र्याने नख मारले होते. जखम किरकोळ वाटल्याने तिने ती दुर्लक्षित केली. मात्र, त्यानंतर तिला रेबीजचा संसर्ग झाला व ती गंभीर आजारी पडली. नख लागल्यानंतर आवश्यक प्राथमिक उपचार न झाल्याने तिची प्रकृती बिघडत गेली. वैद्यकीय उपचारादरम्यान लक्षणांवरून डॉक्टरांना रेबीजची शंका आली; मात्र तेव्हा उपचार उशिरा सुरू झाले. अखेर दि.२ डिसेंबर रोजी पायलचा मृत्यू झाला.

# निवडक

## सांबरी येथे कोल्ह्याला जीवदान

**भाकरवड :** अलिबाग तालुक्यातील कुडूस ग्रामपंचायतच्या हद्दीत गुरुवारी (दि.४) एका कोल्ह्याला अज्ञात वाहनाने उडवले. यात कोल्हा जखमी झाला होता. याबाबाची माहिती सर्पमित्र सतीश रामदास म्हात्रे (आवेटी, अलिबाग) यांना आशीर्वाद वसंत म्हात्रे यांनी फोन करून दिली. नंतर त्याला सुखरूप जागी नेऊन ठेवले.



तसेच याबाबत सांबरी गावातील जीवन पाटील (वनरक्षक) यांना भ्रमणध्वनीद्वारे कल्पना दिली असता त्यांनी तात्काळ वन विभाग अधिकारी (वडखल पेन) यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या टीमला प्राचारण केले. तासाभरात वनरक्षक प्रशांत सोनवणे, वनपाल शंकर पारधी आणि नितीन शिंदे हजर झाले. त्यानंतर सह्याद्री वन्यजीवरक्षक अर्थ सामायिक संस्था रोहा रायगड सागर दहिमबेकर आणि टीम गाडी घेऊन आले. त्यांनी कोल्ह्यास सुखरूप गाडीत ठेवून पुढील उपचारासाठी रोहा येथे नेले. एका वन्य प्राण्याचा जीव वाचवल्याने वनपाल अधिकारी यांनी जीवन पाटील, सतीश म्हात्रे (सर्पमित्र) आशीर्वाद म्हात्रे, गणेश पाटील आदींचे वनविभाग वडखल, रोहा सह्याद्री वन्यजीवरक्षक सामाजिक संस्था, रोहा-रायगड यांनी आभार मानले.

## हरिनाम सप्ताह उत्साहात साजरा

**महाड :** श्री दत्त जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाने दत्त नामाच्या घोषात खुटिल पंचक्रोशी दुमदुमली. दिगंबराच्या अखंड भजनात आणि भक्तिमय वातावरणात महाड तालुक्यातील खुटिल दत्तवाडीत मोठ्या उत्साहात सोहळा संपन्न झाला. यंदाचे या अखंड हरिनाम सप्ताहाचे ३७ वे वर्ष होते. श्री दत्तजयंती अखंड हरिनाम सप्ताहकरिता महाड, मुंबई, पुणे अशा विविध शहरातून भक्तगण दाखल झाले होते. मार्गशीष गुरुवार आणि दत्त जयंतीचा दुधशर्करा योग एकाच दिवशी आल्याने दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. श्री दत्त जयंतीनिमित्त दत्त मंदिरात अनेक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाईसह फुलांची आरास, पारंपारिक पाळणा गीते व आरत्या म्हणण्यात आल्या. प्रार्थना, हरिपाठ, सुस्वर भजनाने सर्वत्र मंगलमय वातावरण पसरले होते.



## सोमजाई देवीचा भव्य रथोत्सव

**श्रीवर्धन :** श्रीवर्धनची ग्रामदेवता आणि भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री सोमजाई देवीचा रथोत्सव अतिशय उत्साहात साजरा होत आहे. या भक्तिमय उत्सवास अनेक भाविक परगावाहन श्रीवर्धनला येत असतात. या रथोत्सवाची सुरुवात मार्गशीर्ष कृ.प्रतिपदेपासून म्हणजे दि. ५ डिसेंबर सकाळी ८ वा.पासून अखंड भजन उपक्रमास सुरुवात झाली. शुक्रवार दि.१२ डिसेंबर रोजी पहाटे ५:३० वा. काकड आरती होईल. सकाळी ११:३० ते दुपारी ३:३० पर्यंत महाप्रसाद होईल. त्यानंतर रथयात्रेला दि.१२ रोजी मध्यरात्री १२ वा. प्रारंभ होईल व सांगता सोहळा दि.१३ रोजी दुपारी १२ नंतर होईल. या रथोत्सवामुळे शहरात सर्वत्र अत्यंत उत्साहाचे व भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. दररोज अनेक भाविक श्री देवीच्या दर्शनाला मंदिरात येत आहेत.





## देवद येथे दत्त जन्मोत्सव साजरा

**नवीन पनवेल :** श्री शिवगिरी सेवा संस्थान पनवेल यांच्या विद्यमाने गुरुवारी (दि.४) सनातन संकुल, देवद येथे दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला. श्री शिवगिरी सेवा संस्थान, संस्थापक अध्यक्ष दिलीप उर्फ दादा शंकर खोत यांनी प्रथम मुंबई येथे चाळीस वर्षांपूर्वी सुरू केलेला हा दत्त जन्मोत्सव त्यांच्या पश्चात पनवेलमध्ये जवळपास २३ वर्षांपासून सुरू आहे. या उत्सवानिमित्त अनेक धार्मिक कार्यक्रम दिगंबर पांगारकर गुरुजी यांचे पौरोहित्यने करण्यात आले. मुंबई, ठाणे, सातारा, रत्नागिरी इत्यादी ठिकाणाहून आलेल्या भाविकांनी पालखी सोहळ्याला आवर्जून उपस्थिती लावली. या शिवगिरी सेवा संस्थानचे वतीने रक्तदान शिबिर, कोविड काळात अन्नधान्य वाटप, पॉवरलिफ्टिंग संघटनेला स्पर्धे साठी मदत, गोवंश बचाव समितीला आर्थिक सहाय्य, पटवर्धन रुग्णालयाला व्हील चेअर देणे, वृद्धाश्रमाला देणगी असे अनेक सामाजिक उपक्रमही वेळोवेळी राबविण्यात आलेले आहेत. यंदा हा उत्सव मंडळाचे सदस्य सामाजिक कार्यात सदा सहभागी असणारे नवीन पनवेलचे उदय सावंत आणि नेरे येथील रहिवासी भंडारी समाजाचे सुभाष खोत यांच्या आयोजनाखाली साजरा झाला.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- ऑफिसमध्ये कामाला मुलगी पाहिजे पात्रता- Bsc/Bcom, व Computer ची माहिती वेळ - सकाळी ९-सायं-६:३० ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार-१०,०००महिना, रविवार-सुट्टी. Contact- 9823585321
- फर्निचर पॅकींगसाठी मुले पाहिजे शिक्षणाची अट नाही ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार-१२,००० महिना, रविवार-सुट्टी. संपर्क - ९८२३५८५३२१
- Job opportunity - Office staff required for office in Alibag. Fresh graduate and post graduate candidates can call 9923750549 For interview

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# पनवेलच्या विकासाला नवी गती





### रेल्वे स्थानकाचे स्वरूप बदलणार

या दोन प्रकल्पांमुळे पनवेल रेल्वे स्थानकाचे स्वरूप पूर्णपणे बदलण्याची दाट शक्यता आहे. प्रवासी सुविधांचा विस्तार, तांत्रिक सुधारणांची वाढ आणि परिसरातील आर्थिक गती यामुळे पनवेल रेल्वे नेटवर्कमध्ये एक महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास येत आहे.

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल परिसरातील पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी पनवेलकर्जत उपनगरी रेल्वे मार्ग आणि जेएनपीटी दिल्ली वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर या दोन महत्त्वाच्या प्रकल्पांच्या कामांना गती मिळाली आहे. या दोन्ही प्रकल्पांमुळे प्रवासी व मालवाहतूक व्यवस्थेत मोठा बदल होणार असून पनवेलचे महत्त्व आणखी वाढणार आहे.

पनवेल-कर्जत उपनगरी रेल्वे मार्ग अंदाजे २९.६ किमी लांबीचा असून पनवेल, चिखले, मोहापे, चौक आणि कर्जत अशी पाच स्थानके या मार्गावर विकसित केली जात आहेत. मुंबई रेल्वे विकास महामंडळ (MRVC) हा प्रकल्प राबवत असून अंदाजे २ हजार ७८२ कोटींचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. हा मार्ग सुरू झाल्यानंतर पनवेल ते कर्जत प्रवासाचा वेळ ३० मिनिटांनी कमी होणार आहे. त्यामुळे नवी मुंबईपनवेलरायगड या भागांतील प्रवास सुलभ होणार आहे.

दरम्यान, पश्चिम डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर अंतर्गत दिल्लीएनसीआर ते जेएनपीटी या थेट मालवाहतूक मार्गाचे शेवटचे टप्पे पूर्णत्वाकडे जात आहेत. महाराष्ट्रातील वैतरणा ते जेएनपीटी हा १०२.९ किमी लांबीचा टप्पा, तसेच कुंडेवहाल बोगदा यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला आहे. या फ्रेट कॉरिडोरमुळे मालवाहतूक वेगवान, सुरक्षित व कमी खर्चिक होणार असून जेएनपीटी, पनवेल आणि नवी मुंबई परिसरातील लॉजिस्टिक्स व औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळेल.

## पनवेल येथे रक्तदान शिबीर

**पनवेल :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरीनिर्वाण दिनानिमित्त सिंद्दान्त सामाजिक शैक्षणिक, कला, क्रीडा सांस्कृतिक संस्थेच्या वतीने पनवेलमध्ये आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन पनवेल महानगर पालिकेचे शहर अभियंता कटेकर यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या प्रतिमेसमोर कॅण्डल लावून करण्यात आले. यावेळी पालिकेचे अधिकारी उपस्थित होते. शिबिराला मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून रक्तदान केले व आरोग्य तपासणी करून घेतली. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शैलेश गायकवाड यांनी विशेष मेहनत घेतली. आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे यांनीही शिबिराचे मार्गदर्शन केले. महिला वर्गासह सर्व समाजघटकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवल्याने उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# उरणमध्ये रॅलीतून ऐक्याचा नवा संदेश

**| उरण | प्रतिनिधी |**



उरणमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकरगार्डन येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पूजन करून अभिवादन करण्यात आले. प्रभातीच्या उजेडात उरणच्या भूमीत एकता व जागरूकतेचा सुरेल जल्लोष उमटला होता. परंपरेचा सुगंध आणि भविष्याचा ध्यास यांना साथ देत, समाजातील मान्यवरांनी एकत्रित येऊन भव्य रॅली काढण्यात आली. यावेळी प्रत्येक पावलात आदर, प्रेरणा आणि नव्या उमेदांची चाहूल जाणवत होती. हि रॅली आंबेडकर गार्डनपासून जरी मरी मंदिर, पालवी हॉस्पिटल, राजपाल नाका, गणपती चौक, नगरपालिका, आपला बाजार, गांधी पुतळा आणि पुन्हा आंबेडकर गार्डन या मार्गावर रॅली निघाली. शिस्तबद्ध, उत्साहपूर्ण आणि समाजाला एकत्र बांधणारी ही रॅली उरण शहरात ऐक्याचा नवा संदेश देत गेली. जुने मूल्य जपत, नवे स्वप्न विणत हा उपक्रम समाजात जागरूकतेची नवी चाहूल ठरला.

या सोहळ्यास प्रकाश कांबळे, हरीश जाधव, विनोद कांबळे, कुणाल जाधव, अखिलेश जाधव, रोशन गाडे, आनंद जाधव, सुरेश गायकवाड, साहिल जोशी, कुणाल गायकवाड आणि विजय गायकवाड या कार्यकर्त्यांनी उत्साहाने उपस्थिती लावली. समाजातील महिला शक्तीही दिमाखात सहभागी झाली. महिला मंडळ अध्यक्ष सुनिता सपकाळे, करूनच भिंगावडे, कविता जाधव, स्वप्नाली कवडे आणि गीता कांबळे यांनी या कार्यक्रमाला हृदयस्पर्शी बळ दिले. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष भावना घाणेकर, उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हानीफ मुलानी यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाचा गौरव अधिक वृद्धिंगत झाला.



## महामानवाला अभिवादन

**| उरण | प्रतिनिधी |**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक संघ द्रोणागिरीतर्फे भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ वा महापरिनिर्वाण दिनानिमित्त देवकृपा, द्रोणागिरी उरण येथे अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी नामदेव कुरणे अध्यक्ष, जगन्नाथ मेश्राम उपाध्यक्ष, शिवनाथ गायकवाड सहसचिव, सिद्धार्थ घोरपडेसहसचिव, तुषार गायकवाड, डॉ. प्रकाश दाभाडे, सिद्धार्थ जाधव, बोधाचार्य प्रमोद कांबळे, बोधाचार्य संगम कांबळे, नवनित कांबळे, कुणाल जाधव, आशिष रामटेके, खजिनदार, रजनिश वासनिक, मारुती खुणे, सुनिल गायकवाड, प्रकाश पळसपगार, डॉ. सविता डेरे आदी मान्यवर उपस्थित होते.

# म्हसळ्यात महामानवाला विनम्र अभिवादन

**| म्हसळा | प्रतिनिधी |**



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दि. ६ डिसेंबर २०२५ रोजी म्हसळा शहरात अभिवादन कँडल मार्चचे आयोजन करण्यात आले होते.

भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा म्हसळा आणि बौद्धजन पंचायत समिती तालुका म्हसळा यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम सायं. ६ वाजता पाभरे फाटा ते एस.टी. स्टँड म्हसळापर्यंत मेणबत्ती मोर्चा काढण्यात आला. याप्रसंगी लहान-थोर नागरिक, बौद्ध अनुयायी आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हातात मेणबत्त्या घेऊन शिस्तबद्ध पद्धतीने निघालेल्या या मार्चने 'सूर्य मावळला पण लाखो घरांना पेटवून गेला' अशा आशयाच्या संदेशाप्रमाणे एक वेगळा प्रकाशमय माहोल तयार केला. मार्चची सांगता झाल्यावर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि सामूहिक बुद्ध वंदना घेऊन विनम्र अभिवादन करण्यात आले.

## एस.जी.म्हात्रे यांचे निधन

**सुतारवाडी :** ना. ना. पाटील हायस्कूल पोयनाडचे लोकप्रिय आदर्श शिक्षक सिताराम गणू म्हात्रे म्हणजेच एस. जी. म्हात्रे यांचे निधन झाले. मराठी विषयात हातखंडा असलेले विद्यार्थ्यांना तन्मयतेने शिकविणारे, विद्यार्थी तसेच सर्व शिक्षक बंधू यांचे लोकप्रिय असलेले सरांच्या निधनामुळे असंख्य विद्यार्थी तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मध्ये दुःखाची लाट पसरली आहे.





# शाळेत साजरा होणार विद्यार्थ्यांचा वाढदिवस

### गाढेश्वर शाळेचा अनोखा उपक्रम

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गाढेश्वर (पनवेल) येथील २८ विद्यार्थ्यांचा वाढदिवस साजरा होणार आहे. नारायण लक्ष्मण तांबोळी सामाजिक संस्था, नेरेचे अध्यक्ष योगेश तांबोळी आणि हर्षला तांबोळी यांनी या शाळेत नवीन उपक्रम सुरू केला असून वाढदिवस असणाऱ्या विद्यार्थ्याला एक ड्रेस, केक आणि इतर विद्यार्थ्यांना खाऊ देऊन त्याचा वाढदिवस साजरा करणार आहेत.

प्रत्येक विद्यार्थ्याला वाटतं की त्याचा वाढदिवस साजरा व्हावा. मात्र ग्रामीण भागातील काही विद्यार्थ्यांचे वाढदिवस साजरे होत नाहीत. त्यातच आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना वाढदिवस हा खूपच हवाहवासा वाटतो. योगेश तांबोळी आणि हर्षला तांबोळी यांनी गाढेश्वर येथील शाळेतील विद्यार्थ्यांचा वाढदिवस साजरा करण्याचे ठरवले. बाल दिनाच्या दिवशी या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. या उपक्रमाची सुरुवात पहिली इयत्तेतील मायरा संजय चौधरी या विद्यार्थिनीच्या वाढदिवसाने करण्यात आली. यावेळी या विद्यार्थिनीला ड्रेस आणि केक देण्यात आला. आणि इतर विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले.

गाढेश्वर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत पटसंख्या २८ असून दहा मुले आणि १८ मुली आहेत. डिसेंबर महिन्यात देखील विद्यार्थ्यांचे वाढदिवस साजरे होणार आहेत. या शाळेत सर्व आदिवासी विद्यार्थी शिकत आहेत. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचा वाढदिवस साजरा होणार असल्याने विद्यार्थी आनंदित आहेत तसेच येथील शिक्षक रेश्मा रमेश जगे आणि सुनील शंकर पोकळे यांनी या उपक्रमाबद्दल तांबोळी कुटुंबियांचे आभार मानले.

# नेरे येथे विद्यार्थी जनजागृती अभियान

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

नेरे येथील शांतीवन येथे वाहतूक नियंत्रण व सायबर क्राईम यांच्या माध्यमातून विद्यार्थी जनजागृती अभियान पार पडले. हे अभियान पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच वाहतूक शाखा, नवीन पनवेल यांच्या आयोजनातून पार पडले.

राज्यभरातून विविध शैक्षणिक विभागातील शाळा, कॉलेज यांचे शिबीर शांतीवन येथे होत असतात. व्हीजी वाजे कॉलेज मुंबई ईस्ट आणि बंट्स इन्स्टिट्यूट फॉर हाईयर एज्युकेशन जुईनगर नवी मुंबई या विद्यार्थ्यांना ६ डिसेंबर रोजी वाहतूक व सायबर या विषयी जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमस दोन्ही कॉलेजचे १०० ते २०० विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये विध्यार्थ्यांना सुरक्षित वाहतुकीसंदर्भात महत्वाचे संदेश देण्यात आले. मोटार सायकल चालवतांना हेल्मेट घालणे अनिवार्य आहे. चार चाकी चालवत असाल तर सिटबेल्ट लावणे, धोकादायक पद्धतीने वाहने चालवू नये, ट्राफीक सिग्नल काटेकोर पालन करणे, वेगावर नियंत्रण ठेवणे व वाहन संयमाने चालवणे याविषयी प्रबोधन सत्राचे मार्गदर्शन पोलीस उप निरीक्षक पांडुरंग पवार यांनी केले. विद्यार्थ्यांना नियमांचे पालन करण्याची प्रेरणा देत त्यांनी वाहतुकीतील शिस्त व अपघात कमी करण्यासाठी आवश्यक काळजी आणि सुरक्षिततेचे महत्व यावर मार्गदर्शन केले. मोबाईलचा वापर कमीत कमी कसा करावा, त्यामुळे सायबर क्राईम होणार नाही, यावर मार्गदर्शन केले.



'फार्मर कप' शेतकरी प्रशिक्षण उत्साहात | कृषी विभागासह पाणी फाउंडेशनचा पुढाकार

# शेतकऱ्यांना समजली शेतीची नवी तांत्रिक पद्धत

**| पाली | प्रतिनिधी |**



महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या तसेच पाणी फाउंडेशनच्या सहकार्याने आयोजित सत्यमेव जयते फार्मर कप शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाला सुधागड तालुक्यातील शेतकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पाली येथील भक्त निवास हॉलमध्ये हे प्रशिक्षण नुकतेच पार पडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी दयावंती कदम यांनी केले. पाणी फाउंडेशनच्या वतीने प्रशिक्षण देण्यासाठी रोशनी जाधव, प्रिया गमरे व त्यांच्या सहकारी निकिता मोकल उपस्थित होत्या. शाश्वत शेती, पाणी बचत तंत्रज्ञान आणि आधुनिक कृषी व्यवस्थापनाचे वाढते महत्त्व अधोरेखित करत कृषी विभागाने शेतकऱ्यांना नव्या तांत्रिक पद्धतींची ओळख करून दिली. प्रशिक्षण सत्रादरम्यान उपस्थित शेतकऱ्यांनी मार्गदर्शनाचा लाभ घेत सक्रिय सहभाग नोंदवला.

१०० हून अधिक शेतकरी या प्रशिक्षणात सहभागी झाले होते. मृदा परीक्षण, सेंद्रिय शेती पद्धती, हवामानानुसार पीक व्यवस्थापन, विविध पिकांच्या सुधारित तंत्रांचा अवलंब, पाण्याचे शास्त्रीय व्यवस्थापन व कमी खर्चात अधिक उत्पादन मिळविण्याचे उपाय याचाबत सविस्तर माहिती तज्ज्ञ मार्गदर्शकांनी दिली. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी त्याचे अनुभव मांडले.

सहभाग वाढीचा उद्देश कार्यक्रमात 'फार्मर कप २०२५-२६' या उपक्रमाची विस्तृत माहिती देण्यात आली. या स्पर्धेद्वारे शेतकऱ्यांच्या प्रगतशील शेतीत सहभाग वाढावा आणि नव्या तंत्रज्ञानाचा प्रसार व्हावा, हा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन मारुती आढाव (उप कृषी अधिकारी) यांनी केले. या प्रशिक्षणास मंडळ कृषी अधिकारी परळी सुखदेव कोळपे, कृषी अधिकारी वैशाली कोळपे व तालुक्यातील सर्व सहाय्यक कृषी अधिकारी उपस्थित होते. मंडळ कृषी अधिकारी पाली उदय भोसले यांनी शेतकऱ्यांना शेतकऱ्यांचा डिजिटल मित्र महाविस्तार एआय ॲप नोंदणी व वापराबाबत मार्गदर्शन केले व कार्यक्रमास उपस्थित सर्वांचे आभार व्यक्त केले.

### प्रशिक्षणाची आवश्यकता

शाश्वत कृषी विकासासाठी अशा प्रशिक्षणांची आवश्यकता असल्याचे कृषी विभागाने व्यक्त केले. शेतकऱ्यांनी कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत आगामी काळात अशा उपयुक्त प्रशिक्षणाचे प्रमाण वाढवावे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

# चिपळूणला पाण्याची बसणार झळ

## कोयना टप्पा १ व २ तीन महिने राहणार बंद



। चिपळूण । प्रतिनिधी ।

कोयना धरणाच्या बोगद्याला लागलेली गळती काढण्याचे काम लवकरच सुरू होणार आहे. त्यावेळी कोयना प्रकल्पाचा टप्पा एक आणि दोन सुमारे ३ महिन्यांसाठी बंद राहणार आहे. त्यामुळे चिपळूण शहरासह अनेक गावांना ३ महिने पाणीटंचाई जाणवणार आहे. खेर्डी, खडपोली आणि लोटे एमआयडीसीला सुद्धा टंचाईची झळ बसणार आहे.

कोयना धरणातून पोफळी येथील वीजनिर्मिती करणाऱ्या कोयना प्रकल्पाच्या टप्पा एक आणि दोनला पाणीपुरवठा करणाऱ्या आपत्कालीन बोगद्याला गळती लागली आहे. या गळतीमुळे सह्याद्रीच्या डोंगरातून धबधब्यासारखे पाणी वाहत आहे. गळती दुरुस्तीसाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. कोयना सिंचन विभागाच्या अधिकाऱ्यानी गेल्या महिन्यात दुरुस्तीच्या कामाचा आढावा घेतला. सह्याद्रीच्या डोंगरातील बोगदा सुमारे ३०० फूट खोल आहे. त्या ठिकाणी जाऊन पाहाणी करायची होती. त्यामुळे टप्पा एक आणि दोनला होणारा पाणीपुरवठा सुमारे पाच दिवस बंद केला होता. त्यावेळी पोफळी कोंडफणसवणे, शिरगाव, तळसर, मुंढे या भागाच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम झाला होता. दुरुस्तीचे बोगद्यातील गळती थांबवण्यासाठी उपाययोजना काम हाती घेतल्यानंतर ते पुढील तीन महिने चालणार आहे. त्यामुळे तीन महिने कोयना अवलंबून असणाऱ्या गावांना टंचाईला सामोरे धरण आणि कोळकेवाडी धरणाच्या पाण्यावर जावे लागणार आहे. कोयना धरणातून येणारे पाणी प्रथम टप्पा एक आणि दोनमध्ये घेतले जाते. तेथे वीजनिर्मिती केल्यानंतर ते पाणी चौथा टप्प्याकडे सोडले जाते. चौथ्या टप्प्यात वीजनिर्मिती झाल्यानंतर ते पाणी कोळकेवाडी धरणात आणले जाते, कोळकेवाडी धरणाच्या पायथ्याशी तिसरा टप्पा आहे. तेथे वीजनिर्मिती केल्यानंतर कोयनेचे पाणी कालव्याद्वारे वाशिष्ठी नदीमध्ये सोडले जाते. नदीत सोडले जाणारे कोयनेचे अवजल उचलण्यासाठी चिपळूण नगरपालिका आणि एमआयडीसीने नदीलगत जॅकवेलची उभारणी केली आहे. पोफळी परिसरातील पाच गावांना ग्रॅव्हिटीमधून पाणी दिले जाते. आता दुरुस्तीचे काम सुरू केल्यानंतर येणारे पाणी बंद होणार आहे, त्यारुळे संबंधित ग्रामपंचायतीनी पर्यायी व्यवस्था करावी असे पत्र रहानिर्मिती कंपनी, जलसंपदा विभागाने ग्रारपंचायतींना यापूर्वी पाठवले आहे.

## शिक्षक परिषदेची जिल्हा कार्यकारिणी सभा

**सुतारवाडी:** महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग शाखा रायगडची जिल्हा कार्यकारणी सभा रायगड जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा कोलाड तालुका रोहा येथे राजेश सुर्वे यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. सदर सभेत खालील विषयावर चर्चा करून निर्णय घेण्यात आले. सभासद नोंदणी पावती पुस्तके जमा करणे, शिक्षक परिषद सन २०२६ दिनदर्शिका प्रकाशन माहे जानेवारी २०२६ मध्ये करावे, दरमहाचे वेतन उशिरा होत आहे, प्राथमिक शिक्षकांना दिली जाणारी ऑनलाईन कामे शासनाकडून येणारी विविध ॲप, जिल्हा परिषदेकडील विविध प्रलंबित कामे यावर राजेश सुर्वे यांनी बहुमूल्य मार्गदर्शन केले.

## पालीवाला महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनी अभिवादन



। पाली/बेणसे । प्रतिनिधी।

शिक्षण, संघटन आणि संघर्ष हा महामानव डॉ.बाबासाहेबांनी दिलेला मंत्र आजच्या तरुण पिढीसाठी दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन प्राध्यापक उमेश इनामदार यांनी केले.

शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालय, पाली येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम अत्यंत भावपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.या कार्यक्रमाचे अध्यक्षपद प्रा. उमेश इनामदार यांनी भूषविले. तर कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. सोहोनी उपस्थित होते.

यावेळी व्याख्यानात बोलताना प्रा. डॉ. सोहोनी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा, सामाजिक चळवळीतील योगदानाचा तसेच भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीतील त्यांच्या अतुलनीय कार्याचा सखोल आढावा घेतला. शिक्षण, संघटन आणि संघर्ष हा बाबासाहेबांनी दिलेला मंत्र आजच्या तरुण पिढीसाठी दिशादर्शक आहे, असे त्यांनी यावेळी प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतामध्ये प्रा. उमेश इनामदार यांनी बाबासाहेबांच्या विचारांची आजच्या सामाजिक परिस्थितीत गरज अधोरेखित करत समता, न्याय, बंधुता आणि आत्मसन्मान ही मूल्ये समाजमनात रुजवणे हीच बाबासाहेबांना खरी आदरांजली ठरेल, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमात चैतन्या काळभोर हिने आपल्या मनोगतातून डॉ. बाबासाहेबांप्रती कृतज्ञता व्यक्त करत, त्यांच्या विचारांनीच आपले जीवन घडत असल्याची भावना व्यक्त केली. तिच्या भावनिक व अभ्यासपूर्ण भाषणाला उपस्थितांकडून विशेष दाद देण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# चौक–कर्जत फाट्याला वाहतूक कोंडीचे ग्रहण




। रसायनी । प्रतिनिधी ।

मुंबई–पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चारवरून कर्जतसाठी जाण्याच्या चौक–कर्जत फाटा येथे नित्याचीच वाहतूक कोंडी सुरू झाली आहे, या वाहतूक कोंडीमुळे अनेकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

मुंबई–पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार वरून कर्जत, माथेरान, कल्याणकडे जाण्यास मार्ग आहे, याला कर्जत फाटा असेही बोलले जाते. येथे नित्याचीच वाहतूक कोंडी झाली असली तरी शनिवार आणि रविवार या दोन्ही दिवशी तास तास वाहतूक कोंडी होत आहे. येथेच वाहतूक नियंत्रण कश असून तो बंदच असतो, वाहतूक पोलीस तिथे बसल्याचे दिसत नाही. वाहतूक पोलिसांच्या दोन खाजगी गाड्या फिरत असताना आढळत आहेत,. मात्र वाहतूक कोंडी च्या वेळी त्याही दिसत नाहीत,त्यामुळे वाहतूक कोंडी नित्याची झाली आहे. शनिवार आणि रविवार या दोन दिवसांत कर्जत व कर्जत मार्गावर असलेल्या फॉर्म हाऊस, रिसॉर्ट आणि धनिकांच्या ठिकाणी जाणाऱ्या गाड्यांची गिंतीच नाही, याचा त्रास स्थानिक नागरिकांना जास्त प्रमाणात होत आहे.

# ‘संविधानाचा आदर करून समानता स्वीकारा’



। कोर्लई । प्रतिनिधी।

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला संदेश पिढ्यानपिढ्या समाजाला दिशा देत आहे. याचा सर्वांनी विचार करावा आजचा ६ डिसेंबर रोजी असणारा स्मृतिदिन केवळ अभिवादनाचा क्षण नसून आपल्या जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे म्हणून त्यांच्या प्रतिमेला नुसते वंदन करू नका त्यांच्या विचारांना वंदन करा. असे प्रतिपादन आपत्ती व्यवस्थापन तज्ञ तथा रायगड भूषण डॉ. जयपाल पाटील यांनी केले.

शिक्षण मिळवणे जीवनातील सामाजिक अन्याय विरुद्ध लढा होता,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मेहनत चिकाटीने कोलंबिया विद्यापीठातून पीएचडी, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधून बॅरिस्टर पदवी घेतली आणि भारतासाठी नव्हे जागतिक पातळीवर ते थोर विचारवंत ठरले,ते सामाजिक विचार अभ्यासक होते त्यांनी भारतीयांसाठी संविधान लिहिले ते नागरिकांच्या सन्मानाचे सर्वांचे संरक्षण करणारे दस्तऐवज तयार झाले त्यांचा संपूर्ण जगामध्ये अभ्यास केला जातो त्यांनी शेतकरी शेतमजूर कामगार आणि महिलांसाठीचे कार्य त्यांचे महान होते. त्यांच्या प्रतिमेला नुसते वंदन करू नका त्यांच्या विचारांना वंदन करा, मुलांनो आपली प्रगती करायची असेल तर दांडगा अभ्यास करा त्यांचे चरित्राचे वाचन करा, आपण आयुष्यात पुढे काय केले पाहिजे याची जाणीव होईल. यामुळे आपल्या शाळेचे नाव उज्वल होईल, असे डॉ. पाटील म्हणाले.

# स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुतळ्याचे अनावरण १२ डिसेंबर रोजी

**रायगड** :‘सागरा प्राण तळमळला..’या अमर ओळींनी प्रत्येक भारतीयाच्या मनात देशप्रेमाची ज्योत चेतवली आहे. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांनी सागरांच्या लाटांना साक्षी ठेऊन रचलेल्या या महान काव्याला ११६ वर्षे उलटली आहेत. या ऐतिहासिक क्षणाचे औचित्य साधून व्हॅल्युएबल ग्रुपतर्फे १२ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३:०० वाजता श्री विजया पुरम, पोर्टब्लेअर येथे सागरा प्राण तळमळला या विशेष कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. यावेळी बियोदनाबाद येथे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुतळ्याचे भव्य अनावरण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक परमपूज्य डॉ. मोहन भागवत यांच्या शुभहस्ते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. मुंबईतील प्रसिद्ध उद्योजक व्हॅल्युएबल ग्रुपचे संचालक अमेय हेटे यांच्या संकल्पनेतून हा पुतळा साकारण्यात आला आहे. वि. दा. सावरकरांच्या राष्ट्रनिष्ठा, त्याग आणि निर्भय चिंतनाचे हे सजीव प्रतीक ठरणार आहे. हा पुतळा महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित झालेल्या राम सुतार यांनी डिझाइन करून साकारलेली आहे.या सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार यांची सन्माननीय उपस्थिती राहणार असून, या कार्यक्रमाला इतरही क्षेत्रांतील मान्यवर हजर राहणार आहेत.

## चौकशी जाहीर नोटीस

जा.क्र. २७३२/२५
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
कल्पतरू इमारत पोस्ट ऑफिसजवळ
अलिबाग, जि. रायगड

**बदल अर्ज क्र :- ३४९/२४** दि. ०५/१२/२५

**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये**

**सार्वजनिक न्यासाचे नांव- माजी आमदार दत्तुशेठ पाटील शिक्षण प्रसारक मंडळ, नावडे, ता. पनवेल, जि. रायगड**

**न्यास नोंदणी क्रमांक :- एफ -३४६५ (रायगड)**

**श्री. आदित्य बाळाराम पाटील :-** अर्जदार

सर्व सबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेल्या अर्ज यासबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

३. खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीचे आहे काय?

**अ) स्थावर मिळकत :- (वर्णन)**

भूखंड वाटप के एवजी - ३४ सी-३८, भूखंड क्र.३८, रस्ता क्रमांक/नाव, सेक्टर क्र.३४ सी, नोड-खारघर, भूखंडाचे क्षेत्रफळ-४०००.००० चौ. मी., दर किंमत/चौ. मी., एकूण भाडेपट्टी हप्ता रूपये ६१,४४,०००.०० अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक/खंड ते भूखंड क्षेत्राचे प्रमाण ०१, भूखंडाचा वापर/जमिनीचा वापर, शाळा आणि कनिष्ट महाविद्यालय

**चतुःसीमा**
**पूर्व :- ११.० मी. रुंद रस्ता**
**पश्चिम : भू.क्र. ३९ खेळाचे मैदान**
**दक्षिण : भू.क्र. ३७ खेळाचे मैदान**
**उत्तरेस : नोडल कमर्शिअल ५६.७७**

सदरच्या चौकशी प्रकरणांमध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनीशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड यांचे शिक्यानिशी आज दिनांक ०५/१२/२०२५ रोजी दिली.

सही/-
**प्र अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**रायगड विभाग, रायगड**

## जाहीर नोटीसला हरकत

तमाम लोकांना या जाहीर हरकतीने कळविण्यात येते की, दैनिक रायगड नगरी या वर्तमानपत्रामध्ये शनिवार दि. ०६/१२/२०२५ रोजी पान नं. ३ वर मौजे खरोशी ता. पेण, जि. रायगड येथील गट नं. ६५ पोटखराब्यासह क्षेत्र ०-७४-० हे. आर. आकार १.३१ रू. पै. ही मिळकत १) श्री. चंद्रकांत जोमा पाटील, २) श्री. एकनाथ जोमा पाटील, ३) श्री. विलास बाळाराम गावंड, ४) श्री. पंढरीनाथ बाळाराम गावंड. ५) यमुना वामन डंगर, ६) चंद्रभागा वसंत घरत, ७) ज्योती जगन्नाथ गावंड, ८) प्रज्ञा जगन्नाथ गावंड ९) मंजुळा बाबुराव पाटील, १०) निता सुरेश गावंड, ११) विजया सखाराम म्हात्रे, १२) विमल देवजी म्हात्रे, १३) श्री. शंकर बाळाराम गावंड, १४) कुसूम बाळाराम मढवी, १५) भरत बाळाराम गावंड, १६) प्रविण वामन पाटील, १७) प्रशांत वामन पाटील, १८) मनिषा वामन पाटील, या कब्जेदारांकडून ही मिळकत, ॲड.अपेक्षा दामोदर पाटील रा.५०७, ५ वा मजला, सेक्टर १७, खांदा कॉलनी, भूमी लॅन्ड मार्क, किया शोरूमच्या वर यांचे आशिल विकत घेत असल्याबाबत त्यांनी जाहीर नोटीस दिली आहे. त्या नोटीशीला आमचे अशिल श्री. भरत दत्तु पाटील रा. डोलवी, ता. पेण, जि. रायगड यांची सक्त हरकत आहे. आमचे अशिलांनी वरील कब्जेदारांबरोबर सदर मिळकतीचा साठेकरार ता. १४/१०/२०२५ रोजी केला असून त्या साठेकरारात ठरलेल्या अटी व शर्तीप्रमाणे व्यवहार पुर्ण करण्यास आमचे अशिल नेहमीच तयार होते व आहेत. आमचे अशिलांना फसवून त्यांचे अपरोक्ष आता सदर कब्जेदार इतर कोणाशी तरी व्यवहार करत आहेत, त्याला आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. त्यामुळे या मिळकतीच्या हस्तांतरणाचा व्यवहार कोणीही करू नये याची या जाहीर हरकतीद्वारे सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
ता. ०८/१२/२०२५

सही /-
**ॲड. शिरीष पद्माकर लेले,**
श्रीकृपा, भाऊसाहेब लेले चौक,
जुन्या नगरपालिकेसमोर, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

दि.०७/१२/२०२५

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक यांच्याकडुन कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे सदरची मिळकत हि निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीची विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| आंबेपुर, ता.अलिबाग | ७३/२/क/१ | ०-४६-००<br>पो.ख.०-०४-००<br>एकुण ०-५०-०० | ०.९३ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीचा जाहिर नोटीशीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ०७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणारे यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरच्या मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे आशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. अशिष नरेंद्र म्हात्रे**
मु.पेझारी (पळी आंबेघर) पो.पोयनाड,
ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

## जाहीर नोटीस

सर्व लोकास या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते कि, आमचे अशील यांनी खालील वर्णनाची सामाईक मिळकतीचे मालक श्रीमती स्वाती राजेश संघवी, श्रीमती सोनल प्रकाश संघवी, श्री. विशाल चंपकलाल संघवी यांचे सामाईक मालकीची मिळकत विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी चालू आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| सहाण | ९८ | ०-५९-४०<br>पो.ख. ०-१०-१०<br>एकूण ०-६९-५० | १२.२८ |

सदर नमूद मिळकती पैकी श्रीमती स्वाती राजेश संघवी, श्रीमती सोनल प्रकाश संघवी, श्री. विशाल चंपकलाल संघवी यांचे सामाईक मालकीचे क्षेत्र ०-२५-४० हे.आर., पो.ख. ०-०४-१० हे. आर. एकूण क्षेत्र ०-२९-५० हे. आर. हि मिळकत या जाहीर नोटीशिचा विषय आहे.

सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकारार, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क, व हितसंबंध वा दुरान्वये संबंध असल्यास अशा व्यक्तीनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार याजकडे हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे, असे समजून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू. व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०८/१२/२०२५

**(अँड. वैभव गिरीधर पाटील)**
जिल्हा न्यायालय अलिबाग, रायगड
मु. सांबरी, पो. कुर्डुस,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ८८०५५१८०६८

## दाव्यासंबधीची कलम १०१ नोटीस

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, खालापूर जि. रायगड यांचे समोर जाहीर नोटीस**

जा.क्र.६९८/कलम १०१/जाहीर नोटीस/सन २०२५-२६

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि. अलिबाग शाखा खोपोली ता. खालापूर, जि. रायगड. — अर्जदार

विरुध्द

१. श्री. सुजीत यादव ओव्हाळ कर्जदार दावा रक्कम रुपये :- १,८०,४९७/-
रहणार मु. सिद्धार्थनगर विहारी बौद्धवाडा खोपोली जि. रायगड.
व्यवसाय नोकरी

१. श्री. संतोष मंगळदास बिराडे — जाब देणार
रहणार मु. पो. भानवज बौद्धवाडा खोपोली ता. खालापूर, जि. रायगड. व्यवसाय नोकरी

विरुध्द

१.श्री. सादिक बादरुद्दीन कराचीवाला कर्जदार दावा रक्कम रुपये :- १९,९१,१९९/-
रहणार मु. गुडलक थेटर शांतीनगर खोपोली जि. रायगड

१. श्री. यशवंत लक्ष्मण साबळे २. श्री. राजू संदीप रोडे — जाब देणार
रहणार मु.शांतीनगर खोपोली पो. खालापूर जि. रायगड. — रहणार मु. आशीर्वाद कॉलनी उसरली खुर्द पो. पनवेल, जि. रायगड.

विरुध्द

१. श्री. जितेंद्र मुळशंकर रावळ कर्जदार दावा रक्कम रुपये :- ९,३१,९१४/-
पत्ता:- मु.७६/अ एस टी स्टॅंडच्या समोर शिळफटा. खोपोली, ता. खालापूर हॉटेल व्यवसाय

१. श्री. निशांत सिद्धार्थ पानपाटील २. श्री.संतोष गुरुनाथ जंगम — जाब देणार
पत्ता :- मु.पो. खालापूर, ता. खालापूर, जि. रायगड. — पत्ता:-४७४ श्री दत्त छाया निवास पाटील आली ता. खालापूर, जि. रायगड.

विरुद्ध

१. सौ. सुविधा सचिन खैर कर्जदार दावा रक्कम रुपये :-रु.१०,४५,२८९/-
पत्ता :- मु. माऊंटव्हीव्ह सो.आय विंग फ्लॅट ६०१. गुडलक चौक खोपोली, ता. खालापूर

१. श्री. प्रवीण अशोक गायकवाड २.श्री. मोहम्मद नईम अब्दुल गफुर मुकरी — जाब देणार
मु. नगरपालिका चाळ खोपोली जि. रायगड. — पत्ता :-मु.मीडटाउन अर्कडे, बाजारपेठ जमा माज्जिद जवळ,पावर हाऊस खोपोली जि. रायगड.

विरुध्द

१. सौ. सुविधा सचिन खैर कर्जदार दावा रक्कम रुपये :- रु.१५,५८,८२०
पत्ता :- मु. माऊंटव्हीव्ह सो.आय विंग फ्लॅट ६०१, गुडलक चौक खोपोली, ता. खालापूर

१. श्री. कुमार अशोक गायकवाड २. श्री. मोहम्मद नईम अब्दुल गफुर मुकरी — जाब देणार
मु. नगरपालिका चाळ खालची खोपोली जि. रायगड. — पत्ता :- मु. मीडटाउन अर्कडे, बाजारपेठ जमा माज्जिद जवळ, पावर हाऊस खोपोली जि. रायगड.

विरुध्द

१. श्री. दिनेश रमाकांत गुरव कर्जदार दावा रक्कम रुपये :- १८,९५,२९१/-
मु. उषा निवास सह्याद्री विद्यालयासमोर खोपोली जि. रायगड
२ श्री. राजेश प्रभूलाला अभाणी कर्जदार
मु.प्रभूनिवास शिवाजीचौक शील फाटा खोपोली

१. श्री. जितेंद्र मुळशंकर रावळ २.श्री. संतोष गुरूनाथ जंगम जाब देणार
पत्ता:- मु.७६/अ एस टी स्टॅंडच्या समोर शिळफटा खोपोली, ता. खालापूर हॉटेल व्यवसाय — रहणार मु.४७४ श्री दत्त छाया निवास पाटील आली ता. खालापूर, जि. रायगड.

विरुध्द

१. सौ. सुविधा राघव पिंगळे कर्जदार दावा रक्कम रुपये :- १४,५३,५६५/-
रहणार मु. टाटा पावर हाऊस क्याम्प सायमल खोपोली ता. खालापूर जि. रायगड

१. श्री. ऋषिकेश गणपत चाळके २.श्री.मयूर महादू गायकवाड जाब देणार
मु.स्वामी समर्थ चौक खालापूर पो. खालापूर जि. रायगड. — मु. मस्को कॉलनी जी ३ रूम नं ४० जगदीश नगर खोपोली, जि. रायगड.

विरुद्ध

१. श्री. संतोष किसन म्हामूनकर कर्जदार दावा रक्कम रुपये :-४१,९०,९६३/-
मु. कुंभिवली, पो.ता.खालापूर जि. रायगड
२ श्री. तेजस संतोष म्हामूनकर कर्जदार
मु. कुंभिवली, पो.ता.खालापूर, जि. रायगड

१. श्री. सतिष तुळशीदास बनेश्वर २. सौ. प्रतिभा विष्णू पाटील जाब देणार
पत्ता:- मु. सुधा निवास भानवाज रोड साईबाबा मंदिराजवळ खोपोली ता. खालापूर — मु. वर्धमान नगर अंकिता अपार्टमेंट खोपोली ता. खालापूर, जि. रायगड.

विषय :- महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम १०१ (१) अन्वये सुनावणी बाबत.

संदर्भ :- १. बॅंकेकडील प्राप्त अर्ज दिनांक १८/०९/२०२५
२. या कार्यालयाच्या नोटीस ०८/१०/२०२५, ३०/१०/२०२५, ११/११/२०२५

आपणास नोटीस देण्यात येते की रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि. अलिबाग शाखा खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड. या बॅंकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ (१) अन्वये दाखला मिळिवणे करीता या कार्यालयात दिनांक १८/०९/२०२५ रोजी आपल्या विरुद्ध दावा दाखल केला आहे. सदर दाव्याची सुनावणी दिनांक रोजी या कार्यलयात उपस्थित रहावे असे कळवून देखील आपण सुनावणीसाठी या कार्यालयात उपस्थित राहीले नाहीत. आपणास पुन्हा एकदा नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरून अंतिम सुनावणीसाठी दिनांक १२/१२/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता आपले म्हणने मांडण्यासाठी या कार्यलयात उपस्थित रहावे. उपस्थित न राहील्यास किंवा लेखी स्वरुपात म्हणेणे न मांडल्यास तुम्हास काही सांगावयाचे नाही असे गृहित धरुन सदर दिवशी चौकशी पूर्ण करणेत येईल व सदर प्रकरणी गुणवत्तेच्या आधारावर निर्णय घेण्यात येईल. या कामी होणाऱ्या परिणामास आपण वैयक्तिकरित्या जबाबदार रहाल याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस आज दिनांक ०५/१२/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाची मुद्रासह दिली असे.

**सही/-**
**(निलेश शिंदे)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था, खालापूर, जि. रायगड.**

टिप :- व्यवस्थापक रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि. अलिबाग शाखा खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड.

**सही/-**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था, खालापूर, जि. रायगड.**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

**(महाराष्ट्र शासन अंगिकृत)**

**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. ५६/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक ०४/११/२०२५ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक प्रहार, मुंबई, दैनिक कृषिवल, रायगड, दैनिक हिंदुस्थान टाईम्स, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक एक्टीव टाईम्स, मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक भास्कर, मुंबई या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई निविदा उपलब्धता, कंत्राटदारांचे प्रश्न संकेतस्थळावर नोंदविणे, पुर्व अहर्ता बैठक, कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण/महामंडळाचा खुलासा बाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | दिघी बंदराभिमुख औद्योगिक क्षेत्र (डिपीआयए)... महाराष्ट्र राज्यातील दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरच्या दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र क्लस्टर क्रमांक ७ येथे थीम-आधारित औद्योगिक उद्यानांसाठी डीबीएफओटी पिपिपि आधारावर जागतिक/आंतरराष्ट्रीय विकासकाची निवड करण्यासाठी प्रस्तावाची विनंती. | ₹०.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १९/०१/२०२६ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २२/१२/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. पुर्व अहर्ता बैठक दिनांक २३/१२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता म.औ.वि.म., मुख्यालय, उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००९३ या कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २९/१२/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# भारतीय संघाचा शेवट गोड

## तिसऱ्या सामन्यात दणदणीत विजय

| विशाखापट्टणम | वृत्तसंस्था |

भारतीय संघाने शनिवारी (दि.६) दक्षिण आफ्रिकेविरुद्ध तिसऱ्या आणि निर्णायक एकदिवसीय सामन्यात दणदणीत विजय मिळवला. विशाखापट्टणमला झालेल्या या सामन्यात भारताने ९ गडी राखत विजय मिळवत तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका २-१ अशा फरकाने जिंकली. हा २०२५ वर्षातील भारताचा अखेरचा एकदिवसीय सामना होता. त्यामुळे एकदिवसीय सामन्यांत भारतीय संघाने वर्षाचा शेवट गोड केला. यावेळी यशस्वी जैस्वालने एकदिवसीय पहिलं वहिलं शतक ठोकले. तर, विराट कोहली आणि रोहित शर्माने अर्धशतके साकारली. त्याचबरोबर कुलदीप यादव आणि प्रसिद्ध कृष्णाने गोलंदाजीत चमक दाखवली.




या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने भारतासमोर २७१ धावांचे लक्ष्य ठेवले होते. लक्ष्याचा पाठलाग करताना यशस्वी जैस्वाल आणि रोहित शर्मा यांनी संयमी सुरुवातीनंतर दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांना मोठे यश मिळू दिले नाही. रोहितने नंतर आक्रमक खेळायलाही सुरुवात केली होती. दोघांमध्ये दीडशतकी भागीदारीही झाली. मात्र, रोहित शर्मा ७५ धावांची खेळी करून बाद झाला. त्यानंतर विराट कोहलीने जैस्वालची भक्कम साथ दिली. सुरुवातीला संघर्ष करणाऱ्या जैस्वालने अर्धशतकानंतर धावांची गती वाढवली. त्यातच दुसऱ्या बाजूने विराटने सुरुवातीपासूनच स्फोटक फलंदाजी करण्यास सुरुवात केली. यादरम्यान जैस्वालने १११ चेंडूत एकदिवसीय सामन्यातील आपले पहिलं वहिलं शतक पूर्ण केले. त्याच्या शतकानंतर विराटने अर्धशतक पूर्ण केले. यावेळी जैस्वाल आणि विराट यांच्यातही नाबाद शतकी भागीदारी झाली. अखेर विराटने ४० व्या षटकात विजयी धाव काढली. यावेळी जैस्वाल ११६ धावांवर तर विराट ६५ धावांवर नाबाद राहिला.

तत्पुर्वी, भारताने नाणेफेक जिंकून दक्षिण आफ्रिकेला प्रथम फलंदाजीसाठी बोलावले होते. दक्षिण आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करताना ४७.५ षटकात सर्वबाद २७० धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून क्विंटन डी कॉकने ८९ चेंडूत १०६ धावांची खेळी केली. तसेच, तेंबा बावुमाने ४८ धावा केल्या. मॅथ्यू ब्रिट्झके (२४), डेवाल्ड ब्रेव्हिस (२९) यांनी चांगली सुरुवात केली; परंतु, त्यांना मोठ्या धावा करता आल्या नाहीत. केशव महाराज २० धावांवर नाबाद राहिला. भारताकडून



### 20,000 टप्पा पूर्ण

या सामन्यात रोहित शर्माने ७ षटकापर्यंत कोणताही मोठा शॉट खेळला नव्हता. मात्र, ८ व्या षटकात त्याने षटकार खेचला. त्यानंतर रोहित लयीत खेळताना दिसला. १४ व्या षटकात त्याने चौथ्या चेंडूतवर एकेरी धाव घेत २७वी धाव पूर्ण केली. ही धाव रोहितसाठी विक्रमी धाव ठरली. कारण २७ धावा पूर्ण करताच रोहितने आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत २० हजार धावांचा टप्पा पूर्ण केला. २००७ मध्ये पदार्पण केलेल्या रोहितने ५०५ वा आंतरराष्ट्रीय सामन्यातील ५३८ व्या डावात खेळताना २० हजार धावा पूर्ण केल्या आहेत. असे करणारा तो चौथाच भारतीय आहे. यापूर्वी असा पराक्रम सचिन तेंडुलकर, राहुल द्रविड आणि विराट कोहली या तिघांनीच केला आहे. तसेच, २० हजार धावा करणारा रोहित जगातील १४ वा खेळाडू ठरला आहे.


### रोहि-राट पुन्हा कधी खेळणार?

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील एकदिवसीय मालिका आता संपली. या मालिकेत भारतीय संघाचे दोन माजी कर्णधार विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी शानदार फलंदाजी करत धावांचा पाऊस पाडला. हे दोन्ही दिग्गज खेळाडू आता फक्त एकदिवसीय फॉरमॅटमध्येच खेळतात. त्यामुळे ते पुन्हा निळ्या जर्सीमध्ये कधी खेळताना दिसतील? अशी उत्सुकता चाहत्यांमध्ये आहे. दरम्यान, भारतीय संघाचर पुढील एकदिवसीय मालिका न्यूझीलंडविरुद्ध होणार आहे. या मालिकेतील पहिला सामना पुढील वर्षी ११ जानेवारी रोजी वडोदरा येथे खेळवला जाणार आहे. या मालिकेपूर्वीही कोहली आणि रोहित मैदानावर खेळताना दिसू शकतात. तसेच, बीसीसीआयने या दोन्ही दिग्गजांना विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळण्यास सांगितले आहे. त्यामुळे ते २४ डिसेंबर रोजीही मैदानावर दिसू शकतात.

गोलंदाजी करताना प्रसिद्ध कृष्णा आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी ४ बळी घेतले. तर, अर्शदीप सिंग आणि रवींद्र जडेजा यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

## निवडक

### हार्दिक पांड्याचे पुनरागमन निश्चित



**नवी दिल्ली :** भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका एकदिवसीय मालिका संपल्यानंतर आता ५ सामन्यांची टी-२० मालिका ९ डिसेंबरपासून सुरू होत आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ या मालिकेतही दमदार कामगिरी करण्यास उत्सुक असेल. दरम्यान, हार्दिक पांड्या संघात परतल्याने संघ अधिक मजबूत झाला आहे, तर शुबमन गिल देखील फलंदाजीसाठी तंदुरुस्त आहे. या मालिकेत गिल, अभिषेक शर्मासोबत डावाची सुरुवात करताना दिसू शकतो. तिसऱ्या क्रमांकाची जबाबदारी खुद्द कर्णधार सूर्यकुमार यादव घेऊ शकतो, तर चौथ्या क्रमांकावर तिलक वर्माखेळताना दिसण्याची शक्यता आहे. संजू सॅमसनला पुन्हा एकदा मधल्या फळीत फलंदाजी करावी लागेल. सहाव्या क्रमांकावर हार्दिक पांड्या आपल्या आक्रमक फलंदाजीने वर्चस्व गाजवू शकतो. तसेच, भारतीय संघ अक्षर पटेलकडून अष्टपैलू कामगिरीची अपेक्षा करेल. त्याचबरोबर टी-२० मालिकेत जसप्रीत बुमराह आपल्या भेदक गोलंदाजीने फलंदाजांची परीक्षा घेताना दिसेन. बुमराहच्या पुनरागमनामुळे अर्शदीप सिंगला बाहेर बसावे लागू शकते.



### ऑस्ट्रेलियाची ॲशेस मालिकेत आघाडी

**गाबा :** पर्थनंतर आता गाबा येथेही ऑस्ट्रेलियाने आणखी एक धमाकेदार विजय मिळवला आहे. इंग्लंडने दिलेले ६५ धावांचे लक्ष्य कंगारू संघाने दुसऱ्या डावात केवळ २ गडी गमावून पूर्ण केले. ट्रॅव्हिस हेड आणि मार्नस लाबुशेन स्वस्तात पॅव्हेलियनमध्ये परतले असले तरी, ऑस्ट्रेलियाने ८ गडी राखून हा सामना जिंकला. या विजयासह, ऑस्ट्रेलियाने ॲशेस मालिकेत २-० अशी मजबूत आघाडी घेतली आहे. मिचेल स्टार्कची कामगिरी या सामन्यातही कमालीची राहिली. त्याने संपूर्ण सामन्यात एकूण ८ बळी घेतले. तसेच, फलंदाजीमध्ये ७७ धावांची दमदार खेळी देखील केली. दुसरीकडे, मायकल नेसरनेही गोलंदाजीत पाच बळी मिळविले.

### गौतम गंभीरने टीकाकारांना सुनावले

**नवी दिल्ली :** भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात पार पडलेल्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील तिसऱ्या सामन्यात भारताने विजय मिळवला. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी टीकाकारांना सुनावले आहे. या आधी कसोटी मालिकेत दक्षिण आफ्रिकेने वाईट व्हॉश देत मालिका जिंकली होती. तेव्हा गौतम गंभीर यांच्या प्रशिक्षकपदावर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आले होते. तसेच, प्रशिक्षक बदलण्याची मागणी सुद्धा करण्यात आली होती. मात्र, तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा पराभव केल्यानंतर गौतम गंभीरने पत्रकार परिषदेमध्ये टीकाकारांची शाळा घेतली. तो म्हणाला की, कसोटी मालिकेत निकाल आमच्या मनासारखे लागले नाहीत, तेव्हा खूप चर्चा झाली. परंतु, आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे कोणत्याही माध्यमाने किंवा पत्रकाराने एकदाही लिहिले नाही की, आमचा पहिला कसोटी सामना कर्णधाराशिवाय खेळला गेला, दुखापतीमुळे दोन्ही डावात त्याने फलंदाजी केली नाही. हेच गौतम गंभीरने पत्रकार परिषदेमध्ये बोलताना अधोरेखित केले.

### अभिषेक शर्माचा झंझावात सुरुच

**नवी दिल्ली :** सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत अभिषेक शर्माचा झंझावात सुरुच आहे. पंजाब संघाची धुरा हाती असून आक्रमक खेळी करताना मागे पुढे पाहात नाही. पंजाब विरुद्ध सर्विसेज सामन्यात अभिषेक शर्मान आक्रमक खेळीने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. सर्विसेजने नाणेफेकीचा कौल जिंकला आणि प्रथम गोलंदाजी स्वीकारली. अभिषेक शर्मा हा प्रभसिमरन सिंह सलामीला आला. खेळपट्टीवर तग धरत नाही तोच अभिषेक शर्माने आक्रमक बाणा दाखवला. समोर जो गोलंदाज येईल त्याच्यावर प्रहार करण्यास सुरुवात केली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी १०६ धावांची भागीदारी केली. प्रभसिमरन सिंह २८ चेंडूत ५० दावा करून बाद झाला. तर अभिषेक शर्माने ३४ चेंडूत ६२ धावांची खेळी केली. यावेळी त्याने ३ षटकार आणि ८ चौकार मारले. त्याचा स्ट्राईक रेट हा १८२.३५ चा होता. तीन षटकारांसह अभिषेक शर्मा सिक्सर किंग ठरला आहे.

## हृतिक येरूणकरने पटकावले कांस्य



| खांब | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील चिंचवली तर्फे दिवाळी या गावातील हृतिक येरूणकर याने बॉडी बिल्डिंगमध्ये तीन कांस्यपदक पटकावून यश संपादित केले आहे. गोरेगाव-मुंबई येथे संपन्न झालेल्या व मुंबई बॉडीबिल्डर्स असोसिएशन यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत जवळपास ६०० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. त्यातून हृतिक येरूणकर याने ६० किलो वजनी गटात आपल्यातील कलाकौशल्याचे प्रदर्शन करून कांस्यपदकाची कमाई केली. हृतिकच्या या यशाबद्दल ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ, तरूण मंडळ, श्री समर्थ नगर उत्कर्ष मंडळासह श्री समर्थ नगर आंबेवाडी येथील सर्व रहिवासी वर्ग व समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींनी त्याचे अभिनंदन व्यक्त करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## अभिनव ज्ञान मंदिर विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात

| माणगाव | प्रतिनिधी |

उसर खुर्द येथील छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचलित अभिनव ज्ञान मंदिर विद्यालयात दि.२ व ३ डिसेंबर रोजी वार्षिक क्रीडा महोत्सव २०२५-२६ उत्साहात पार पडला. मंगळवारी (दि.२) सकाळी साडेआठ वाजता क्रीडा महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन राष्ट्रीय आईस हॉकी खेळाडू तनय उतेकर व विद्यालयाचे माजी विद्यार्थी केतन वाजे यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलन करून करण्यात आले. क्रीडा विभागप्रमुख विनोद लाड यांनी प्रास्ताविक केले.




यावेळी प्रमुख पाहुणे केतन वाजे यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व पटवून देत १९९९-२००० च्या काळातील शाळा व आजच्या शाळेतील सकारात्मक बदलांची प्रशंसा केली. तसेच, सर्व शिक्षकांच्या परिश्रमांचे विशेष कौतुक केले. शालेय समितीचे निमंत्रित सदस्य नटी गुरुजी उपस्थित होते. खेळाडू तनय उतेकर यांनीही विद्यार्थ्यांना यशस्वी भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक सुर्वे यांनी प्रतिकूल परिस्थितीला हरवून नाव कमावणाऱ्या सावरपाडा एक्सप्रेस म्हणून प्रसिद्ध असलेल्या सविता राऊत व कविता राऊत यांच्या प्रेरणादायी कथा सांगून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. दोन दिवस चाललेल्या या क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तम खिलाडूवृत्ती दाखवून सहभाग नोंदवला.

त्यानंतर बुधवारी (दि.३) दुपारी दोन वाजता प्रमुख अतिथी लक्ष्मण तांबे व दिलीप पांचाळ यांच्या हस्ते विविध स्पर्धांमध्ये यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना चषक व पदक देऊन गौरविण्यात आले. यावेळी कबड्डी, खो-खो, लंगडी, क्रिकेट, हॉलीबॉल असे सांघिक व लांब उडी, उंच उडी, १००/२००/४००/८०० मीटर धावणे, १५०० मी. धावणे, ३००० मी. चालणे, चेस, बॅडमिंटन असे व्यक्तिगत खेळ घेण्यात आले. उत्साह, शिस्त व स्पर्धात्मकतेने सजलेल्या या वार्षिक क्रीडा महोत्सवाचे सर्वत्र कौतुक झाले. शेवटी मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे यांनी क्रीडा विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांना भविष्यातील क्रीडा प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

## फ्लॉप ठरला अन् संघ हरला

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत शनिवारी (दि.६) वैभव सूर्यवंशी प्रतिनिधित्व करत असलेल्या बिहार संघाला पराभत पत्करावा लागला. तेच अर्जुनला बाहेर करणाऱ्या गोवा संघाने सहज विजय मिळवला. यावेळी हैदराबादविरुद्ध प्रथम फलंदाजीला आलेल्या वैभवला ११ चेंडूंत ११ धावा करता आल्या. त्यामुळे बिहार संघाला ८ बाद १३२ धावांपर्यंतच मजल मारता आली. हैदराबादने १२.५ षटकांत ३ बाद १३४ धावा करून विजय मिळवला. तर, गोवा संघ अर्जुन तेंडुलकरशिवाय खेळायला उतरला. त्याच्या जागी शुभमन तारीला संधी दिली गेली. गोवा संघाने ७ गडी राखून हा सामना जिंकला.

## एमसीए कॉर्पोरेट शिल्ड ट्रॉफीचे अनावरण



| पुणे | प्रतिनिधी |

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन तर्फे एमसीए कॉर्पोरेट शिल्ड ट्रॉफी २०२५ च्या दुसऱ्या हंगामाचे अनावरण पुण्यातील डेक्कन जिमखाना येथे शनिवारी (दि.६) उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. बीसीसीआयच्या एकदिवसीय सामन्यांच्या नियमांनुसार ५० षटकांच्या स्वरूपात ही स्पर्धा खेळवली जाते. ही प्रतिष्ठित स्पर्धा राज्यातील अग्रगण्य कॉर्पोरेट क्रिकेट लीग म्हणून नावारूपाला आली आहे.

या उद्घाटन समारंभात मानद सचिव ॲड. कमलेश पिसाळ, स्पर्धा समिती प्रमुख रियाझ बागवान, एमसीए एपेक्स कौन्सिल सदस्य, संघमालक आणि संघ कर्णधार उपस्थित होते. तसेच, ॲड. पिसाळ व बागवान यांच्या हस्ते ट्रॉफीचे अनावरण झाले. ट्रॉफीचे अनावरण होताच स्पर्धेच्या दुसऱ्या हंगामाला अधिकृत सुरुवात झाली. पहिल्या हंगामाला मिळालेल्या उत्तुंग प्रतिसादाने प्रेरित होऊन या हंगामात आणखी ताकदीची स्पर्धा आणि उच्च दर्जाचे सामने अपेक्षित आहेत. मागील वर्षीचे सर्व संघ पुन्हा मैदानात उतरणार असून या वेळी एक महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. सुहाना ॲण्ड बोथारा संघाच्या जागी पुणीत बलान क्रिकेट अकॅडमीचा समावेश झाला आहे.

## स्मृती मानधनाचे लग्न रद्द

### सोशल मिडीयाद्वारे दिली माहिती

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय महिला क्रिकेटपटू स्मृती मानधना आणि म्युझिक डायरेक्टर पलाश मुच्छल हे दोघे गेल्या ६ वर्षांपासून रिलेशनशीपमध्ये होते. त्यानंतर त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला होता. काही कारणानाने त्यांचे लग्न पुढे ढकळण्यात आले होते. मात्र आता आता त्यांचे लग्न रद्द झाल्याची माहिती समोर येत आहे. या बाबत दोघांनीही सोशल मीडियावर पोस्ट करत माहिती दिली आहे.

भारतीय माहिला क्रिकेटपटू स्मृतीने भारतीय संघासह २ नोव्हेंबरला एकदिवसीय विश्वचषक जिंकल्यानंतर त्यांच्या लग्नाची तयारी सुरू झाली होती. सांगलीमध्ये २३ नोव्हेंबर रोजी या दोघांचे लग्न होते. लग्नाआधीचे सर्व सोहळेही उत्साहात पार पडले होते. मात्र, लग्नाच्या दिवशी स्मृतीच्या वडिलांची प्रकृती बिघडल्याने त्यांना तातडीने हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यानंतर लग्न पुढे ढकलल्याचे सांगण्यात आले होते. याचदरम्यान पलाश बाबतच्या अनेक चर्चेला उधाण आले होते. मात्र, याबाबत गेल्या तीन आठवड्यांमध्ये कोणीही अधिकृत भाष्य केले नव्हते. परंतु, रविवारी (दि.७) स्मृती आणि पलाश या दोघांनीही सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत लग्न रद्द झाल्याची माहिती दिली आहे.

स्मृतीने पोस्टमध्ये लिहिले की, गेल्या काही आठवड्यांपासून माझ्या आयुष्याबाबत बऱ्याच चर्चा झाल्या. मी खूप खासगी आयुष्य जगणारी व्यक्ती आहे. परंतु, मला हे देखील स्पष्ट करायचे आहे की, लग्न रद्द झाले आहे. मला हा विषय इथेच थांबवायचा आहे आणि तुम्ही सर्वांनीही हा विषय इथेच थांबवा. माझ्यासाठी नेहमीच आपल्या देशाचे सर्वोच्च स्थरावर प्रतिनिधित्व करणे हे आहे. भारतासाठी शक्य तितका काळ खेळत राहून आणखी विजेतीपदे जिंकावीत, असेच मला वाटते. माझे लक्ष नेहमीच यावर राहिल. तुमच्या सर्वांच्या पाठिंब्याबद्दल आभार, आता पुढे जायची वेळ आहे. तसेच पलाशने त्याच्या पोस्टमध्ये, मी माझ्या वैयक्तिक नात्याला मागे टाकून आयुष्यात पुढे जाण्याचा निर्णय घेतला असल्याचे म्हटले आहे.

#### सोशल मिडीयावरून एकमेकांना अनफॉलो

स्मृती मानधना आणि पलाश मुच्छल हे गेल्या सहा वर्षांपासून रिलेशनमध्ये होते. त्यांचे लग्न प्रचंड चर्चेचा विशष ठरला होता. परंतु, लग्नाच्या दिवशी स्मृतीच्या वडिलांची तब्बेत बिघडली आणि दोघांच्या आनंदावर विरझणच पडले. त्यानंतर लग्न पुढे ढकलल्याचे सांगण्यात आले. मात्र, रविवारी स्मृती मानधना आणि पलाश मुच्छलने सोशल मिडीयावर पोस्ट करत लग्न रद्द केल्याची माहिती दिली. त्यामुळे याचा सर्वांनाच धक्का बसला. यादरम्यान, दोघांनीही एकमेकांना सोशल मिडीयावरून अनफॉलो केल्याची माहिती देखील समोर आली आहे.



## विजेतेपदासाठी कुमार गटात चुरस | कुमारी गटात सांगली-ठाणे अंतिम लढत

# बुऱ्हाणनगरीत रंगणार सुवर्ण थरार

| अहिल्यानगर | क्रीडा प्रतिनिधी |

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने कुमार-कुमारी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा बुऱ्हाणनगर येथील श्री बाणेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पार पडत आहेत. या स्पर्धेतील अंतिम फेरीचा महामुकाबला निश्चित झाला असून कुमार गटात गतविजेत्या धाराशिवची लढत सोलापूरशी, तर कुमारी गटात सांगली व ठाणे यांच्यात विजेतेपदासाठी थरार रंगणार आहे.



मुलींच्या पहिल्या उपांत्य सामन्यात ठाण्याने गतविजेत्या धाराशिवचा ४०-२३ असा दणदणीत पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश मिळवला. त्यांनी मध्यंतरापासूनच सामन्यावर नियंत्रण ठेवत १६-१० अशी आघाडी घेतली होती. ठाण्याच्या विजयात अक्षरा भोसलेने पळतीचा खेळ सादर करत सिंहाचा वाटा उचलला. तसेच, दीक्षा काटेकर व वैष्णवी जाधव यांनीही चमकदार खेळी करत विजय पक्का केला. मुलींच्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात गत उपविजेत्या सांगलीने सोलापूरला २६-२३ असे १.५० मिनिटे राखून ३ गुणांनी हरवले. सांगलीकडून सानिया सुतार आणि सानिका चाफे यांनी अष्टपैलू खेळी केली. लघुत्तम आक्रमणाच्या तृतीय स्थानाच्या सामन्यात धाराशिवने सोलापूरला २४ सेकंदांनी हरवले.

कुमारांच्या पहिल्या उपांत्य फेरीत सोलापूरने सांगलीला ३९-३८ असे एकाच गुणावर नमवित अंतिम फेरीत धडक मारली. नवीन नियमातील 'ड्रीम' गुण निर्णायक ठरला. मध्यंतरास १८-२० अशी पिछाडी असतानाही सोलापूरने शानदार पुनरागमन केले. त्यांच्या सिद्धार्थ माने देशमुख, सुहाना आत्तार, अरमान शेख व शंभूराज चंदनशिव यांनी आक्रमणाची धार कायम ठेवली. कुमारांच्या दुसऱ्या उपांत्य फेरीत गतविजेत्या धाराशिवने पुण्यावर ३२-१९ अशी मात केली. मध्यंतराची १२-१८ ही पिछाडी पुण्यास महागात पडली. धाराशिवकडून सोत्या वळवी, जितेंद्र वसावे व राज जाधव यांनी चमकदार खेळी केली. तर, तृतीय स्थानाच्या लघुत्तम आक्रमणाच्या सामन्यात सांगलीने पुण्यावर १.०३ मि. राखून विजय मिळवला. त्यामुळे आता कुमार गटात सोलापूर विरुद्ध धाराशिव, तर मुली गटात ठाणे विरुद्ध सांगली यांच्यात सुवर्ण थरारा रंगणार आहे. त्यामुळे या अंतिम सामन्यात कोण बाजी मारणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. या अंतिम सामन्यादरम्यान मैदानावर दमदार कौशल्य, वेग, चातुर्य आणि रणतंत्राची आतषबाजी बघायला मिळणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)